खरिपाची पूर्वतयारी ▪ वेध हवामानाचा ▪ कृषी योजना ▪ पणन ▪ जीएसटी

जून २०१७/पाने ६०/किंमत ₹ १०

# लोकराज्य



## वेध पावसाचा
## समृद्ध शेतीचा...

# मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम २०१७

महाराष्ट्र शासन



"विकासाच्या वाटचालीत मला साथ द्या!"

पात्रता: वय २१ ते २६ वर्ष
प्रथम वर्ग पदवी,
किमान एक वर्षाचा अनुभव

फेलोशिप कार्यकाळ: ११ महिने

युवकांना
प्रशासनात सहभागी होण्याची व
राज्याच्या विकासाला हातभार लावण्याची
अभूतपूर्व संधी!

अधिक तपशील व अर्जासाठी:
http://mahades.maharashtra.gov.in
अर्ज करण्याची अंतिम तारीख:
१५/०६/२०१७

हेल्पलाईन क्रमांक: ०२२ २६३८३०१४
ई मेल - **cmfellowship-mah@gov.in**

या, मुख्यमंत्र्यांच्या आवाहनाला प्रतिसाद द्या,
राज्याच्या विकासात आपले योगदान द्या!

# अंतरंग





| | |
|---|---|
| शाश्वत शेती.. विकासाला गती... | ५ |
| शेतकऱ्यांना सर्व सुविधा | ७ |
| खरिपासाठी सज्ज | ९ |
| शेतकऱ्यांच्या हितासाठी | ११ |
| हवामानाचा 'महावेध' | १२ |
| पावसाचे शुभवर्तमान | १४ |
| सारे काही शेतकऱ्यांसाठी... | १८ |
| सक्षम पणन; समृद्ध शेतकरी | २४ |
| बाजार समित्या ऑनलाइन | ३० |
| कृषी ॲप्स | ३१ |
| सर्व शाळा डिजिटल करणार | ३२ |
| घर घेणाऱ्या ग्राहकांच्या हितासाठी | ३७ |
| एकच लक्ष्य, ४ कोटी वृक्ष | ३८ |
| महाराष्ट्र बदलतोय... | ४० |
| गोजिरे माळेगाव | ४२ |
| शासकीय रुग्णालय आणि आपण | ४४ |
| तयारी स्पर्धा परीक्षेची | ४६ |
| पक्ष्यांचे नंदनवन | ४८ |
| पुस्तकांचं अनुपमेय गाव | ५० |
| सायबर गुन्ह्यांपासून बचाव | ५२ |
| सातत्यपूर्ण अभ्यास | ५४ |
| करप्रणाली सुलभ, ग्राहकांना लाभ | ५६ |
| येथे कर माझे जुळती... | ५८ |


### ५ शाश्वत शेती.. विकासाला गती...

राज्यात यंदा १५१ लाख ९० हजार हेक्टर क्षेत्रावर खरिपाची पेरणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यासाठी कृषी विभागाने सूक्ष्म नियोजन केले आहे. खरीप हंगामाची तयारी आणि राज्याच्या कृषी विकासासाठी असलेल्या उपाययोजनांवर विस्तृत दृष्टिक्षेप...

### १२ हवामानाचा 'महावेध'



हवामानविषयक अचूक माहितीचा वेध घेणारी आधुनिक यंत्रणा शासनाने प्रथमच स्कायमेट वेदर सर्व्हिसेसच्या माध्यमातून प्रत्येक महसूल मंडळामध्ये बसवण्याचा निर्णय घेतला आहे. पहिले यंत्र नागपूर जिल्ह्यातील डोंगरगाव येथे बसवण्यात आले आहे.

### १४ पावसाचे शुभवर्तमान

भारतातील ७५% पेक्षा जास्त पाऊस जून ते सप्टेंबरपर्यंतच्या चार महिन्यात होतो. या हंगामात उगवलेली खरीप पिके नैऋत्य मान्सूनच्या पावसावर अवलंबून असतात. या हंगामात चांगला पाऊस पडला तर शेतकऱ्यांना अधिक फायदा होतो.



### ३२ सर्व शाळा डिजिटल करणार



'विद्यार्थ्यांसाठी शिक्षण क्षेत्रातील सुधारणा' या विषयाच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यभरातून आलेल्या निवडक विद्यार्थ्यांशी 'मी मुख्यमंत्री बोलतोय...' या कार्यक्रमाच्या माध्यमातून संवाद साधला.

### ४० महाराष्ट्र बदलतोय...

यंदा महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून राज्याच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक विकासात योगदान देणाऱ्या युवा पिढीशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट संवाद साधला आणि राज्याच्या विकासाबाबतच्या युवकांच्या कल्पना मुख्यमंत्र्यांनी जाणून घेतल्या.
निमित्त होते 'ट्रान्सफॉर्म महाराष्ट्र' या कार्यक्रमाचे...



### ४२ गोजिरे माळेगाव

आपले गाव 'गोजिरे' करण्याचा प्रयत्न नाशिक जिल्ह्यातील माळेगावच्या ग्रामस्थांनी केला आहे. या गावात प्रवेश करताक्षणी प्रसन्नता आणि स्वच्छता जाणवते. गावातील प्रत्येक निर्मितीमागे विकासाचा एक विचार आणि नागरिकांचा एकोपा आहे. या गावाला 'स्मार्ट ग्राम' योजनेंतर्गत दहा लाखाचा पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला.

वर्ष ६८ वे | अंक १२ | जून २०१७

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन**

**लोकराज्य**

## संपादन

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संपादक मंडळ — अजय अंबेकर, देवेंद्र भुजबळ, शिवाजी मानकर
- संपादक — सुरेश वांदिले
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन अधिकारी — मीनल जोगळेकर
- वितरण सहायक — अश्विनी पुजारी
- साहाय्य — भारती वाघ

## मांडणी

- मुखपृष्ठ — सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा. लि. महापे, नवी मुंबई.

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

संपादकीय

# वेध पावसाचा

जून महिना येताच सर्वांना पर्जन्यराजाचे वेध लागतात. शेतकऱ्यांसोबतच सर्वच नागरिक पावसाची चातकासारखी वाट बघतात. पाऊस उत्तम बरसू लागला की, शेतकरी सुखावतो. कारण त्याला चांगल्या पिकाची हमी हा पाऊस देतो. नदी, नाले, तलाव, विहिरी भरल्याने पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर होते. उद्योगधंद्यांना, वीजनिर्मितीला पुरेसे पाणी मिळू लागते. पावसाचे आगमन होताच वातावरणात गारवा निर्माण होतो आणि उन्हाळ्याने तापलेल्या जिवांना दिलासा मिळतो. सुदैवाने यंदा समाधानकारक पाऊस होईल, असा अंदाज हवामान तज्ज्ञांनी वर्तवला आहे. ही सर्वांसाठीच अतिशय आनंद आणि समाधानाची बाब आहे.

शेती हाच अजूनही आपल्या अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. त्यामुळेच केंद्र आणि राज्य शासन शेती विकासावर प्रामुख्याने लक्ष केंद्रित करतात. खरिपाचा हंगाम चांगला जावा यासाठी महाराष्ट्र शासनाने उत्तमरीत्या तयारी व नियोजन केले आहे. या अनुषंगाने मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, कृषिमंत्री श्री. पांडुरंग फुंडकर यांनी खरिपाचा राज्यस्तरीय आढावा घेतला असून शेतकऱ्यांना वेळेवर खते, कीटकनाशके, अवजारे, बी-बियाणे मिळण्यास कोणतीही त्रुटी राहणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले आहेत. आम्ही या अंकात खरीप हंगामासाठी सरकार करत असलेल्या उपाययोजना, शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना, तज्ज्ञांनी वर्तवलेल्या हवामान अंदाजाचे विश्लेषण, कृषी ॲप्स अशी उपयुक्त माहिती समाविष्ट केली आहे.




हवामानाचा अचूक वेध घेणारी अत्याधुनिक यंत्रणा राज्यातील २ हजारांहून अधिक महसूल मंडळात बसवण्यात येणार आहे. त्यामुळे दर दहा मिनिटाला हवामानविषयी संपूर्ण माहिती मिळू शकेल. या यंत्रणेविषयी विस्तृत विवेचन करणारा लेखही या अंकात समाविष्ट करण्यात आला आहे.

राज्याच्या पणन विभागामार्फत विविध उपयुक्त योजना राबवण्यात येत आहेत. त्यावर आधारित शेतमालाची थेट विक्री, ऑनलाइन बाजार समित्या, शेतमाल तारण योजना, असे काही लेख या अंकात आम्ही दिले आहेत. याशिवाय आरोग्य, स्मरण, आपला गाव, प्रेरणा, अभिनव, सायबर गुरू ही सदरे वाचकांच्या ज्ञानात भर घालतील.

आपल्या सर्वांचे आवडते 'लोकराज्य' हे देशातील सर्वाधिक खपाचे एकमेव शासकीय मासिक व एकमेव मराठी मासिक ठरले आहे. जुलै ते डिसेंबर २०१६ या कालावधीतील विविध वृत्तपत्रे/नियतकालिकांच्या खपाचा अधिकृत अहवाल 'ऑडिट ब्युरो ऑफ सर्क्युलेशन'ने (एबीसी) नुकताच प्रकाशित केला. त्यात ही बाब नमूद करण्यात आली आहे.

लोकराज्यने आपली गुणवत्ता, दर्जा, वस्तुनिष्ठता वारंवार सिद्ध केली आहे. त्यामुळे व आपल्या सहकार्यामुळेच हे यश मिळू शकले. पुढील काळात आपल्या सक्रिय पाठबळावर आम्ही लोकराज्यला देशातील क्रमांक एकचे मासिक करण्याचा निर्धार केला आहे. लोकराज्यच्या यशाबद्दल सर्व वाचक, लेखक, वर्गणीदार, विक्रेते यांचे मन:पूर्वक अभिनंदन !

हा अंक आपणास आवडेल, अशी खात्री आहे.

**ब्रिजेश सिंह**
(मुख्य संपादक)



# शाश्वत शेती.. विकासाला गती...

**राज्यात यंदा १५१ लाख ९० हजार हेक्टर क्षेत्रावर खरिपाची पेरणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, त्यासाठी कृषी विभागाने सूक्ष्म नियोजन केले आहे. खरीप हंगामाची तयारी आणि राज्याच्या कृषी विकासासाठी असलेल्या उपाययोजनांवर विस्तृत दृष्टिक्षेप...**



राज्याच्या विकासात कृषी क्षेत्राचे मोलाचे योगदान आहे. सुमारे ५० टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या शेती क्षेत्राशी निगडित आहे. एकूण ३०८ लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी सुमारे २२५.५७ लाख हेक्टर क्षेत्र पिकाखाली आहे. जमीन व हवामानाची राज्यातील निरनिराळ्या विभागात मोठ्या प्रमाणात असमानता आहे. जवळपास एक तृतीयांश क्षेत्र हे अवर्षणग्रस्त क्षेत्राखाली आहे. एकूण पिकाखालील क्षेत्रापैकी १७.५० टक्के क्षेत्र बागाईत आहे. पिकाखालील एकूण क्षेत्रापैकी १४९.४२ लाख हेक्टर क्षेत्र खरीप हंगाम (ऊस पिकासह) पिकाखाली तर रब्बी पिकांची लागवड ५४.७५ लाख हेक्टर क्षेत्रावर केली जाते. उन्हाळी पिकांची लागवड १.६७ लाख हेक्टर क्षेत्रावर केली जाते.

## उत्पादकता वाढवण्यावर भर

कृषी क्षेत्राच्या दृष्टीने खरीप हंगामास अनन्यसाधारण महत्त्व आहे. शेती क्षेत्राचा विकास आणि शेतकऱ्यांना अधिक सक्षम करण्यासाठी २०१७-१८ या खरीप हंगाम वर्षात उत्पादकता वाढवणे हे मुख्य उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यासाठी कृषी, सहकार विभागाने सूक्ष्म नियोजन केले आहे. कृषिक्षेत्राच्या विकासासाठी केलेल्या विविध उपाययोजनांमुळे यंदा राज्याचे कृषी उत्पन्न ४० हजार कोटी रुपयांनी वाढले आहे. जलयुक्त शिवार योजनेमुळे संरक्षित सिंचनाचा लाभ कृषिक्षेत्राला झाला. त्यामुळे देखील कृषी उत्पादनात भरीव वाढ झाली आहे.

### मृद आरोग्य पत्रिका

**कृषी पद्धतीत रासायनिक खतांचा वापर व पाण्याच्या अनिर्बंधित वापरामुळे जमिनीचे आरोग्य बिघडते. त्याचा पीक उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे जमिनीचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी व खतांच्या संतुलित परिणामकारक वापरासाठी मृद आरोग्य पत्रिका योजना राबवण्यात येत आहे. या अंतर्गत राज्यातील एक कोटी सहा लाख शेतकऱ्यांना मृद आरोग्य पत्रिकेचे वाटप करण्यात आले आहे. जमिनीच्या आरोग्य तपासणीसाठी पाच गावांमागे एक प्रयोग शाळा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**



## लागवड क्षेत्र

खरीप हंगामात प्रामुख्याने भात, नाचणी, खरीप ज्वारी, बाजरी, मका, कडधान्य (तूर, मूग, उडीद), गळीत धान्य पिके (तीळ, भुईमूग, सोयाबीन) व नगदी पिके (ऊस, कापूस) यांची लागवड केली जाते. रब्बी हंगामात प्रामुख्याने रब्बी ज्वारी, गहू, मका, कडधान्य (हरभरा), गळीतधान्य पिके (करडई, जवस, तीळ, सूर्यफूल) या पिकांची लागवड केली जाते.

खरीप २०१७च्या हंगामाकरिता लक्षांकाची निश्चिती करण्यात आली आहे. भात, खरीप ज्वारी, बाजरी, रागी, मका व अन्य खरीप तृणधान्य हे ४६ लाख ६५ हजार हेक्टरवर लागवड करण्यात येणार आहे. त्याद्वारे ७७ लाख २६ हजार मेट्रिक टन उत्पादनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तूर, मूग, उडीद असे एकूण खरीप कडधान्य २३ लाख ३२ हजार हेक्टरवर लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्याद्वारे १६ लाख ७६ हजार मेट्रिक टन उत्पादन घेतले जाणार आहे. अशा प्रकारे एकूण खरीप अन्नधान्य हे ५९ लाख ९७ हजार हेक्टरवर लागवडीचे उद्दिष्ट असून ९४ लाख २ हजार मेट्रिक टन उत्पादनाचा लक्षांक निश्चित करण्यात आला आहे. या वर्षी १५१ लाख ९० हजार हेक्टर क्षेत्रावर खरिपाची पेरणी केली जाणार आहे.

## सूक्ष्म नियोजन

खरीप हंगामाचे महत्त्व लक्षात घेता त्याच्या सूक्ष्म नियोजनासाठी प्रत्येक जिल्ह्यात पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली खरीप पूर्वहंगाम नियोजन बैठका घेण्यात आल्या. राज्यस्तरीय बैठक मुंबई येथे मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या शेती विकासाचे व्हिजन मांडले.

या वर्षी कर्जाचे नियोजन करताना 'स्टेट फोकस पेपर' प्रकाशित केला आहे. ३० ते ३१ लाख शेतकरी हे कर्जाच्या परिघाबाहेर गेले आहेत त्यांना कर्जपुरवठा झाला पाहिजे, यासाठी अपर मुख्य सचिव वित्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. या समितीने नियोजनबद्ध आराखडा करून प्रत्येक शेतकऱ्याला कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत नियोजन करण्याची सूचना मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत दिली.

पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांनी आपल्या भागातील शेतकऱ्यांसाठी जिल्हा, तालुका व गाव पातळीवर सूक्ष्म नियोजन करून 'पीक कर्ज मेळावे' आयोजित करावे. तसेच कृषी विद्यापीठाने पीक पद्धतीचे नियोजन करून, आपल्या विभागात कोणती पिके घेतली पाहिजेत यासाठी प्रयत्न करावे. शाश्वत पीक कसे घेता येईल, याची गाव पातळीवर माहिती देऊन, नियोजन करण्यात यावे. मागच्या वर्षी पाणी व्यवस्थापन केल्यामुळे अनेक भागात शेतकऱ्यांना तीन वेळा पीक घेता आले. त्यामुळे या वर्षीसुद्धा जलयुक्त शिवार, शेततळी, विहिरीची कामे मिशन मोड म्हणून युद्धपातळीवर करण्यात यावीत. त्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच कृषी आणि पणन विभागाने साठवणूक, अन्नप्रक्रिया उद्योगावर अधिक भर द्यावा. शेतकऱ्यांच्या मालाला उचित भाव मिळावा, यासाठी अन्नप्रक्रिया उद्योग धोरण राबवण्यात येणार असून, शेतकऱ्यांनी शेतमाल तारण योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.



देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

**शेतीक्षेत्राचा विकास आणि शेतकऱ्यांना अधिक सक्षम करण्यासाठी २०१७-१८ या खरीप हंगामवर्षाचे, उत्पादकता वाढवणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना कृषिक्षेत्राशी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. खरीप हंगामाचे नियोजन राज्य, जिल्हा आणि तालुकापातळीवर करण्यात आले आहे.**

# शेतकऱ्यांना सर्व सुविधा

खरीप हंगामाच्या तयारीसाठी राज्याचा नियोजनबद्ध कृषी आराखडा कृषी, सहकार विभागाने तयार केला आहे. कृषिक्षेत्राच्या विकासासाठी केलेल्या विविध उपाययोजनांमुळे यंदा राज्याचे कृषी उत्पन्न ४० हजार कोटी रुपयांनी वाढले आहे. उणे असलेला कृषी विकास दर १२.५ टक्क्यांवर गेला असून गेल्या अनेक वर्षांतील ही विक्रमी वाढ आहे.

यंदा कर्जाचे नियोजन करताना स्टेट फोकस पेपर प्रकाशित केला आहे. ३० ते ३१ लाख शेतकरी हे कर्जाच्या परिघाबाहेर गेले आहेत. त्यांनाही कर्जपुरवठा झाला पाहिजे, यासाठी अपर मुख्य सचिव वित्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी आपल्या भागातील शेतकऱ्यांसाठी जिल्हा, तालुका, गाव पातळीवर सूक्ष्म नियोजन करून पीक कर्ज मेळावे आयोजित करतील. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा, यासाठी अन्नप्रक्रिया उद्योग धोरण राबवण्यात येणार आहे. काटोल येथे १३० एकर जागेवर संत्रा व डाळिंब या फळांवर प्रक्रिया करणारा उद्योग सुरू करण्यात येणार असून, हा प्रकल्प शेतकऱ्यांना समृद्धीकडे नेणारा आहे.

## हवामानाचा अचूक अंदाज

हवामानाचा अचूक अंदाज नसल्यामुळे शेतकऱ्याचे होणारे नुकसान टाळण्यासाठी, राज्यात प्रथमच स्वयंचलित हवामान केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना हवामानाची अचूक माहिती, प्रत्येक गावात डिजिटल किऑक्स बोर्डाच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे. अचूक हवामानविषयक पूर्वमाहितीमुळे शेतीचे नियोजन करणे सुलभ होणार आहे.

## स्वयंचलित हवामान केंद्रे

हवामानाचा अचूक अंदाज मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यावर नैसर्गिक आपत्तीसोबत दुबार पेरणीचे मोठे संकट सातत्याने येत होते. शेतकऱ्यांना हवामानाचा अचूक अंदाज गावापर्यंत पोहोचवण्यासाठी 'महावेध' प्रकल्पांतर्गत राज्यातील सर्व महसूल मंडळात २ हजार ६५ स्वयंचलित हवामान केंद्रे उभारण्यात येणार आहेत. पहिल्या महिन्यात एक हजार केंद्रे राज्यात सुरू करण्यात येतील.

या हवामान केंद्रामुळे १२ बाय १२ किलोमीटर परिसरातील अचूक हवामानाची नोंद दर दहा मिनिटाला उपलब्ध होणार आहे. गावात किती पाऊस पडणार, कसा पडणार, कोणते पीक चांगले होईल तसेच हवामानाच्या बदलाची अचूक माहिती गावात उपलब्ध होणार असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या संकटाचा सामना करता येणार आहे.

५० लाख शेतकऱ्यांपर्यंत एसएमएसद्वारे माहिती पोहोचवण्यासोबतच डिजिटल बोर्डाच्या माध्यमातून माहिती उपलब्ध होईल.

## अविरत १२ तास वीज

शेतकऱ्यांच्या विकासासाठी विशेष धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. शेतीसाठी  वीज व पाणी प्राधान्याने उपलब्ध करून देण्यासाठी जलयुक्त शिवारसारखे उपक्रम यशस्वी ठरले आहेत. जलयुक्तच्या संरक्षित सिंचनामुळे राज्यात ४० हजार कोटींचे जास्तीचे उत्पन्न झाले आहे. तसेच ८० टक्के टँकर कमी झाले आहेत. सौर ऊर्जेद्वारे शेतकऱ्यांना अविरत १२ तास वीज देण्याचा देशातील पहिला प्रयोग राज्यात राबवण्यात येणार आहे.


## उन्नत शेती – समृद्ध शेतकरी

या अभियानांतर्गत शेतकऱ्यांना प्रगत तंत्रज्ञानाची माहिती शेतावर पोहोचविण्यात येणार आहे. गटशेतीला प्रोत्साहन देऊन कृषिविषयक सर्व योजना एकत्र केल्याने, उत्पादन खर्च कमी होऊन उत्पादन वाढेल. मागील दोन वर्षात कृषी विकासासाठी राबवण्यात आलेल्या योजनांमुळे तसेच जलयुक्त शिवारमुळे २० लाख टन तुरीचे उत्पादन झाले आहे. मागील १५ वर्षांतील सर्वाधिक तूर खरेदी या वर्षात केली गेली असून शेतकऱ्यांची तूर खरेदी केली जात आहे.



## कृषी संजीवनी प्रकल्प

**बदलत्या हवामानाचा कृषी क्षेत्रावर परिणाम होऊ नये, यासाठी शेतीचे संरक्षण करण्यासाठी मराठवाड्यातील चार हजार गावे व विदर्भातील एक हजार गावांत क्षारतेच्या समस्येवर मात करण्यासाठी जागतिक बँकेच्या साहाय्याने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी जागतिक बँकेने चार हजार कोटी रुपयांचा निधी दिला आहे.**



### सर्वंकष आराखडा

दुबार पेरणीचे संकट येऊ नये, यासाठी सर्वंकष आराखडा तयार करावा. आपत्कालीन व्यवस्थापन आराखडा तयार करताना त्या भागातील समस्यांचा आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी घ्यावा, अशा सूचना त्यांनी या बैठकीत केल्या.

राज्यात बियाण्यांची उपलब्धता पुरेशी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना बियाणांचा तुटवडा जाणवणार नाही. खरीप हंगामात शेतकऱ्यांना दर्जेदार आणि योग्य किंमतीत बियाणे, रासायनिक खते व अन्य साहित्य पुरवण्याच्या दृष्टीने तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर नियोजन करण्यात आले आहे.

### अद्ययावत तंत्रज्ञानाचा प्रसार

राज्यातील बहुतांश शेती ही कोरडवाहू असल्याने तिचा सर्वांगीण विकास करण्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचा प्रसार कृषी विभागामार्फत केला जात आहे. कोरडवाहू शेती अभियानाच्या माध्यमातून केंद्र आणि राज्य शासनाच्या योजनांचे समन्वय केले जात आहे. विविध कामांच्या माध्यमातून भूजल पातळी वाढ करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

### शेतकरी केंद्रित अर्थसंकल्प

गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी यामुळे शेतकरी कायम अडचणीत सापडतो. त्याच्या पाठीशी खंबीर उभे राहण्यासाठी शासनाने अनेक निर्णय घेतले आहे. या वर्षी राज्याचा अर्थसंकल्प हा शेती आणि शेतकरी केंद्रित आहे.

कृषी विकास करण्यासाठी लागणारा निधी या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन, कर्जावरील व्याजमाफी, पीक कर्ज, प्रधानमंत्री कृषी पीक विम्यांतर्गत देण्यात आलेली भरपाई या बाबींमुळे बळीराजाला सावरण्याबरोबरच कृषी विकासाचा दर वाढता ठेवण्यात शासनाला यश आले आहे.

गेल्या वर्षीच्या खरीप हंगामात १५२ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी करण्यात आली होती. त्यामुळे तृणधान्यात ८० टक्क्यांनी, कडधान्यात १८७ टक्क्यांनी, तेलबियांत १४२ टक्क्यांनी तर कापूस उत्पादनात ८३ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

### पीक विम्यामुळे दिलासा

**खरीप हंगाम २०१६ मध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजनेतून राज्यातील शेतकऱ्यांना १६४२ कोटी नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली आहे. खरीप हंगामापासून नव्याने लागू केलेल्या या योजनेतून शेतकऱ्यांना मदत जाहीर होण्याची ही पहिलीच वेळ आहे. राज्यातील २४ लाख शेतकरी मदतीस पात्र ठरले आहेत. पीक विम्याची रक्कम वेळेवर मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.**



**पांडुरंग फुंडकर**
कृषी, फलोत्पादन मंत्री

कृषी विशेष

**कृषिक्षेत्राच्या विकासावर शासनाने लक्ष केंद्रित केले आहे. जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून सिंचनाच्या सुविधेत झालेली वाढ हा या प्रयत्नांचा एक भाग आहे. यंदाच्या खरीप हंगामासाठी शासनाने सूक्ष्म नियोजन केले आहे.**

# खरिपासाठी सज्ज

समाधानकारक पाऊस व बियाण्यांची उपलब्धता यामुळे २०१६-१७ मध्ये भरघोस उत्पादन झाले आहे. अधिक प्रमाणात उत्पादन झाल्याने बऱ्याच ठिकाणी बारदाणा उपलब्धता व अन्य अडचणीमुळे उत्पादित माल खरेदी करण्यात काही मर्यादा आल्या होत्या, मात्र शासनाने लक्ष ठेवून योग्य तोडगा काढलेला आहे.

## सूक्ष्म नियोजन

या वर्षी 'उन्नत शेती-समृद्ध शेतकरी'या संकल्पनेवर आधारित योजनेच्या अंमलबजावणीबाबतचे नियोजन करण्यात आले आहे. पिकाच्या उत्पादन खर्चापेक्षा अधिक तसेच पिकांसाठी घेतलेल्या पीक कर्जापेक्षा अधिक उत्पन्न राज्यातील शेतकऱ्यांना खात्रीशीरपणे मिळावे, हा या वर्षीच्या नियोजनाचा मुख्य उद्देश; अभियानाद्वारे तालुका विकास घटक ठरवून नियोजन, त्यामुळे शेतीचे तालुकास्तरावर सूक्ष्म नियोजन होण्यास मदत होणार आहे.

कृषी क्षेत्राच्या विकासावर शासनाने लक्ष केंद्रित केले आहे. अभियान स्वरूपात राबवण्यात येणाऱ्या विविध केंद्रीय योजनांसोबतच राज्य शासन विविध पूरक योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी कार्यरत आहे. बदलल्या हवामान परिस्थितीचा शेती क्षेत्रावरील झालेला परिणाम विचारात घेता, मागील वर्षी निसर्गाची साथ शासनाच्या प्रयत्नाने कृषी उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

## शेती व्यवसायास स्थैर्य

शेतकऱ्यांना बदलत्या परिस्थितीत शेती व्यवसायास स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, मृद आरोग्य पत्रिका अभियान, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान आदी महत्त्वाकांक्षी अभियाने



राज्यात राबवली जात आहेत. आंतरराष्ट्रीय कडधान्य वर्षाचे निमित्त साधून शेतकऱ्यांनी मागील वर्षी कडधान्य व गळीत धान्यपिकांच्या उत्पादकतेत भरीव वाढ केल्याने; त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहे.

## कृषी महोत्सव

शेतकऱ्यांच्या गरजा विचारात घेऊन आम्ही अधिक लोकाभिमुख व व्यापक कृषी विस्तारासाठी 'पंडित दीनदयाळ उपाध्याय कृषी योजना' व 'कृषी गुरुकुल योजना' नव्याने कार्यान्वित करण्यात येत आहेत. 'कृषी महोत्सव' योजनेद्वारे शेतकऱ्यांच्या विचारांची देवाणघेवाण, तज्ज्ञांचे मार्गदर्शन व विस्तार कार्यवृद्धी करण्यात येणार आहे. अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनण्यास मदत करण्यासाठी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना' कार्यान्वित करण्यात आली आहे.

हवामान विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार येत्या खरीप हंगामात पाऊसमान समाधानकारक राहील. राज्य शासनाचा पुढाकार व शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग यांच्या माध्यमातून २०१७-१८ मध्ये राज्यातील बळीराजाला सुखाचे, समृद्धीचे दिवस येतील व राज्याचा कृषी विकासाचा दर अधिक वाढेल, असा मला विश्वास आहे.

## संरक्षित सिंचन

राज्याने गेली तीन वर्षे सलग दुष्काळाचा सामना केला. त्याचा परिणाम शेती क्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर झाला. गेल्या दोन वर्षात जलयुक्त शिवार योजना यशस्वीरीत्या राबवली जात आहे. त्यामुळे विकेंद्रित जलसाठे निर्माण झाल्यामुळे खात्रीशीर सिंचनाची व्यवस्था निर्माण झाली. या योजनेत लोकसहभाग मोठ्या प्रमाणावर मिळाल्याने 'दुष्काळमुक्त महाराष्ट्र' ही संकल्पना प्रत्यक्षात येण्यास मदत होणार आहे. शेतीला संरक्षित सिंचनाच्या माध्यमातून पाणी मिळण्यासाठी जलयुक्त शिवार योजनेचा मोठ्या प्रमाणावर फायदा मिळाला आहे. गेल्या दोन वर्षांत ११ हजार ४८३ गावांमध्ये या योजनेंतर्गत कामे पूर्ण झाली आहेत. या कामांच्या माध्यमातून ८.४० टीएमसी क्षमतेचे विकेंद्रित पाणीसाठे निर्माण झाले आहेत.

### १,११,१११ शेततळ्यांचे उद्दिष्ट

**राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत एक लाख २२ हजारांपेक्षा जास्त विहिरींचे काम पूर्ण करण्यात आले आहे. त्यापैकी गेल्या दोन वर्षांत ६० हजार विहिरी पूर्ण झाल्या आहेत. पुढील आर्थिक वर्षात विहिरी आणि 'मागेल त्याला शेततळे' यासाठी २२५ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. २०१६-१७ आणि २०१७-१८ या दोन वर्षांत एकूण १ लाख ११ हजार १११ शेततळी निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.**

**राज्यातील जास्तीत जास्त क्षेत्र हे सूक्ष्म सिंचनाखाली आणण्यासाठी राज्य शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. ऊस पीक सूक्ष्म सिंचनाखाली आणण्यासाठी, शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध करून देण्याची योजना प्रस्तावित करण्यात आली आहे.**



प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेंतर्गत राज्यातील २६ प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पाची कामे पूर्ण झाल्यावर ८२ हजार ६०० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होण्यास मदत होणार आहे. या प्रकल्पासाठी दोन हजार ८१२ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. शेती आणि शेतीसंलग्न क्षेत्र सक्षम करण्यासाठी जलसंपदा विभागाला या वर्षीच्या अर्थसंकल्पात ८२३३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

## उन्नत शेती, समृद्ध शेतकरी अभियान

या खरीप हंगामापासून राज्य शासनाने उन्नत शेती, समृद्ध शेतकरी अभियान सुरू केले आहे. या अभियानांतर्गत कृषी उत्पादन क्षमता वाढवण्याबरोबरच, कृषी यांत्रिकीकरणास चालना देण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. पिकाच्या उत्पादन खर्चापेक्षा अधिक उत्पन्न मिळावे, त्यासाठी तालुका हा विकास घटक ठरवून नियोजन करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत शेतकऱ्यांना त्यांच्या गरजेनुसार कृषी अवजारे पुरवण्यात येतील. कृषी अवजारे व कृषी निविष्ठांचे अनुदान थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येणार आहे. सिंचनाचा योग्य वापर व उत्पादन मूल्यवृद्धीसाठी ठिबक सिंचन योजना, कांदा चाळ उभारणी, शेतमालावर प्राथमिक प्रक्रिया, शेडनेट व हरितगृह उभारणे यासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे.

## महावेध

लहरी हवामानाचा फटका शेतीला बसू नये यासाठी राज्यात प्रथमच महावेध प्रकल्पांतर्गत स्वयंचलित हवामान केंद्र मंडल स्तरावर बसवण्यात येणार आहे. या प्रकल्पाद्वारे राज्यात २०६५ ठिकाणी ही हवामान केंद्रे बसवली जाणार आहेत. या योजनेचा शुभारंभ नुकताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कृषी मंत्री पांडुरंग फुंडकर यांच्या हस्ते नागपूर जिल्ह्यातील डोंगरगाव येथे करण्यात आला. या यंत्रणेमुळे शेतकऱ्यांना बदलत्या हवामानाची माहिती मिळणे सुलभ होणार असून शेतीचे संभाव्य नुकसान कमी होण्यास मदत होईल.

## वीजपुरवठा

कृषिपंपांना वीज वितरणासाठी चांगल्या पायाभूत सुविधा निर्माण करून सिंचनासाठी दिवसा सलग १२ तास वीज मिळेल, अशी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे महावितरण कंपनीच्या विजेवरील शेतकऱ्यांचे अवलंबित्व कमी करण्यासाठी त्यांना सवलतीमध्ये सौर कृषिपंप वितरण तसेच सौर रोहित्रांसाठी पायलट प्रकल्प सुरू झाला आहे. गेल्या २ वर्षात १ लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांच्या कृषिपंपांना वीजजोडणी देण्यात आली आहे.

## अवजारांसाठीची रक्कम थेट खात्यात

विविध योजनांतर्गत मिळणाऱ्या कृषी अवजारांऐवजी आता

शेतकऱ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा होणार. त्यामुळे त्यांना कृषी कार्यालयाकडे वारंवार चकरा मारण्याची आवश्यकता नाही. त्याचप्रमाणे अवजारांच्या गुणवत्तेबाबत शंका राहणार नाही. आपल्याला हवे असणारे अवजार आपल्या पसंतीच्या दुकानातून घेता येणार आहे.

## शेतमालाला योग्य भाव

शेतकऱ्यांना दुष्काळाच्या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी गेल्या दोन वर्षात सिंचनाच्या सुविधांबरोबरच शेतीमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होण्यासाठी शेतमाल विक्री व्यवस्थेत स्पर्धा निर्माण करण्यासाठी थेट पणन व खासगी बाजाराला चालना देण्यात येत आहे. राज्यात १० ठिकाणी ग्रो मार्केट उभारणे, संत शिरोमणी सावता माळी आठवडे बाजार अभियानाची व्याप्ती वाढवणे आदी कामांचे नियोजन करण्यात आले आहे. शेतमालाची वाहतूक सुकर व्हावी याकरिता कोल्डव्हॅन देण्याची योजना प्रस्तावित करण्यात आली आहे.

शेतीचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी गट शेतीला चालना देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असून; याबाबतचे धोरण अंतिम टप्प्यात आहे. किमान १०० एकर शेत जमिनीवर किमान २० शेतकऱ्यांचा गट स्थापन करून त्यामार्फत गट शेती करण्यात येणार आहे.

शेती क्षेत्रात गेल्या दोन वर्षात शासनाने केलेली गुंतवणूक पाहता त्याचे चांगले परिणाम कृषी उत्पादनावर दिसून आले आहेत. या वर्षी मान्सूनदेखील वेळेवर आणि सरासरीइतका होणार असल्याचे भाकीत वेधशाळेने वर्तवल्याने बळीराजा नक्कीच सुखावला आहे. खरिपाच्या तयारीला बळीराजा लागला आहे. खते, बियाण्यांची उपलब्धता असल्याने आणि शासनाने केलेल्या नियोजनामुळे या हंगामात कृषी उत्पन्न भरघोस होईल, अशी अपेक्षा आहे.

**– अजय जाधव**
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय



# शेतकऱ्यांच्या हितासाठी

## प्रधानमंत्री पीक विमा योजना

खरीप हंगाम २०१६ पासून प्रधानमंत्री पीक विमा योजना राबवण्यात येत आहे. या योजनेत समाविष्ट पिकांची यादी

**अन्नधान्य (तृणधान्य व कडधान्य) :** खरीप व उन्हाळी भात, खरीप व रब्बी ज्वारी, बाजरी, गहू, नाचणी, तूर, मूग, उडीद, हरभरा. **गळीत धान्य :** कारळे, खरीप व उन्हाळी भुईमूग, तीळ, सोयाबीन, सूर्यफूल, करडई. **नगदी पिके :** कापूस व कांदा. **उद्देश:** ■ नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे. ■ शेतकऱ्यांना नावीन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे. ■ पिकांच्या नुकसानीच्या कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे. ■ कृषिक्षेत्रासाठीच्या पतपुरवठ्यात सातत्य राखणे. **वैशिष्ट्ये:** ■ राज्यातील कर्जदार शेतकऱ्यांना योजना बंधनकारक करण्यात आली असून बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक ठेवण्यात आली आहे. ■ शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता दर हा खरीप हंगामासाठी २ टक्के तर रबी हंगामासाठी १.५ टक्के तसेच नगदी पिकांसाठी ५ टक्के इतका मर्यादित ठेवण्यात आला आहे. वार्षिक व्यावसायिक आणि फलोत्पादन पिकांसाठी शेतकऱ्यांना ५ टक्के इतका हप्ता भरावा लागेल. नैसर्गिक आपत्तींमुळे होणाऱ्या पीक नुकसानापोटी शेतकऱ्यांना संपूर्ण विमा रक्कम देण्यासाठी विमा हप्त्यांची उर्वरित रक्कम सरकारतर्फे जमा केली जाते. ■ यापूर्वीच्या योजनेमध्ये हप्त्याच्या रकमेवर मर्यादा असल्यामुळे, शेतकऱ्यांना विमा दाव्यांपोटी कमी रक्कम मिळत होती. या योजनेत मात्र सरकारी अनुदानाला कोणतीही कमाल मर्यादा नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना कोणत्याही वजावटीशिवाय विमा दाव्याची संपूर्ण रक्कम मिळणे शक्य झाले आहे.



## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना

अपघातांमुळे मृत्यू किंवा येणाऱ्या अपंगत्वासारख्या संकटांना सामोरे जावे लागलेल्या अपघातग्रस्त शेतकरी व त्याच्या कुटुंबास अभय देण्यासाठी राज्य शासनामार्फत गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत अपघातग्रस्त शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत विमा संरक्षण देण्यात आले आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्याने अथवा शेतकऱ्याच्या वतीने इतर कुठल्याही संस्थेने विमा कंपन्यांकडे स्वतंत्ररीत्या विमा हप्त्याची रक्कम भरण्याची आवश्यकता नाही. तसेच, यापूर्वी शेतकऱ्यांनी अथवा त्याच्या वतीने अन्य कोणत्याही संस्थेने, कोणतीही वेगळी विमा योजना लागू केली असल्यास; अथवा विमा उतरवला असल्यास त्याचा या योजनेशी काहीही संबंध असणार नाही. या योजनेंतर्गत मिळणारे लाभ स्वतंत्र आहेत. या योजनेंतर्गत २०१६-१७ या वर्षात एकूण २७६ प्रस्ताव आले. विमा कंपनीकडून त्यापैकी ३५ प्रस्ताव मंजूर झाले असून ७१ प्रस्ताव मंजूर करण्याची कार्यवाही सुरू आहे. तर १६४ प्रस्तावांची पूर्तता करून घेण्यात येत आहे.

**– अजित बायस**



हवामानविषयक अचूक माहितीचा वेध घेणारी आधुनिक यंत्रणा शासनाने प्रथमच स्कायमेट वेदर सर्व्हिसेसच्या माध्यमातून प्रत्येक महसूल मंडळामध्ये बसवण्याचा निर्णय घेतला आहे. पावसाळ्यापूर्वी राज्यातील सर्वच भागात ही यंत्रणा कार्यान्वित होत असल्यामुळे शेतकऱ्यांना दर दहा मिनिटांनी हवामानविषयक संपूर्ण माहिती उपलब्ध होणार आहे.

नागपूर जिल्ह्यातील डोंगरगाव येथे बसवण्यात आलेल्या हवामानाचा वेध घेणाऱ्या स्वयंचलित यंत्राची पाहणी करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

# हवामानाचा 'महावेध'

हवामानातील बदलामुळे शेतकऱ्यांना कायम नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागतो. सातत्याने पावसात पडणारा प्रदीर्घ खंड, दुबार पेरणीचे संकट त्यासोबतच अवकाळी पडणाऱ्या पावसामुळे होणारी पिकांची मोठ्या प्रमाणात नासाडी अशा अनेक अस्मानी संकटांचा सामना, हवामानाची अचून माहिती मिळत नसल्यामुळे करावा लागत होता. स्वयंचलित हवामान केंद्राचे राज्यात जाळे उभारण्यात येत असल्यामुळे शेतकऱ्यांना आता हवामानाची अचूक माहिती उपलब्ध होणार आहे.

अशी माहिती यापूर्वी नागपूर, पुणे आदी वेधशाळेमार्फत उपलब्ध होत होती. परंतु ही माहिती संपूर्ण विभाग व राज्यासाठी असल्यामुळे शेतकऱ्यांना केवळ अंदाजावर अंवलबून राहावे लागत असे. स्वयंचलित हवामान केंद्रामुळे अचूक माहिती उपलब्ध होणार आहे. या माहितीमध्ये तापमान, पर्जन्यमान, सापेक्ष आर्द्रता, वाऱ्याचा वेग आणि दिशा या हवामानविषयक घटकांची रियल टाइम माहिती उपलब्ध होणार आहे. ही माहिती शेतकऱ्यांना मोफत उपलब्ध होणार असून कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे देण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, अशा प्रकारचा शेतकऱ्यांना रियल टाइम माहिती देणारा प्रकल्प राज्याच्या सर्वच भागात सुरू व्हावा, यासाठी दोन वर्षांपासून पाठपुरावा केल्यामुळेच हा प्रकल्प प्रत्यक्ष कार्यान्वित झाला आहे.

## पहिले राज्य


स्वयंचलित हवामान केंद्राद्वारे मिळणारी संपूर्ण संगणकीय माहिती ग्रामपंचायतमध्ये डिजिटल बोर्डाद्वारे प्रदर्शित करण्यासोबतच, शेतकऱ्यांना हवामानविषयक माहिती एसएमएसद्वारा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांचे दरवर्षी मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान होते. असे नुकसान टाळण्यासाठी अशा प्रकारची स्वयंचलित यंत्रणा कार्यान्वित करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य ठरले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कृषिमंत्री भाऊसाहेब फुंडकर यांच्या उपस्थितीत डोंगरगावच्या पहिल्या केंद्राचे उद्घाटन झाले. राज्यातील सर्व केंद्रे जूनअखेरपर्यंत सुरू करण्यासाठी कृषी विभाग प्रयत्नशील आहे.



## हवामानाची नोंद दर १० मिनिटांनी

**शेतकऱ्यांना हवामानाचा अचूक अंदाज गावापर्यंत पोहोचवण्यासाठी राज्यातील सर्व महसूल मंडळात 'महावेध' प्रकल्पांतर्गत २ हजार ६५ स्वयंचलित हवामान केंद्रे उभारण्यात येणार आहेत. या हवामान केंद्रामुळे १२ कि. मी. परिसरातील अचूक हवामानाची नोंद दर १० मिनिटांनी उपलब्ध होणार आहे. या हवामान नोंदीमध्ये पर्जन्यमान, तापमान, हवेची सापेक्ष आर्द्रता, वाऱ्याचा वेग आणि दिशा या वातावरणातील घटकांचे मोजमाप करण्यात येईल. जमा झालेली हवामानविषयक माहिती हवामानावर**



**आधारित पीक विमा योजना, पिकविषयक सल्ला, हवामानविषयक संशोधन आणि इतर कल्याणकारी योजना राबवण्यासाठी साहाय्यभूत ठरणार आहे.**

**'कृषी विभाग' व 'स्कायमेट वेदर सर्व्हिसेस' यांच्या संयुक्त भागीदारीतून स्वयंचलित हवामान केंद्राचा प्रकल्प कार्यान्वित झाला आहे. या केंद्रांसाठी आवश्यक असणाऱ्या जागा उपलब्ध झाल्या आहेत. शेतकऱ्यांनी गावातच अचूक हवामानाची माहिती घेऊन पिकांचे योग्य नियोजन करणे शक्य होईल.**

**– अपर्णा डांगोरे–यावलकर**

## माहितीमध्ये अचूकता

महावेध या प्रकल्पासाठी महसूल विभागातर्फे जागा उपलब्ध करून दिली असून, स्कायमेट वेदर सर्व्हिसेस गुंतवणुकीतून हवामान केंद्राची उभारणी करून, पुढील सात वर्षात स्व:खर्चाने चालवणार आहे. शासनास सार्वजनिक उपयोगाच्या प्रकल्पाकरिता ही संपूर्ण माहिती उपलब्ध होणार आहे. या माहितीचा उपयोग पीक विमा योजना, हवामान आधारित पीक विमा योजना, कृषी हवामान सल्ला व मार्गदर्शन, कृषी संशोधन व आपत्ती व्यवस्थापनासाठी होणार आहे. या केंद्रांच्या निर्माण होणाऱ्या जाळ्यामुळे हवामानाच्या माहितीमुळे अचूकता येणार आहे. त्यासोबतच संशोधन व अव्यावसायिक स्वरूपाच्या सेवा देण्यासाठी शासनाच्या अधीनस्थ असलेल्या संस्था व विद्यापीठांना संशोधन कार्यासाठी ही माहिती नि:शुल्क उपलब्ध होणार आहे.

## सर्व महसूल मंडळांत सुविधा

राज्यातील सर्व महसूल मंडळात स्वयंचलित हवामान केंद्र उभारण्यात येणार असून यामध्ये सर्वाधिक एकशे एक केंद्र यवतमाळ जिल्ह्यात असून पुणे जिल्ह्यात शंभर, सोलापूर ९१, नाशिक ९२, बुलढाणा ९०, सातारा ९१, अहमदनगर ९७, तसेच अतिदुर्गम व डोंगराळ भागातही महसूल मंडळाप्रमाणे केंद्र सुरू करण्यत येणार आहे. गडचिरोली जिल्ह्यात ४०, चंद्रपूर ५०, गोंदिया २५, वर्धा ४७ तर नागपूर जिल्ह्यातील ७० केंद्रांचा यामध्ये समावेश आहे. 'महावेध' हा प्रकल्प स्कायमेट वेदर सर्व्हिसेस स्व:खर्चाने चालवणार आहे. तसेच शासनास मोफत हवामानविषयक माहिती पुरवणार आहे.

## महावेध प्रकल्पाचे फायदे

- शेतकरी कल्याणाचा हा उद्देश समोर ठेवून शेतकरी आणि सार्वजनिक हितासाठी हवामानविषयक सर्व माहिती व सल्ला मोफत उपलब्ध करून देणे.
- महसूल मंडळात हवामान सल्ला केंद्र विकसित करणे.
- कृषी हवामान सल्ला शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचवणे.
- नैसर्गिक आपत्तीची पूर्वकल्पना व आपत्ती व्यवस्थापन.
- संशोधन आणि विकास.
- कल्याणकारी विकासाच्या योजना राबवण्यास साहाय्यभूत.

स्वयंचलित हवामान केंद्राद्वारे माहितीचे संकलन, हवामान केंद्र स्कायमेट माहिती संकलकाशी जोडलेली आहे आणि संवेदकाद्वारे नोंद केलेली हवामानाची आकडेवारी संकलित होते. स्वयंचलित हवामान केंद्र सौर घटकांवर चालत असल्यामुळे देखभाल कमी करावी लागते. या केंद्राद्वारे तापमान, पर्जन्यमान, आर्द्रता व वाऱ्याच्या दिशाची नोंद होत असल्याने शेतकऱ्यांना वेळोवेळी हवामानाबद्दल सूचना व सल्ला देण्यास सक्षम यंत्रणा उभी राहिली आहे.

**– अनिल गडेकर**

जिल्हा माहिती अधिकारी, नागपूर



# पावसाचे शुभवर्तमान

**भारतीय अर्थव्यवस्था अद्यापही शेतीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. आपल्या देशात कृषिक्षेत्र सकल देशांतर्गत उत्पादनाच्या सुमारे १८ टक्के योगदान देते. त्यामुळे कृषिक्षेत्रावर अधिक लक्ष केंद्रित करणे आवश्यक ठरते. जून ते सप्टेंबरपर्यंतच्या चार महिन्यांना मान्सून म्हणतात. भारताच्या वार्षिक पावसापैकी ७५ टक्क्यांपेक्षा जास्त पाऊस या कालावधीतच होतो. या हंगामात उगवलेली खरीप पिके नैऋत्य मान्सूनच्या पावसावर अवलंबून असतात. या हंगामात चांगला पाऊस पडला तर शेतकऱ्यांना अधिक फायदा होतो.**

गेल्या काही वर्षांमध्ये, असे दिसून आले आहे की, देशभर पावसाचे परिमाण, स्थानिक व ऐहिक वितरण यामध्ये खूप फरक आहे. काही वेळा, पावसाळा लवकर येऊ शकतो आणि बराच काळ राहू शकतो किंवा खूप उशिरा येऊ शकतो. त्याव्यतिरिक्त काही भागांमध्ये खूप जास्त पाऊस पडतो. काही भागात इतरांपेक्षा खूप कमी असतो. अखेरीस पूर आणि दुष्काळ पडतो. खरीप पिकांच्या उत्पादनावर त्याचा परिणाम होतो.

## हवामान अंदाजाचे टप्पे

मान्सूनच्या वाटचालीची कल्पना देण्यासाठी, भारतीय हवामान विभाग दोन टप्प्यांत पावसाचा अंदाज देते. यंदाही २०१७ च्या मान्सूनचा पहिला टप्पा १८ एप्रिल रोजी जाहीर केला आहे. दुसरा टप्पा जूनच्या सुरुवातीलाच जाहीर केला जाईल. पहिल्या टप्प्यात संपूर्ण देशासाठी नैऋत्य मोसमी पावसाचा अंदाज दिला जातो. दुसऱ्या टप्प्यात ४ महिन्यांसाठी हंगामी पाऊस, ४ एकसंध क्षेत्रासाठी (उत्तर-पश्चिम भारत, मध्य भारत, दक्षिण प्रायद्वीप आणि उत्तर-पूर्व भारत) अंदाज आणि जुलै व ऑगस्ट महिन्याच्या मासिक अंदाजाचा समावेश आहे.

## पावसाच्या अंदाजासाठी 'सीएफएस'

२०१२ पासून, हवामान खाते 'डायनामिकल ग्लोबल हवामान अंदाज प्रणाली' (सीएफएस) मॉडेलचा वापर करीत आहे. हे मान्सून मिशनच्या अंतर्गत विकसित करण्यात आले आहे. सीएफएसची मूळ जोडलेली समुद्री-वायुमंडलातील मॉडेल फ्रेमवर्क, नॅशनल सेंटर फॉर

एनव्हॉयरमेंन्टल प्रेडिक्शन (एनसीईपी), यूएसएकडून घेतली गेली आहेत. मान्सून मिशन अंतर्गत हाती घेण्यात आलेल्या संशोधनाच्या माध्यमातून भारतीय मान्सून क्षेत्रामध्ये सुधारित पाऊस अंदाज देण्यासाठी सीएफएस मॉडेल पुढे सुधारित करण्यात आले. संपूर्ण देशभरातील दक्षिण-पश्चिम मॉन्सूनचा २०१७ चा पावसाचा अंदाज दोन्ही एसइएफएस आणि मान्सून मिशन सीएफएस (एमएमसीएफएस) वर आधारित आहे. या मॉडेलमध्ये एप्रिलपर्यंतच्या अंदाजासाठी ५ घटक (सूचक) वापरले आहेत व त्यासाठी मार्चपर्यंत निरीक्षण केल्या गेलेल्या माहितीची आवश्यकता असते.

## हवामान अंदाजाचे पाच घटक

- उत्तर अटलांटिक आणि उत्तर पॅसिफिक दरम्यान असलेल्या सागरी पृष्ठभागाच्या तापमानातील फरक (डिसेंबर + जानेवारी)
- भूमध्य रेखीय दक्षिण हिंदी महासागर समुद्र पृष्ठभाग तापमान (फेब्रुवारी)
- पूर्व आशिया समुद्र पातळीवरील दबाव (मार्च)
- उत्तर-पश्चिम जमीन पृष्ठभाग युरोप वायू तापमान (जानेवारी)
- भूमध्य रेखीय प्रशांत उष्ण पाणी आकारमान (फेब्रुवारी + मार्च)

## पावसाचे मापदंड

संपूर्ण देशातील दक्षिण-पश्चिम मान्सूनचा अंदाज दोन्ही एसइएफएस आणि मान्सून मिशन सीएफएस (एमएमसीएफएस) वर आधारित आहे. २०१७ मध्ये, प्रमाणानुसार, संपूर्ण देशासाठी + ५% च्या त्रुटी धरून मान्सूनचा हंगामी पाऊस दीर्घ कालावधीत सरासरी ९६% राहील.

इतर बाकी घटकामध्ये एलनिनो आणि हिंदी महासागर डायपोल (आयओडी) देशातील मान्सूनच्या पावसाचे महत्त्वाचे मापदंड आहेत. १८ एप्रिल २०१७ रोजी आयएमडीने दिलेल्या माहितीनुसार असे नमूद केले आहे की, सध्या तटस्थ (हिंदी महासागर डायपोल (आयओडी)) परिस्थिती हिंदी महासागरात स्थित आहे. एमएमसीएफसीएसकडून मिळालेल्या अलीकडच्या अंदाजानुसार पावसाळ्याच्या मधोमध असताना कमकुवत सकारात्मक आयओडीची स्थिती विकसित होण्याची शक्यता आहे. त्यानंतर काही महिने टिकून राहण्याची शक्यता आहे.

सामान्य / वरील सामान्य पावसासाठी सकारात्मक आयओडीची स्थिती अनुकूल असेल. प्रशांत महासागराच्या पृष्ठभागावरील अतिमहत्त्वाच्या परिस्थितीमुळे (एलनिनो किंवा ला नीना) आणि इक्वेटोरियल हिंद महासागरावर सकारात्मक आयओडी डेव्हलपमेंटमुळे भारतीय उन्हाळ्याच्या मान्सूनवर सशक्त प्रभाव पडला आहे. प्रशांत आणि भारतीय महासागरांच्या समुद्राच्या पृष्ठभागावर चालू असलेल्या घडामोडींचे आयएमडी काळजीपूर्वक निरीक्षण करीत आहे.

**१० मे रोजीच्या मान्सूनपूर्व हंगामात, खालील जिल्ह्यांमध्ये पाऊस पडला असून उर्वरित जिल्ह्यांमध्ये हवामान कोरडे होते. त्याची आठवड्याची आकडेवारी आणि पूर्वहंगामाची निर्गमनाची स्थिती खालीलप्रमाणे:**

| जिल्हा | ४ मे ते १० मे २०१७ पर्यंत आठवड्याचा पाऊस (मिमी) | हंगामासाठी १ मार्च ते १० मे २०१७ पर्यंतचा पाऊस (मिमी) | सामान्य पासून निर्गमन % | जिल्हा | ४ मे ते १० मे २०१७ पर्यंत आठवड्याचा पाऊस (मिमी) | ४ मे ते १० मे २०१७ पर्यंत आठवड्याचा पाऊस (मिमी) | सामान्य पासून निर्गमन % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रत्नागिरी | १.० | १.० | -८३ | अकोला | ० | ०.१ | -९९ |
| सिंधुदुर्ग | ११.८ | ११.८ | १० | परभणी | ० | १.९ | -८९ |
| जळगाव | १३.० | १३.० | ९१ | भंडारा | २.१ | १०.१ | -६१ |
| कोल्हापूर | ११.४ | १२.५ | -७१ | चंद्रपूर | १.४ | २३.५ | -११ |
| नाशिक | ३.० | ३. १ | -६४ | गडचिरोली | १.५ | १५.४ | -४५ |
| सांगली | १४.४ | १९.० | -५४ | नागपूर | ८.५ | १.२ | -६७ |
| सातारा | ९.२ | १३.५ | -४६ | वर्धा | २.० | ०.३ | -९१ |
| सोलापूर | ४.८ | ८.३ | -५२ | बुलढाणा | ० | १.२ | -८८ |
| लातूर | १.३ | १३.८ | -३७ | वाशिम | ० | १.३ | -९० |
| उस्मानाबाद | ३.१ | १५.५ | ०२ | बीड | ० | ५.७ | -५७ |
| | | | | गोंदिया | ० | ६.३ | -७७ |

## पशुधन / स्थायी पिकांसाठी हवामानावर आधारित कृषी सल्ला

- विदर्भातील उष्णतेची लाट परिस्थिती / उच्च तापमानानुसार, दुपारी दीड तासांच्या आत शेड / शेड अंतर्गत जनावरांना ठेवा आणि खनिजांच्या मिश्रणामध्ये भरपूर पाणी मिसळून प्यायला द्या. शेळी / मेंढ्यांचे चारा / आहार सकाळी / संध्याकाळी केला जाऊ शकतो. ठरावीक तासानंतर निवारा छपरावर पाण्याची फवारणी करावी. कुक्कुटपालनाच्या शेडमध्ये स्प्रिंकलर्सची व्यवस्था करा आणि फीड सेवन वाढवण्यासाठी ओले गोणपाट लावा. शेडमध्ये हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी. गरम वाऱ्याचा प्रभाव कमी करण्यासाठी कुक्कुटपालन करताना घराच्या वायव्येकडे पडदे करावेत.
- विदर्भात अपेक्षित उष्णतेच्या प्रभावाचा परिणाम कमी करण्यासाठी व उच्च तापमानामुळे होणारी बाष्पीभवनाची मागणी टाळण्यासाठी उभ्या पिकासाठी आणि शेतीसाठी सिंचन वापरावे.
- उन्हाळी भुईमूग, मका, भाज्या, उसासाठी आवश्यकतेनुसार पाणी द्यावे. कोकणात आणि पूर्व विदर्भातील भात पिकामध्ये पाण्याची पातळी योग्य ठेवणे.
- उत्तर मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात केळीच्या घडांना गोणपाटाने झाकावे. ऊसाच्या पाचटाचे सरीमध्ये आच्छादन करावे.
- पूर्वमोसमी पावसाचा उपयोग करून शेतात खोल नांगरणी करावी. सध्याचे तापमान शेतातील नांगरणी केल्यावर असलेल्या कीड व अळ्या नष्ट होण्यास अनुकूल आहे.
- कोकणात शेताची नांगरणी करा आणि खरीप हंगामासाठी पूर्वतयारी आणि भात रोपवाटिकेची तयारी करा.
- कोल्हापूर विभागात, खरीप हंगामासाठी आणि भात थेट पेरणीसाठी जमीन तयार करावी.

### नैऋत्य मोसमी पाऊस

नैऋत्य मोसमी पावसाच्या १५ मे च्या अंदाजानुसार, १४ मे २०१७ पर्यंत पाऊस दक्षिणपूर्व बंगालच्या उपशाखा, निकोबार द्वीपसमूह, संपूर्ण दक्षिण अंदमान समुद्र आणि उत्तर अंदमान समुद्राच्या काही भागांमध्ये आला आहे. पुढील ४८ तासात नैऋत्य मोसमी पावसाच्या पुढील वाटचालीसाठी म्हणजे दक्षिण पश्चिम बंगालच्या काही भागांमध्ये, आग्नेय बंगालच्या उपसागराच्या काही भागात, अंदमान समुद्रातील व अंदमान-निकोबार बेटे आणि बंगालच्या पूर्वेकडील काही भागात परिस्थिती अनुकूल आहे.

एप्रिल अखेरपासून दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा येथे पूर्व मोसमी पावसाची सुरुवात झाली. महाराष्ट्रातील सर्व उपविभागामध्ये विखुरलेल्या ठिकाणी गेल्या दोन आठवड्यांपूर्वी पूर्वमोसमी पावसाची नोंद झाली आहे. तथापि, दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि दक्षिण कोकणमध्ये पावसाची जास्त नोंद करण्यात आली.



महाराष्ट्रातील शेतकरी जागरूकता कार्यक्रम आणि प्रगतिशील शेतकऱ्यांना वितरित केलेल्या रेनगेजेस.

चांगल्या पावसाचा अंदाज सुरुवातीस दिला असला तरी, त्याचबरोबर जून महिन्यातसुद्धा देशभरातील पावसाचा अंदाज आणि शिवाय चार एकसंध भागावर तुलनात्मकदृष्ट्या अधिक माहिती उपलब्ध करून दिली जाईल. भारतीय हवामानशास्त्र विभाग (आयएमडी) मान्सूनच्या हंगामासाठी तसेच अन्य हंगामांमध्ये विविध स्थानिक व ऐहिक पातळीवरील लघुश्रेणी, मध्यम श्रेणी, विस्तारित रेंज आणि हंगामी मापांवर हवामान अंदाज तयार करते. या अंदाजानुसार कृषी क्षेत्रात रणनीतिक निर्णयांसाठी वापरला जातो.

### सुसज्ज यंत्रणा

महाराष्ट्रात वेधशाळांची आणि कृषी सहयोगी संस्थांची चांगली

व्यवस्था आहे. या महाराष्ट्रात ४६ पृष्ठीय वेधशाळा, ३३ कृषी हवामान वेधशाळा, ५ बाष्पीभवन केंद्रे, २ माती नमुना केंद्रे आणि ४ दव मापक केंद्रे आहेत. आधुनिकीकरणाच्या योजनेनुसार, महाराष्ट्रात ४९ स्वयंचलित हवामान केंद्रे (एडब्ल्यूएस) आणि ६९ स्वयंचलित पाऊस गेज (एआरजी) बसवण्यात आली आहेत. मुंबई आणि नागपूर येथे डॉपलर हवामान रडार (डीडब्ल्यूआर) देखील आहेत. उपग्रह माहितीदेखील अंदाज देण्यासाठी वापरली जाते. राज्यामध्ये आधुनिकीकरण योजनेच्या दुसऱ्या टप्प्यादरम्यान १५ एआरजी स्थापित करणे प्रस्तावित आहे.

कृषी क्षेत्रासाठी मान्सूनची पहिली आणि महत्त्वपूर्ण माहिती म्हणजे मान्सूनची महाराष्ट्रात वाटचाल कशी आहे. महाराष्ट्रात सामान्यतः पावसाळा सुरु होण्याची तारीख ७ ते १५ जून दरम्यान असते. पावसाळा सुरु होण्याची तारीख पीक पेरणीसाठी महत्त्वाची असते. पावसाच्या आगमनानंतरचे अंदाजपत्रक खते तसेच पाणी देण्यासाठी, शिवाय पिकाच्या वाढीच्या अवस्थांसाठी दिले जाते.

## हवामान माहितीचा प्रसार

हवामानाचा अंदाज आणि कृषी संदेश प्रसारण रेडिओ, दूरदर्शन, इलेक्ट्रॉनिक आणि प्रिंट माध्यम इत्यादीद्वारे केले जाते. कृषी संदेश 'डीडी किसान' चॅनलच्या माध्यमातून प्रसारित करण्यासाठी पुढाकार घेतला गेला आहे. महाराष्ट्रात ७०,७२,९७७ शेतकऱ्यांना मल्टि-चॅनल वितरण यंत्रणा, एसएमएस आणि आयव्हीआर आणि शिवाय सार्वजनिक पब्लिक प्रायव्हेट पार्टनर (रायटर मार्केट लाइट, हॅन्डीगो, इफ्को किसान संचार लिमिटेड (आयकेएसएल), नोकिया, नाबार्ड, महिन्द्रा समृद्धी यांच्या साहाय्याने हवामानावर आधारित कृषी संदेश पाठवले जातात.

भारत सरकारच्या कृषी मंत्रालयाच्या किसान एसएमएस पोर्टलद्वारे (http://farmer.gov.in/) कृषी संदेश एसएमएसद्वारे कळवले जातात. जर शेतकरी किसान पोर्टलची एसएमएस सेवा सुरू करू इच्छित असेल तर तो / ती कृषी हवामान विभागाच्या (www.imdagrimet.gov.in) संकेतस्थळावर नोंदणी करू शकतो. नोंदणीतील कोणत्याही समस्येसाठी, शेतकरी कृषी हवामान विभागाच्या ०२०-२५५७२३०४ / ३१० या फोन नंबरवर संपर्क साधू शकतात.

मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागात तीव्र हवामान घटना घडत आहेत. वादळ आणि अवेळी पाऊस या ठिकाणी होत आहे. अशा घटनांमध्ये ॲग्रोमेट फिल्ड युनिट्सच्या सहकार्याने कृषी विभाग कृषी संदेश देत असते. पशुधन, पोल्ट्री आणि अंतर्देशीय मत्स्यव्यवसाय यावरील माहितीचा प्रसार करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.


शेतकरी जागरूकता कार्यक्रम शेतकऱ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्रात तसेच देशामध्ये ॲग्रोमेट फिल्ड युनिट्सद्वारे आयोजित केला जातो. शेतकरी जागरूकता कार्यक्रमात मोबाइलद्वारे कृषी संदेश देण्यासाठी शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात येते. शेतकरी जागरूकता कार्यक्रमात पाच प्रगतिशील शेतकऱ्यांना रेनगेजचे वाटप करण्यात येते.

**- डॉ. एन. चट्टोपाध्याय**
प्रमुख आणि वैज्ञानिक, ॲग्रोमेट विभाग,
भारतीय हवामान विभाग, शिवाजीनगर, पुणे

### कृषी सल्ल्यासाठी ९ ॲग्रोमेट फिल्ड युनिट्स


**सध्या आयएमडीद्वारे महाराष्ट्र राज्यातील जिल्ह्यांसाठी मध्यम रेंज हवामान अंदाज आणि त्यानुसार कृषी सल्ला (एमआरडब्ल्यूएफ) आठवड्यातून दोनदा कृषी विभागाच्या सहकार्याने दिला जातो. चार राज्य कृषी विद्यापीठात असलेल्या ९ ॲग्रोमेट फिल्ड युनिट्स (एएमएफयू)द्वारे कृषी सल्ला दिला जातो. भारतात एकूण १३० ॲग्रोमेट फिल्ड युनिट्स आहेत. ग्रामीण कृषी हवामान सेवा योजनेंतर्गत ही केंद्रे कृषिसल्ला बनवण्याचे आणि शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे पाठवण्याचे काम करीत असतात. या सल्ल्यामध्ये पाऊस उशिरा किंवा कमी असेल तर कोणती पिके घ्यावी, याबाबत मार्गदर्शन केले जाते.**

**आकस्मिक नियोजनाच्या संदर्भात अनुकूलन उपायासाठी राज्यातील असमान पावसाचा अंदाज असेल तर विस्तारित हवामानाचा अंदाज देखील वापरला जातो. मान्सूनच्या कामगिरीसाठी व पीक नियोजनासाठी विस्तारित अंदाज दिला जाईल. मागील पंधरा दिवसांचा सारांश आणि पंधरा दिवसाच्या भविष्यवाणीनंतर पेरणीच्या पलीकडे जाऊन; जर पाऊस नाही पडला तर कोणती पिके घ्यावीत, यासाठी विस्तारित हवामानाचा अंदाज उपयोगी पडतो.**




महाराष्ट्रातील ९ ॲग्रोमेट फिल्ड युनिट्सचे नेटवर्क





**महाराष्ट्राची निम्मी लोकसंख्या शेतीक्षेत्रावर अवलंबून आहे. मात्र, राज्याच्या एकूण उत्पादनात या क्षेत्राचा वाटा केवळ १०.५ टक्के आहे. कमी गुंतवणुकीमुळे कमी उत्पादन क्षमता असल्याने शेतीतील दीर्घकालीन गुंतवणूक वाढवण्यावर राज्य शासनाने भर दिला आहे. शेतीला गुंतवणुकीचे क्षेत्र बनवून २०२१ पर्यंत उत्पन्नात दुप्पट वाढ करण्याचा राज्य शासनाचा संकल्प आहे. त्यासाठी राबवल्या जाणाऱ्या विविध योजना व उपक्रमांचा हा आढावा...**



# सारे काही शेतकऱ्यांसाठी...

२०१६ हे वर्ष 'शेतकरी स्वाभिमान वर्ष' म्हणून साजरे करण्यात आले. गेल्या वर्षी अर्थसंकल्पामध्ये ३१ हजार कोटीच्या भांडवली गुंतवणुकीपैकी १९ हजार कोटींची गुंतवणूक केवळ शेती क्षेत्रात करण्यात आली होती. यंदा ती २६ हजार कोटींवर जाणार आहे. सिंचन, ऊर्जा, शेत रस्ते, कृषी प्रक्रिया उद्योग, कृषी तंत्रज्ञान, विपणन, समूह शेती, कृषी पतपुरवठा यावर लक्ष केंद्रित करून विशेष योजना राबवण्याचा शासनाने निश्चय केला आहे.

## कर्जमुक्ती

१ कोटी ३७ लाख खातेदार शेतकऱ्यांपैकी सुमारे २६ लाख शेतकरी थकीत कर्जामुळे संस्थात्मक कर्जव्यवस्थेबाहेर असून त्यांना पुन्हा कर्जास पात्र करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेसाठी १२५ कोटी ६४ लाख रुपयांची तरतूद तसेच पीक कर्जाचे मोठ्या प्रमाणावर पुनर्गठन करण्यात आले. पुनर्गठित शेतकऱ्यांना नव्याने कर्ज देण्याचा निर्णय घेतला गेला. पहिल्या वर्षाचे व्याज शासनाने भरले असून पुढील चार वर्षाचे निम्मे व्याजही शासन भरणार आहे. याशिवाय पीक विम्यासाठी २ हजार कोटी, नैसर्गिक आपत्तीसाठी ८ हजार कोटी तर कृषी समृद्धीसाठी दीड हजार कोटी असे एकूण ११ हजार ५०० कोटी स्वतंत्ररीत्या दिले आहेत.

## कृषी प्रक्रिया उद्योगाला चालना

राज्याकडून कृषी प्रक्रिया उद्योगाला मोठ्या प्रमाणात चालना देण्यात येत आहे. 'मेक इन इंडिया वीक' या कार्यक्रमात कृषी प्रक्रियाविषयक राज्यातील महत्त्वाकांक्षी तीन प्रकल्पांचे सामंजस्य करार झाले. त्याची अंमलबजावणीही सुरू झाली आहे. कृषी प्रक्रिया

उद्योगांच्या निर्मितीमुळे बाजारपेठ शेतकऱ्यांच्या हातात येणार आहे. त्याचा शेतकऱ्यांना फायदा होईल. कृषी प्रक्रिया उद्योग सुरू करण्यासाठी शासनाकडून प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के किंवा ५० लाख रुपये एवढे अनुदान मिळणार आहे. प्रक्रिया उद्योगांना पुरेसा कच्चा माल उपलब्ध व्हावा म्हणून शेतकऱ्यांच्या मूल्यवर्धित साखळ्या तयार करण्यात आल्या. या साखळ्यांमधून ५ लाखांहून अधिक शेतकरी ६४ प्रकल्पांद्वारे जोडले गेले आहेत.

जालना येथील सिंदखेडराजा रस्त्यालगत ३० हेक्टर जागेवर सीड पार्कची निर्मिती केली जात आहे. काटोल येथे १३० एकर जागेवर संत्रा व डाळिंब या फळावर प्रक्रिया करणारा उद्योग सुरू करण्यात येणार आहे.

### शाश्वत सिंचन

राज्यामध्ये सध्या ठिबक व तुषार सिंचनाखाली १८.८७ लाख हेक्टर क्षेत्र आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेसाठी २८१२ कोटी, जलयुक्त शिवारसाठी १२०० कोटींची तरतूद करण्यात आली असून मनरेगा अंतर्गत विहिरी व मागेल त्याला शेततळे यासाठी २२५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यातील १ लाख २५ हजार हेक्टर कृषी क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणले जाणार आहे. २०१७-१८ मध्ये जलसंपदा विभागासाठी ८ हजार २३३ कोटी रुपये एवढी भरीव तरतूद करण्यात आली आहे. केंद्र आणि नाबार्डच्या मदतीने सिंचन प्रकल्पांसाठी सुमारे ९००० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले.

### मागेल त्याला शेततळे

दुष्काळ निवारण आणि पर्जन्यावर आधारित कोरडवाहू शेतीची पाणलोट व जलसंधारण माध्यमातून जलसिंचनाची उपलब्धता वाढविता यावी तसेच संरक्षित व शाश्वत सिंचनाची सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने 'मागेल त्याला शेततळे' ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांच्या नावावर कमीत कमी ०.६० हेक्टर जमीन असणे आवश्यक आहे. यात कुठलीही कमाल मर्यादा नाही. योजनेंतर्गत ३० x ३० x ३ मीटर आकारमानाच्या शेततळ्यासाठी ५०,००० रुपये अनुदान देण्यात येते.

या योजनेमध्ये २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये १ लाख ११ हजार १११ शेततळी निर्माण केली जाणार आहेत. त्यासाठी ५०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी १५० कोटी निधी संबंधित जिल्ह्यांना वर्ग करण्यात आला आहे. शेततळ्याच्या निर्मितीसाठी शेतकऱ्याला ५० हजाराचे अनुदान मिळणार आहे. सध्या १ लाख ८९ हजार ९४१ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी पात्र अर्जांची संख्या १ लाख २७ हजार ९०६ एवढी आहे. १ लाख ३ हजार १७० शेततळ्यांच्या कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. २०१६-१७ या वर्षात एकूण ३५ हजार १३३ शेततळ्यांची कामे पूर्ण झाली.

कृषी विशेष

### धडक सिंचन विहिरी

नागपूर विभागात मोठ्या प्रमाणात सिंचनाच्या सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी ११ हजार सिंचन विहिरींचा विशेष कार्यक्रम सुरू असून ६ हजार २८७ विहिरींचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. धडक सिंचन विहीर योजनेतून नरेगामध्ये वर्ग केलेल्या ८३ हजार २०० विहिरी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. मंजूर करण्यात आलेल्या ६३ हजार ९६२ विहिरींपैकी ४० हजार ३३५ विहिरी पूर्ण झाल्या आहेत.

### गाळमुक्त तलाव- गाळयुक्त शिवार

गाळाच्या साठवणक्षमतेवर होणारा परिणाम लक्षात घेता अडिचशे हेक्टरपेक्षा कमी लाभक्षेत्राच्या ५ वर्षांपेक्षा जुन्या ३१ हजार ४५९ धरणांमधील गाळ शेतात पसरविण्यात येणार आहे. या धरणांमधील अंदाजे ५.१८ लक्ष स.घ.मी. गाळ काढण्यासाठी ६ हजार २३६ कोटी खर्च अपेक्षित असून पुढील चार वर्षात टप्प्याटप्प्याने संपूर्ण गाळ काढण्यात येणार आहे.

### वीजपुरवठा

गेल्या अडीच वर्षात २ लाख ७५ हजार शेतकऱ्यांना शेती पंपासाठी वीज जोडणी देण्यात आली. मागणी केलेल्या आणखी दोन लाख वीजजोडण्या लवकरच दिल्या जातील.

### बी-बियाणे खतांचा पुरेसा पुरवठा

खरीप २०१७ साठी रासायनिक खतांचे मंजूर नियोजन ३९ लाख मे.टन. म्हणजेच मागील वर्षाच्या तुलनेत २४ टक्क्याने जास्त करण्यात आले आहे. बियाण्यांची गरज साडेसोळा लाख क्विंटल एवढी असून अठरा लाख क्विंटल बियाणे उपलब्ध करून दिली गेली आहेत. दि. १ एप्रिलपासून महाबीजचे संपूर्ण कामकाज ऑनलाईन झाल्याने बियाणे प्लॉट घेण्यापासून ते बियाणे उत्पादन आणि त्याची वितरकाकडे विक्री या सर्व बाबी ऑनलाईन करता येतील.

### गुण नियंत्रणासाठी टोल फ्री क्रमांक

प्रत्येक खते, बियाणे, कीटकनाशके विक्रीबाबत तक्रार असल्यास, तक्रारीसाठी १८००-२३३-४००० हा टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे. तक्रारींवर त्वरित कार्यवाहीसाठी ३९५ भरारी पथकांची निर्मिती करण्यात आली आहे.

### तंत्रज्ञानाचा वापर

किसान एसएमएस सेवेमध्ये राज्यात सुमारे ५० लाख शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे. आजपर्यंत या सेवेतून ७१ कोटी एसएमएस पाठवण्यात आले आहेत. राज्यामध्ये ३१ शासकीय व १३७ अशासकीय

माती परीक्षण चाचणी केंद्रे कार्यान्वित करण्यात आली. आजपर्यंत १ कोटी २० लाख माती परीक्षण कार्डांचे वाटप करण्यात आले.

## कोरडवाहू शेती तंत्रावर भर

शेतकरी गटांच्या माध्यमातून कोरडवाहू शेती अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. कृषी विभागाच्या विविध योजनांची याला जोड देण्यात येणार आहे. उत्पादकता वाढवण्यासाठी मुलस्थानी जलसंधारण, रुंद वरंबा-सरी पद्धत, कमी पाण्यावर अधिक उत्पन्न देणाऱ्या जातीची लागवड, सूक्ष्म सिंचनासह मिश्र पीक पद्धतीवर भर देण्यात येणार आहे.

## ऑनलाइन कीड सर्वेक्षण प्रकल्प

भात, सोयाबीन, कापूस, हरभरा, तूर या पिकांबरोबरच फळपिकांसाठी ऑनलाइन कीड व रोग सर्वेक्षण प्रकल्प राबवण्यात येत आहेत. शास्त्रज्ञांकडून करावयाच्या उपाययोजनेची माहिती एसएमएस तसेच ग्रामपंचायतीच्या माहिती फलकावर लावली जाणार आहे. यामुळे कीड व रोगांमुळे होणाऱ्या नुकसानीस आळा बसेल.



## फलोत्पादन विकास

राज्याच्या रोहयो योजनेंतर्गत गेल्या वर्षी ३१७७ हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड करण्यात आली. तर मनरेगा योजनेंतर्गत गेल्या वर्षात १४ हजार ६१३ हेक्टर क्षेत्र फळबाग लागवड करण्यात आली. कृषिमालाच्या निर्यातीसाठी ग्रेपनेट, अनारनेट, मँगोनेट व व्हेजनेट या ऑनलाइन कार्यप्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. २०१६-१७ मध्ये ग्रेपनेट अंतर्गत ३८ हजार ४४ द्राक्ष बागायतदारांची नोंदणी झाली. युरोपियन युनियनला ९३०० मे. टन (६९३४ कंटेनर) द्राक्षांची विक्रमी निर्यात केली गेली. सीताफळ लागवडीच्या क्षेत्रात देशात राज्य प्रथम क्रमांकावर राहिले. राज्यात सुमारे ७० हजार हेक्टर क्षेत्र सीताफळ लागवडीखाली आहे. १ लाख हेक्टर क्षेत्र फळबागेखाली आणण्यासाठी जिल्हानिहाय नियोजन करण्यात आले आहे.

## 'जलयुक्त शिवार'ने बदलला महाराष्ट्राचा चेहरामोहरा

राज्यातील पाणीटंचाईचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी जलयुक्त शिवार अभियानांतर्गत २८ एप्रिल २०१७ पर्यंत ११ हजार ४९४ गावांमध्ये ४९५४ कोटी रुपयांची ३ लाख ३५ हजार ७८५ कामे पूर्ण झाली. उर्वरित कामे वेगाने सुरू आहेत. या कामांतून २०१५-१६ या एका वर्षात ११ लाख ८२ हजार टीसीएम पाणीसाठ्यातून १२ लाख ५१ हजार ७१३ हेक्टर क्षेत्रास एकवेळचे संरक्षित सिंचन उपलब्ध झाले. ५४४ कोटींची कामे लोकसहभागातून झाली. या अभियानासाठी राज्य शासनाकडून ३४०० कोटी रुपयांचा विशेष निधी मंजूर करण्यात आला.

## महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने सुरू करण्यात आला आहे. त्याअंतर्गत राज्यात १२ हजार ६९७ शेतकरी गट स्थापन झाले आहेत. दोन लाख १५ हजार ८४९ शेतकऱ्यांचे बळकटीकरण करण्यात आले. ३७८ शेतकरी उत्पादक कंपन्यांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मार्च २०१७ पर्यंत या प्रकल्पामार्फत ६४ हजार ८३१ पीक प्रात्यक्षिके झाली. सार्वजनिक खासगी भागीदारीतून १८ हजार ४३ मे.टन शेतमालाची थेट खरेदी केली गेली.

## प्रभावी पणन व्यवस्था

शेतमाल विक्रीमध्ये स्पर्धा निर्माण करण्यासाठी थेट पणन, एकल परवाना व खासगी बाजारांना चालना देण्यात येत आहे. संत शिरोमणी श्री सावता माळी आठवडे बाजार योजनेंतर्गत शेतकऱ्याला चांगला रोख भाव, ग्राहकांना ताजी फळे व भाजीपाला वाजवी दरात उपलब्ध होत आहे. या योजनेंतर्गत विविध शहरांत ९९ आठवडे बाजार सुरू करण्यात आले आहे. त्यात पुणे शहर-४२, सोलापूर शहर-३, मुंबई-२७, नवी मुंबई-७, ठाणे शहर-९, नागपूर शहर-३, कोल्हापूर शहर-५ तर औरंगाबाद येथे तीन ठिकाणी असे आठवडी बाजार सुरू करण्यात आले आहेत. राष्ट्रीय कृषी बाजारामुळे शेतकऱ्याला महाराष्ट्राबरोबरच इतर राज्यातील बाजार समित्यांमध्ये शेतमालाच्या विक्रीचा पर्याय उपलब्ध होणार आहे. शेतीसाठी लागणारी सामग्री खरेदी करण्यासाठी प्रत्येक कृषी सेवा केंद्रात पीओएस मशीन उपलब्ध करून दिले जाणार आहे. सुमारे दहा हजार पीओएस मशीनचे वितरण करण्यास सुरुवात झाली आहे. या सुविधेमुळे शेतकऱ्यांच्या खात्यातून थेट विक्रेत्याच्या खात्यात पैसे जमा होतील.

## जोडधंद्यासाठी प्रोत्साहन

परसातील कुक्कुटपालनास प्रोत्साहनासह रोजगाराच्या उपलब्धतेसाठी ३०२ तालुक्यांमध्ये सार्वजनिक खासगी भागीदारी तत्त्वावर सघन कुक्कुट विकास गट तसेच पशुआरोग्य सेवा पशुपालकांच्या दारापर्यंत पोहोचवण्यासाठी ३४९ फिरते पशुवैद्यकीय चिकित्सालय स्थापन केले जाणार आहे. पारंपरिक मेंढी पालन करणाऱ्या लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदानावर मेंढी गटाचे वाटप करण्यात येणार आहे. राज्यातील खेकडा थेट परदेशात निर्यात व्हावा यासाठी तामिळनाडूच्या धर्तीवर सिंधुदुर्ग जिल्ह्यात खेकडा उपजकेंद्राची निर्मिती करण्यात येणार आहे. या केंद्रासाठी ९ कोटी ३१ लाख निधी खर्च केला जाणार आहे. कोळंबी बीज उत्पादन केंद्राच्या माध्यमातून कोळंबी उत्पादनात वाढ करण्याचा कार्यक्रम.

## दुग्ध विकास प्रकल्प

राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत खासगी सहभागातून एकात्मिक कृषी विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून नाबार्डच्या सहाय्याने दुग्ध विकास प्रकल्प उभारण्यात येणार आहे. राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाच्या माध्यमातून दूध उत्पादनाला चालना देण्यासाठी मराठवाडा व विदर्भातील दुष्काळग्रस्त व शेतकरी आत्महत्याग्रस्त १० जिल्ह्यांमध्ये प्रकल्प राबवला जाणार आहे. या प्रकल्पासाठी विदर्भातील नागपूर, अमरावती, बुलढाणा, वर्धा, अकोला, चंद्रपूर तर मराठवाड्यातील उस्मानाबाद, जालना, लातूर, नांदेड या जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. सुमारे ३४० कोटी रुपयांच्या या प्रकल्पामुळे ३ हजार गावांतील ६० हजार दुग्ध उत्पादक शेतकरी आणि ग्रामीण भागातील जवळपास १० हजार युवकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. दिवसाला अडीच लाख लीटर दूध संकलित करून येत्या तीन वर्षात दूध उत्पादक शेतकऱ्यांना २५० कोटींचे उत्पन्न मिळणार आहे.

## शेतकऱ्यांच्या आरोग्यासाठी

शेतकऱ्यांना आरोग्याच्या उत्तम सुविधा मिळण्यासाठी महात्मा फुले जन आरोग्य योजना सुरू केली जात आहे. सुमारे ११०० प्रकारचे उपचार या माध्यमातून शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांना मिळणार आहे. एसटी बसस्थानकांमध्ये जेनरिक औषधे मिळण्यासाठी नुकतीच योजना जाहीर करण्यात आली आहे.



## कांदा खरेदी

नाशिक जिल्ह्यात नॅशनल ॲग्रिकल्चरल कोऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन ऑफ इंडिया लि. (एनएएफईडी) व स्मॉल फार्मर्स ॲग्री बिझिनेस कॉन्सॉर्टियम (एसएफएसी) मार्फत कांदा खरेदी करण्यात आली. केंद्र सरकारकडून कांदा निर्यातीसाठी ५ टक्के वाहतूक अनुदान मिळवले गेले. केंद्र व राज्य शासनाकडून कांदा उत्पादकांना एकत्रित १०० रुपये प्रति क्विंटल अनुदान देण्यात आले. यंदा दहा लाख मेट्रिक टन कांदा साठवणुकीची व्यवस्था निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला. पांढऱ्या कांद्याचे उत्पादन जास्त करण्यासाठी त्याचे निर्जलीकरण करण्याचा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. एमइआयएस योजनेंतर्गत कांदा निर्यातीसाठी ३१ डिसेंबर २०१६ नंतर पुढे ३१ मार्च २०१७ आणि आता ३० जून २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

## मृद आरोग्य पत्रिका

या योजनेच्या माध्यमातून राज्यातील सर्व शेतकऱ्यांना दर दोन वर्षांनी त्यांच्या शेतजमिनीची मृद आरोग्य पत्रिका उपलब्ध करून देण्यात येते. ही आरोग्य पत्रिका बनवण्यासाठी वहितीखालील क्षेत्रामधून जिरायत क्षेत्रासाठी १० हेक्टर क्षेत्रास १ मृद नमुना व बागायत क्षेत्रासाठी २.५ हेक्टर क्षेत्रास १ मृद नमुना घेऊन त्यांचे प्रमुख व सूक्ष्म अन्नद्रव्यांसाठी विश्लेषण करण्यात येते. जमीन आरोग्य पत्रिकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जमिनीचा रासायनिक गुणधर्म, स्थिती, प्रमुख अन्नद्रव्यांची पातळी व सूक्ष्म मूलद्रव्य कमतरता स्थितीची सखोल माहिती त्यांना देण्यात येते. या आरोग्य पत्रिकेतील अहवालानुसार कुठल्या पिकांना किती प्रमाणात खत देण्यात यावे, याची शिफारस करण्यात येते. त्यामुळे जमिनीची धूप थांबून मृद आरोग्य जोपासणे शक्य होत आहे.

## शिक्षण - प्रशिक्षण

कृषी शिक्षणाला चालना देण्यासाठी यवतमाळ, नाशिक व सांगली जिल्ह्यातील पेठ येथे शासकीय कृषी महाविद्यालय स्थापन करण्यात येणार आहे. राज्यातील ३ लाख शेतकऱ्यांना (विशेषत: विदर्भ आणि मराठवाडा) आधुनिक आणि प्रयोगशील शेतीबाबत प्रशिक्षण दिले जाणार आहे. कृषीचे शिक्षण घेणाऱ्या ४० हजार विद्यार्थ्यांना या प्रशिक्षणात सामावून घेतले जाणार आहे. यामधील उत्कृष्ट ४५ विद्यार्थ्यांना इस्त्रायलच्या हिब्रू विद्यापीठामध्ये पुढील शिक्षण मोफत उपलब्ध करून दिले जाईल. भारत-इस्त्रायल यांची संयुक्त कंपनी स्थापन करून कृषी उद्योगाला चालना देण्यात येणार आहे.

पंजाब नॅशनल बँकेच्या पी. एन. बी. फार्मर्स वेलफेअर ट्रस्टमार्फत चालवल्या जाणाऱ्या शेतकरी प्रशिक्षण केंद्रामार्फत चंद्रपूर जिल्ह्यातील अजयपूर येथे

महिला व ग्रामीण युवक तसेच युवतींना शेती व शेतीसंबंधातील कामे, संगणक अभ्यासक्रम, ड्रेस डिझायनिंग व भरतकाम आदींचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

## देशाबाहेर अभ्यास दौरे

राज्यातील शेतकऱ्यांना जगभरातील विकसित देशातील आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती व्हावी याकरिता तसेच शेतमालाची निर्यात, कृषिमालाचे पणन व बाजारपेठेतील मागणी, कृषिमाल प्रक्रिया उद्योग यांविषयीची माहिती देण्याकरिता ही योजना सुरू करण्यात आली आहे. अभ्यास दौऱ्याकरिता परदेशी जाणाऱ्या शेतकऱ्याच्या नावे ७/१२ व ८-अ उतारा असणे आवश्यक असून त्याचे वय ६२ वर्षांपेक्षा जास्त नसावे. शिवाय त्याच्याकडे वैध पारपत्रही असावे.

## कोरडवाहू क्षेत्र विकास योजना

राज्यातील शेती प्रामुख्याने कोरडवाहू आहे. यामध्ये पेरणीयोग्य क्षेत्रापैकी ८३ टक्के क्षेत्र कोरडवाहू आहे. ४० टक्के अन्नधान्य उत्पादन या क्षेत्रातून होते. कोरडवाहू क्षेत्र विकास घटकामध्ये पिके, फळपिके, पशुधन, मत्स्य, वने यांचा समावेश असल्याने या क्षेत्राचाही विकास करणे महत्वाचे ठरते. या योजनेअंतर्गत प्रत्येक शेतकरी कुटुंबास २ हेक्टरच्या मर्यादेत एक लाख रुपयांपर्यंत अनुदान देय आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादकतेत शाश्वत वाढ करून उपजीविकेच्या नवीन साधनांची उपलब्धता करणे व त्या आधारे त्यांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने ही योजना राबवली जात आहे.

## सूक्ष्म सिंचन योजना

राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतास पाण्याची उपलब्धता करून देणे आणि पाण्याची कार्यक्षमता वाढवून पाण्याच्या प्रत्येक थेंबापासून जास्तीत जास्त पिक उत्पादन मिळविणे यासाठी सूक्ष्म सिंचन योजना सुरू करण्यात आली आहे. सूक्ष्म सिंचन योजनेत सर्व पिकांचा समावेश असून यामध्ये प्रामुख्याने उस, कापूस, केळी, द्राक्षे, डाळिंब इ. पिकांखालील सूक्ष्म सिंचनाचे क्षेत्र वाढत आहे. तसेच तूर, हळद, आले इ. पिकांसाठी सूक्ष्म सिंचनाचा वापर नव्याने होत आहे. या योजनेमध्ये ठिबक व तुषार सिंचन संच या दोन प्रमुख घटकांचा समावेश आहे.

## सेंद्रिय शेती

शेतकऱ्यांना सेंद्रिय निविष्टांसाठी प्रोत्साहन, सेंद्रिय शेती गरम विकसित करणे, सेंद्रिय शेतीवर आधारित प्रशिक्षण व प्रात्याक्षिके घेणे, शेतीमध्ये सेंद्रिय शेती निविष्टा तयार करणे व पुरवठा करणे, शेतमालाचे प्रमाणीकरण करून विक्री व व्यवस्थापन इ. गोष्टींचा या परंपरागत कृषी विकास योजनेंतर्गत राबवल्या जाणाऱ्या सेंद्रिय शेती योजनेत समावेश आहे. २०१६ साली सुरू करण्यात आलेली ही



योजना पुढच्या ३ वर्षासाठी म्हणजेच २०१९ पर्यंत राबवण्यात येणार आहे. यामध्ये शेतकरी गट निर्मिती करणे, सेंद्रीय गट संकल्पना राबवणे, एकात्मिक खत व्यवस्थापन तसेच भाडेतत्वावर अवजारे घेणे आदी बाबींचा समावेश आहे.

## महामेष योजना

मेंढी पालनाच्या व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी राज्यस्तरीय योजनेंतर्गत ६ मुख्य घटकांसह राजे यशवंतराव होळकर महामेष ही नवीन योजना राबवण्यात येणार आहे. या योजनेसाठी लागणाऱ्या ४६ कोटी २७ लाख रुपयांच्या खर्चास नुकतीच मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

धनगर व तत्सम जमातींमधील सुमारे एक लाख कुटुंबियांकडून भटकंतीच्या स्वरुपात मेंढी पालन व्यवसाय केला जातो. त्यामुळे या समुहाला सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थैर्य मिळवून देण्यासाठी शासनामार्फत मेंढीपालन या व्यवसायास प्रोत्साहन देण्यात येत आहे. जागतिक पातळीवरील मेंढ्यांच्या मांसाचे सेवन मोठ्या प्रमाणावर करण्यात येते. तसेच देशातील दक्षिण भागातील राज्यांमध्ये मेंढीच्या मांसाला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. त्यामुळे मेंढ्यांच्या मासांच्या निर्यातीस वाव आहे. मेंढीपालन व्यवसाय ठाणबंद पद्धतीने केल्यास त्यातून प्राप्त होणाऱ्या घटकांची (मांस, दूध, लोकर इ.) व्यापारी दृष्टिकोनातून उत्पादने घेता येऊ शकतील. परिणामी, या व्यवसायातील नफा क्षमता वाढण्यास आणि मेंढीपालन व्यवसाय किफायतशीर होण्यात मदत होईल.

## प्रधानमंत्री पीक विमा योजना

- रब्बीतील गहू, ज्वारी, हरभरा, उन्हाळी भात, करडई, सूर्यफूल, उन्हाळी भूईमुग, रब्बी कांदा पिके समाविष्ट. सहभागी शेतकरी ७ लाख, विमा संरक्षित क्षेत्र २.४८ लाख हेक्टर.
- पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्यात २०६५ महसूल मंडळ स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्राची उभारणी. नागपूरमधील डोंगरगावात पहिले केंद्र कार्यान्वित.
- पिक विमा योजनेत बिगर कर्जदार शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी 'आपले सरकार सेवा केंद्राची' सुविधा. योजनेत सहभागी शेतकऱ्यांचे बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न.
- खरीप हंगाम २०१६ मध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजनेत १.०९ कोटी शेतकऱ्यांकडून सहभाग. त्यात ३७ लाख कर्जदार व ७२ लाख बिगर कर्जदार शेतकरी.

- सहभागी २४ लाख शेतकऱ्यांना १६९५ कोटी तर रब्बी हंगामामध्ये २६ लाख ८८ हजार शेतकऱ्यांना ८९३ कोटी ८३ लाख भरपाई.
- लातूर विभागाला खरीपसाठी सर्वाधिक १३६४ कोटी तर रब्बीसाठी याच विभागात सर्वाधिक १३ लाख शेतकऱ्यांना ४०३ कोटींची नुकसान भरपाई.
- खरीप २०१५ साठी नुकसान भरपाईपोटी शेतकऱ्यांना ४२०५ कोटींचे वाटप.
- पंतप्रधान पीक विमा योजनेबाहेर राहिलेल्यांना मंडलनिहाय भरपाई रकमेच्या ५० टक्के रक्कम शासनाकडून मदत म्हणून देण्यात येणार.
- राज्यातील १ कोटी ३७ लाख शेतकऱ्यांचा अपघाती विमा उतरविला.
- नुकसानीच्या मदतीची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक बचत खात्यात जमा.

## फळ पीक विमा

- हवामान आधारित फळ पीक विमा योजना राज्यातील ३० जिल्ह्यांमध्ये.
- गेल्या वर्षी मृगबहारामध्ये ८० हजार ५२८ शेतकऱ्यांचा ७५ हजार ४८६ हेक्टर क्षेत्रावर फळ पीक विम्यासाठी सहभाग. त्याकरिता २२३ कोटी विमा हप्ता.
- मृग बहाराकरीता ४५ हजार ६३२ शेतकऱ्यांना १८९ कोटी रुपयांची भरपाई.
- अंबिया बहारासाठी १ लाख २९ हजार ३० शेतकऱ्यांकडून १ लाख १९ हजार ९४५ हेक्टरवर सहभाग नोंदवून ५५३ कोटी विमा हप्ता.
- विमा संरक्षित रक्कम १३४४ कोटी आहे.



## २४६० सौर कृषिपंपांची उभारणी

अटल सौर कृषी पंप योजनेंतर्गत केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या २४६० सौर कृषी पंपांची उभारणी करण्यात येणार आहे. सौर कृषी पंपांची उभारणी करण्यासाठी यापूर्वी आत्महत्याग्रस्त सहा जिल्हे आणि सध्या या योजनेत समावेश असलेले इतर जिल्हे यांच्यातील वाटपाचे ८० टक्के आणि २० टक्के असे सध्या असलेले प्रमाण रद्द करून ते आता ५०-५० टक्के करण्यात आले आहे. या योजनेत समावेश असलेल्या जिल्ह्यांव्यतिरिक्त उर्वरित जिल्ह्यांचा समावेश करण्यासह या योजनेस डिसेंबर २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यासाठी केंद्र शासनास विनंती करण्यात येणार आहे.

औष्णिक वीज निर्मितीस असलेल्या मर्यादा आणि तिचा हवामानावर होणारा विपरित परिणाम यांचा विचार करता शेतकऱ्यांना शाश्वत व निरंतर स्वरुपाच्या उर्जेचा स्त्रोत असणारे सौर पंप देण्यात येतील. त्यानुसार राष्ट्रीय स्तरावर एक लाख सौर कृषी पंपांच्या योजनेसाठी ४०० कोटींची तरतूद घोषित करण्यात आली होती. याअंतर्गत महाराष्ट्रासाठी १० हजार कृषिपंपासाठी मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार मार्च २०१५ मध्ये ७५४० सौर पंपांच्या उभारणीस मान्यता देण्यात आली. आता उर्वरित २४६० सौर कृषी पंपांच्या उभारणीस मान्यता देण्यात आली. या योजनेंतर्गत अकोला, अमरावती, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा या सहा आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांचा प्रामुख्याने समावेश आहे. सौर कृषी पंपांची जिल्हावार वाटप करण्याचे अधिकार या योजनेखाली स्थापन करण्यात आलेल्या सुकाणू समितीस देण्यात आले आहेत. त्यानुसार यापूर्वी राज्यात ७५४० सौर कृषी पंपांची उभारणी करणे सुरू आहे.

## इतर महत्त्वाचे

- राज्यात शेतकऱ्यांकडून किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी दराने शेतमाल खरेदी करणे गुन्हा ठरणार असून त्यासंदर्भात राज्य सरकारकडून कायदा केला जाणार आहे.
- यंदापासून प्रत्येक जिल्ह्यात कृषी महोत्सव भरवण्यात येणार.
- शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्न मिळवून देण्याची क्षमता असणाऱ्या तुती व टसर रेशीम शेतीसाठी शेतकऱ्यांचा सहभाग वाढावा यासाठी राज्यात प्रथमच महा-रेशीम अभियान राबवण्यात येणार आहे.
- अनुसूचित जाती आणि नवबौद्ध शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून त्यांना आर्थिक स्थैर्य देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.
- मनरेगा योजनेसाठी मजुरीचा दर १९२ रु. वरून २०१ रु. इतका केला गेला.



# सक्षम पणन; समृद्ध शेतकरी

पणन खात्याचा पदभार स्वीकारल्यानंतर काही महत्त्वाचे निर्णय मला घेता आले. यामध्ये संत शिरोमणी सावता माळी आठवडी बाजार अभियान, महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मध्ये सुधारणा, राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान यांचा ठळक उल्लेख करावा लागेल. मोठ्या प्रमाणात किमान आधारभूत किंमतीने यंदा विक्रमी तूर खरेदी करण्यात आली. शेतातून शेतमाल काढल्यानंतर



**सुभाष देशमुख**

सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री

**महाराष्ट्राला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पणन क्षेत्र अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्यातील ग्रामीण विकासाला चालना देत शासनाने शेती, पतपुरवठा आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेला विशेष प्राधान्य दिले आहे. ग्रामीण विकास हा पणन, बाजार नियामक बाबींशी संबंधित असल्याने या क्षेत्राला सक्षम करणाऱ्या सर्व घटकांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. शेतकऱ्यांना सक्षम करणे ही आपली प्रमुख भूमिका असल्याचे सांगताहेत पणन मंत्री सुभाष देशमुख...**

तातडीने आडत्याला विकण्याऐवजी तो तारण ठेवून, पैशांची गरज भागावी आणि बाजारपेठेतील गरजेनुसार शेतमालाला योग्य आणि वाजवी दर मिळावा या उद्देशाने राज्यात 'शेतमाल तारण योजना' सुरू करण्यात आली. चालू आर्थिक वर्षात त्यासाठी सुमारे ५० कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला आहे. याद्वारे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल अशी अपेक्षा आहे.

कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या कामकाजात सुसूत्रता आणण्यावर मी लक्ष केंद्रित केले. कामकाजात पारदर्शकता यावी, शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये आणि आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यापर्यंत पोहोचावे यासाठी 'ऑनलाइन' प्लॅटफार्म उपलब्ध करून देण्यात आला असून 'महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पांतर्गत' राज्यातील राहता, चिखली, अकोट, धामणगाव रेल्वे, हिंगणघाट या पाच बाजार समित्यामध्ये संगणकीकृत पद्धतीने ऑनलाइन लिलाव सुरू करण्यात यश आले. टप्प्याटप्प्याने राज्यातील अन्य बाजार समित्यांचे कामकाज ऑनलाइन करायला सुरुवात केली.

### शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार

कृषी उत्पन्न बाजार समिती संचालकपदाच्या निवडणुकीसाठी आता थेट शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार देण्याचे शासनाने प्रस्तावित केले आहे. लवकरच हा निर्णय होईल. महाराष्ट्रात कृषी उत्पन्न बाजार समित्यांची निर्मिती ही शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालास

स्पर्धात्मक दर मिळावा, एकत्र बाजारपेठ उपलब्ध व्हावी, आणि त्यातून शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी करण्यात आली आहे.

राज्यात ३०६ कृषी उत्पन्न बाजार समित्या आहेत. या बाजार समित्यामध्ये धान्य, फळे, भाजीपाला यांची मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्री होत असते. २०१५ -१६ या आर्थिक वर्षात जवळपास ६५ हजार कोटीची उलाढाल झाली. या बाजार समित्यांमध्ये मोठ्या प्रमाणात शेतमालाच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार होतो. परंतु बाजार समिती संचालक मंडळात शेतकरी कुठेच नाही. या समित्या त्यांच्या उद्दिष्टापासून दूर जात आहेत. शेतकऱ्यांचे प्रश्न मांडणारा प्रतिनिधी या समित्यांवर नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी, त्यांच्या काय अडचणी आहेत हे समजून घेण्यासाठी नसल्याने शेतकरी उपेक्षित राहतो. समित्यांच्या कामकाजात शेतकरी हित पाहिले जात नाही, असे माझे मत आहे. सध्याच्या प्रक्रियेत निवडून जाणारे, मतदान करणारे ठरावीक लोक आहेत. बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांचे हित न पाहता शेतकऱ्यांची लुबाडणूक करणाऱ्यांची साखळी या समित्यांवर नियुक्त होतानाचे चित्र दिसत आहे. त्यामुळे लवकरच कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना मतदानाचा हक्क देण्यात येणार आहे. बाजार समित्यांच्या आणि शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने हा निर्णय क्रांतिकारी ठरणार आहे. शेतकऱ्यांना त्यांचा हक्क, अधिकार मिळण्यास मदत होईल.

सध्या विविध कार्यकारी विकास सोसायट्या आणि ग्रामपंचायत सदस्यांनाच बाजार समित्यांच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार आहे. ही व्याप्ती शेतकऱ्यांपर्यंत वाढवण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. काही निकष ठेवून शेतकऱ्यांना बाजार समित्यांचे मतदार करून घेतले जाणार आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील सातबाराधारक शेतकरी आणि साखर कारखान्यांच्या धर्तीवर जे शेतकरी बाजार समित्यांना शेतमाल पुरवठा करतात, अशा शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार देण्यात येणार आहे. या संदर्भात शासनाने समिती गठित केली आहे. सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या सहभागामुळे बाजार समित्यांच्या कामकाजात आमूलाग्र बदल होऊन शेतकऱ्यांचे हित जोपासले जाईल.

## निर्यातीचे प्रशिक्षण

शेतकऱ्यांच्या मुलांना निर्यातीमध्ये सक्षम करण्यासाठी पणन मंडळामार्फत डिसेंबर, २०१५ पासून हॉर्टिकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग कोर्सची सुरुवात करण्यात आली आहे. यामध्ये प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष निर्यात प्रक्रियेचे प्रशिक्षण देण्यात येते. या कोर्सच्या माध्यमातून आजमितीस सुमारे १२० उमेदवार प्रशिक्षित झाले असून त्यापैकी काही जणांनी प्रत्यक्ष निर्यात सुरू केली आहे. ग्रामीण भागातील युवकांना त्यातही प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या मुलांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याचा आमचा मानस असून त्यामुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

## शेतकऱ्यांसाठी नावीन्यपूर्ण उपक्रम

भाजी व फळे यांच्या प्रचलित विक्री पद्धतीची शीतगृह उभारणी करण्यात येत आहे. थेट बाजारांशी शेतकऱ्यांचा संपर्क प्रस्थापित करून उत्पादनाच्या विक्रीस पर्याय उपलब्ध करून देण्यात येत आहे. मध्यस्थांची साखळी कमी करण्यासाठी पणन व्यवस्थेत आधुनिक साधनांचा वापर केला जात आहे.

नागपूर, मुंबई व नाशिक येथे टर्मिनल मार्केटची उभारणी करण्यात येईल. यासाठी रुपये ३०० कोटीची गुंतवणूक करण्यात येणार आहे. या मार्केटच्या माध्यमातून विक्रीच्या व्यवहारात पारदर्शकता आणणे, फलोत्पादन निर्यातीस प्रोत्साहन, फलोत्पादन प्रक्रियेचे प्रमाण वाढवणे अपेक्षित आहे. यामुळे शेतीमाल विक्रीच्या नव्या व्यवस्था निर्माण होतील. मदर डेअरीच्या धर्तीवर विक्री व्यवस्था निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून कृषिमालाची विक्री व्यवस्था आणि अन्नप्रक्रिया उद्योगावर अधिक भर देण्यात येत आहे. शीतसाखळीद्वारे शेतीमालाचे आयुष्य वाढवणे, काढणीनंतरचे नुकसान कमी करणे यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या प्रयत्नातून शेतकऱ्याला शाश्वत बाजारपेठ उपलब्ध होईल.

## बाजार समितीच्या आवाराबाहेर भाजीपाला विक्रीस परवानगी

ई-ट्रेडिंग, सिंगल पॉईंट लेव्ही, खरेदीदाराकडून अडत वसुली व शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या फळे व भाजीपाल्याची विक्री कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवाराबरोबरच आवाराबाहेरही करण्याची शेतकऱ्यांना परवानगी देण्यात आली आहे. यामुळे शेतकऱ्यांना शेतमाल त्यांना हव्या त्या ठिकाणी विकता येत आहे. बाजार समितीबरोबरच विक्रीचे अनेक पर्याय शेतकऱ्यांना उपलब्ध झाले आहेत. या निर्णयामुळे खरेदीदारांमध्ये स्पर्धा निर्माण झाली आहेत. शेतमालास योग्य भाव मिळत आहे. शेतकरी व ग्राहक यातील मध्यस्थांची साखळी कमी होऊन शेतमालास चांगला भाव व ग्राहकांना वाजवी किमतीत फळे व भाजीपाला मिळण्यास मदत होत आहे.

## बाजार समित्यांच्या विकासाला गती

बाजार समित्यांमध्ये शेतकरी आल्यांनंतर पिण्यासाठी पाणी, राहण्यासाठी उत्तम व्यवस्था, स्वच्छतागृहे मिळाले पाहिजे यावर माझा भर आहे. त्या दृष्टीने प्रत्येक बाजार समितीत पिण्याचे शुद्ध पाणी, इको टॉयलेट, शेतकरी निवास आदी सुविधा आम्ही उपलब्ध करून देत आहोत. स्पर्धेच्या युगात बाजार समित्या सशक्त करण्यासाठी सुमारे रुपये ५००० कोटींचे व्यावसायिक विकास आराखडे तयार करण्यात आले आहेत. या व्यावसायिक विकास आराखड्याच्या माध्यमातून बाजार समित्या अधिक सशक्त होतील. बाजार समित्यांवर संचालक नेमण्याची तरतूद कायद्यात करण्यात आली आहे.

### निर्यात वाढीला चालना

केंद्र शासनाची कृषी माल व प्रक्रिया पदार्थांच्या निर्यातीचे काम करणारी अपेडा ही संस्था व राष्ट्रीय कृषी विकास योजना यांच्या अर्थसाहाय्यामधून, राज्यामध्ये सुमारे ४५ निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे. फळे व भाजीपाल्यासाठी ४२ सुविधा केंद्रे व फुलांसाठी ३ सुविधा केंद्रांचा यात अंतर्भाव आहे. देशातील भाजीपाला निर्यात ८.३५ लाख मे. टन आहे त्यापैकी २.४० लाख मे. टन निर्यात महाराष्ट्राची आहे. विकिरण सुविधा, व्हेपर हीट ट्रीटमेंट सुविधा, हॉट वॉटर ट्रीटमेंट केंद्र अशा केंद्राची उभारणी पणन मंडळाने केली आहे. युरोप येथे भाजीपाला निर्यातीसाठी आवश्यक असणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील एकमेव अशा व्हेजिटेबल प्रक्रिया केंद्राची उभारणी वाशी येथे करण्यात आलेली आहे.




सौदी अरेबिया येथे मिरची निर्यातीसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून दिली आहे. याबाबत सौदी अरेबियास प्रतिनिधी मंडळास समाधानकारक माहिती पुरवल्यामुळे, सौदी अरेबिया देशाने भारतीय मिरचीवर लादलेली आयातबंदी उठवली आहे. युरोप येथे निर्यातीसाठी पणन मंडळाने विशेष सुविधेची केलेली उभारणी व उत्पादक जिल्ह्यांमध्ये प्रत्यक्ष बागांचे सुरू केलेल्या सर्वेक्षणाचे कामकाज याबाबत युरोपीयन युनियनच्या अधिकाऱ्यांचे समाधान झाल्यामुळे युरोप येथे भेंडीची निर्यात पुन्हा सुरू झाली आहे.

पणन मंडळाने निर्यातक्षम केळी उत्पादनासाठी उत्पादक चार जिल्ह्यांमध्ये १८ प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून १४०० केळी उत्पादक शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे. विविध निर्यातदारांबरोबर केळी उत्पादक शेतकरी कामकाज करत असून गेल्या वर्षीच्या सुमारे ५० हजार मे.टनाच्या तुलनेत यंदा सुमारे दीड लाख मे. टन केळीची निर्यात झाली आहे. डाळिंबासाठी अशाच प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात येत आहे.

डाळिंबाच्या निर्यातीसाठी पणन मंडळामार्फत मोहाडी, लातूर, बारामती, इंदापूर, कळवण, आटपाडी, चांदवड येथे सुविधा केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. यापैकी बहुतांश सुविधा केंद्रांवरून डाळिंबाची निर्यात सुरू आहे. अमेरिकेत डाळिंब निर्यातीबाबत पणन मंडळाकडून विशेष प्रयत्न करण्यात आले. २८ एप्रिल २०१६ रोजी वाशी येथील विकिरण सुविधा केंद्रावरून प्रक्रिया करून डाळिंबाची अमेरिका येथे निर्यात सुरू झाली आहे. अशा प्रकारची निर्यात करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. मॉरिशसची बाजारपेठ भारतीय आंब्यासाठी खुली झाली आहे. राज्यातील आंब्याला ऑस्ट्रेलियाची बाजारपेठ खुली होण्याकरिता प्रयत्न करण्यात येत असून ऑस्ट्रेलियन शिष्टमंडळाने पणन मंडळाच्या विकिरण सुविधा केंद्रास भेट दिली आहे. ऑस्ट्रेलियन बाजारपेठ भारतीय आंब्याकरिता खुली होण्याच्या प्रतीक्षेत आहे. युरोपियन युनियनने भारतीय कारल्यावर घातलेल्या बंदी उठवण्याच्या अनुषंगाने कारल्यावर व्हेपर हिट ट्रिटमेंटच्या यशस्वी चाचण्या करण्यात आल्या आहेत. लवकरच कारल्याचीही युरोपवारी सुरू होण्याचे संकेत आहेत.

### सर्वाधिक खरेदी

तुरीला योग्य भाव मिळण्यासाठी शासनाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांमुळे तूर उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. तूरडाळींचे भाव किफायतशीर व स्थिर राहावेत त्यासाठी राज्याने केंद्र सरकारला वेळोवेळी विनंती केल्याने २२ एप्रिलपर्यंत चार वेळा मुदतवाढ (दि. ३१ मार्च, १५ एप्रिल आणि २२ एप्रिल, ३१ मे २०१७ ) मिळाली आहे. या केंद्रांवर या वर्षी किमान आधारभूत किमतीने रुपये ५,५०० (४२५ रुपये केंद्राच्या बोनससह) या दराने खरेदी करण्यात येत आहे.

१५ डिसेंबर २०१६ ते २२ एप्रिल २०१७ पर्यंत ३२३ केंद्रांवर ४१ लाख ५१ हजार ८९२ क्विंटल (४ लाख मेट्रिक टन) तूर खरेदी केली आहे.

२२ एप्रिल रोजीची विविध खरेदी केंद्रांवर खरेदीविना शिल्लक असलेल्या तुरीचे पंचनामे करण्यात आले. १६३ केंद्रावरून ११ लाख ३० हजार ६५३ क्विंटल तुरीची खरेदी करण्यात आली आहे.

२७ एप्रिल ते ११ मे २०१७ या काळात ११८ खरेदी केंद्रांवरून ३५ हजार ७१० शेतकऱ्यांकडून ६ लाख ११ हजार ७६५.३६ क्विंटल (११ मे पर्यंत) एवढी विक्रमी तूर खरेदी केली आहे.

देशातील एकूण तुरीच्या खरेदीपैकी आतापर्यंत ४७ टक्के खरेदी ही महाराष्ट्रात झाली आहे. त्यापाठोपाठ कर्नाटक (२० लाख क्विंटल), तेलंगणा (१६ लाख क्विंटल), गुजरात (१२.५ लाख क्विंटल), मध्यप्रदेश(८.५ लाख क्विंटल) तुरीची खरेदी केली आहे.

परराज्यातील तूर महाराष्ट्रात येऊ नये यासाठी तुरीवरील आयात शुल्कात १० टक्क्यांवरून २५ टक्के एवढी वाढ करण्यात आली आहे. राज्यात यापूर्वी २०१२-१३ मध्ये तुरीचे उत्पादन अधिक झाले होते. त्या वेळी २ लाख क्विंटल एवढी तूर खरेदी झाली होती.

शासनाच्या विविध उपाययोजनांमुळे २०१६-१७ मध्ये १५.३३ लाख हेक्टर क्षेत्रावर तुरीची पेरणी होऊन एकूण २०३ लाख क्विंटल एवढे उत्पादन झाले. तुरीच्या विक्रमी उत्पादनाबरोबरच विक्रमी खरेदी या वर्षी करण्यात आली आहे. २२ एप्रिलनंतर तूर खरेदीसाठी शासनाने सुमारे एक हजार कोटी रुपयांची तरतूद केली. त्याचे चुकारे अदा करण्यात आले आहेत. तूर खरेदी प्रक्रिया गतीने पूर्ण करता यावी, यासाठी बारदान खरेदीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना स्थानिक स्तरावर देण्यात आले होते. या विविध उपाययोजनांमुळे तूर उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# शेतमालाची थेट विक्री

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा माल थेट मुंबई, पुणे अशा मोठ्या महानगरापासून ते जिल्हा स्तरावरील ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी संत शिरोमणी श्री. सावता माळी आठवडी बाजार भरवण्यात येतो. शेतकरी आडत्यांपासून मुक्त व्हावा, त्यांच्या श्रमाचे उचित मूल्य त्यांना मिळावे आणि शेतमाल थेट ग्राहकांपर्यत वाजवी दरात उपलब्ध व्हावा हा या आठवडी बाजाराचा मुख्य उद्देश आहे. राज्यात जवळपास ९० ठिकाणी आठवडी बाजार सुरू करण्यात आले आहेत.

राज्याच्या पणन विभाग आणि महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'थेट शेतकरी ते ग्राहक' या योजनेंतर्गत 'संत शिरोमणी श्री. सावता माळी आठवडी बाजार' सुरू करण्यात आला आहे.

राज्यात जवळपास ९० ठिकाणी आठवडी बाजार सुरू झाले आहेत. या बाजारात फक्त शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी उत्पादक सहकारी संस्था यांचाच समावेश करण्यात आला आहे. शेतकरी गट, शेतकरी उत्पादन कंपन्या यांचे क्लस्टर तयार करून या बाजारात विविध प्रकारचा भाजीपाला व फळे एकाच ठिकाणी ग्राहकांना उपलब्ध करून दिली जात आहेत.

### प्रथम येणाऱ्यास प्राधान्य

या बाजारात प्रथम येणाऱ्यास प्राधान्यक्रमाने, चिठ्ठी पद्धतीने अथवा रोटेशन पद्धतीने स्टॉलच्या जागेचे वाटप करण्यात येते. शेतकरी बाजार आयोजक म्हणून शेतकरी गट, उत्पादक कंपन्या, उत्पादक सहकारी संस्था कामकाज करू शकतात.



### भाव ठरवण्याचा अधिकार

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी पिकवलेला भाजीपाला व्यापारी, अडते यांच्या मध्यस्थीशिवाय महानगरातील ग्राहकांपर्यंत थेट पोहोचवण्याची किमया या आठवडी बाजारांनी साधली आहे. शेतीमालाचा भाव ठरवण्याचा अधिकार शेतकऱ्यांना आहे. ग्राहक अदा करत असलेली रक्कम थेट शेतकऱ्यांना मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीस मदत होत असून, शेतकऱ्यांना शेतीमाल विक्रीसाठी सक्षम पर्याय उपलब्ध झाला आहे.

शेतकरी बाजाराच्या संकल्पनेस मूर्त स्वरूपात आणण्यासाठी शेतकरी आठवडी बाजारासाठी कृषी पणन मंडळास विनामूल्य जागा उपलब्ध करून दिली. राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रात अशा जागा उपलब्ध करून देण्यासंदर्भात नगरविकास विभागाने निर्णय घेतला आहे.

### पणन मंडळाचे कार्य

■ शेतकरी आठवडी बाजाराचे आयोजक निवडणे. ■ या बाजारात विक्रीसाठी येणारे शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपन्यांची यादी प्रमाणित करणे. ■ हा बाजार चालू करण्यासाठी आवश्यक त्या यंत्रणांची परवानगी घेणे. ■ शेतकऱ्यांना ओळखपत्र देणे. ■ आयोजक व स्थानिक संस्थांशी समन्वय ठेवणे ■ बाजाराच्या ठिकाणी तात्पुरते शेड, स्टॉल उभारणे. ■ या बाजाराच्या जागेची स्वच्छता राखणे.

### राज्यात सुरू असलेल्या बाजारांची संख्या

पुणे ४१, मुंबई २७, नवी मुंबई ७, ठाणे ९, नागपूर ३, कोल्हापूर ५, सोलापूर ३, औरंगाबाद ३, एकूण ९८.



## शेतकरी बाजार संकल्पना

■ शेतकरी तसेच ग्रामीण महिला बचत गट यांनी उत्पादित केलेल्या मालाला थेट बाजारपेठ उपलब्ध करून देणे ■ सर्व प्रकारचा भाजीपाला एकाच ठिकाणी ग्राहकांना उपलब्ध करून देणे ■ शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी आणि उत्पादक सहकारी संस्था यांच्या शेतमालाची त्यांनी पुरस्कृत केलेल्या गटांमार्फत/ प्रतिनिधींमार्फत विक्री करणे. ■ मध्यस्थ नसल्यामुळे ग्राहक अदा करीत असलेली रक्कम थेट शेतकऱ्यांस उपलब्ध ■ मालाची हाताळणी कमी होत असल्याने सुगीपश्चात नुकसान कमी तसेच मालाचा दर्जा उत्तम राहतो ■ या बाजाराची वेळ व ठिकाण निश्चित असल्याकारणाने शेतमाल काढणीचे आणि विक्रीचे नियोजन करणे शेतकऱ्यांना शक्य होते. ■ इलेक्ट्रॉनिक वजन काट्यामार्फत शेतमालाचे वजन. त्यामुळे ग्राहकांमध्ये वजनाबाबत विश्वास निर्माण होतो. ■ बाजारपेठेचा अंदाज येत असल्याने बाजारात आणावयाच्या मालाबाबत नियोजन करणे शक्य ■ कोणत्याही प्रकारच्या परवान्यांची आवश्यकता नाही ■ ग्रामीण भागातील युवकांना चांगल्या अर्थार्जनाचा रोजगार उपलब्ध ■ ग्राहकांच्या मागणीनुसार मालाचा पुरवठा ■ थेट विक्रीमुळे मध्यस्थांना मिळणारी रक्कम थेट शेतकऱ्याला प्राप्त. ■ ताजा स्वच्छ शेतमाल थेट शेतकऱ्यांकडून उपलब्ध ■ शेतकरी विक्री करीत असल्याकारणाने मालाच्या प्रतीबाबत खात्री ■ थेट शेतकऱ्यांशी संवाद होत असल्याकारणाने ग्राहक आपली गरज शेतकऱ्याला सांगू शकतात. ■ घराजवळ भाजीपाला बाजारपेठ उपलब्ध ■ भाजीपाला खरेदीचे आठवड्याचे नियोजन करता येते ■ एकाच छताखाली भाजीपाला, फळे, प्रक्रिया उत्पादने, ग्रामीण उत्पादने ग्राहकांना उपलब्ध.

## शेतकऱ्यांचे प्रशिक्षण

शेतकरी बाजारात येणाऱ्या शेतकऱ्यांना बाजार चालविण्याचे तसेच बाजारात येणाऱ्या ग्राहकांबरोबर कसे वागावे, सलोख्याचे संबंध कसे प्रस्थापित करावेत, शेतमालाची विक्री कशी करावी, शेतमालाची माहिती कशी द्यावी, वजनाची हमी, भावाबाबत माहिती देण्याकरिता तसेच संपूर्ण बाजाराच्या आयोजनाबाबत प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. यासाठी कृषी पणन मंडळात प्रशिक्षण आयोजित करण्यात येते. हे प्रशिक्षण विनामूल्य असून शेतकरी बाजारात विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणाचा खर्च कृषी पणन मंडळातर्फे करण्यात येतो. अशाप्रकारे शासनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी शेतकरी आठवडी बाजार सुरू करून शेतकऱ्यांना सक्षम पर्याय उपलब्ध करून दिला आहे.

# शेतमालास वाजवी दर

शेतमाल काढल्यानंतर तातडीने आडत्याला विकण्याऐवजी तो तारण ठेवून, पैशांची गरज भागावी आणि बाजारपेठेतील गरजेनुसार शेतमालाला योग्य आणि वाजवी दर मिळावा, या उद्देशाने राज्यात शेतमाल तारण योजना सुरू करण्यात आली. सरकारने चालू आर्थिक वर्षात त्यासाठी सुमारे ५० कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला आहे. याद्वारे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल.

सुगीच्या कालावधीत शेतकरी एकाच वेळी मोठ्या प्रमाणात शेतीमाल विक्रीसाठी बाजारात आणतात. त्यामुळे शेतमालाचे बाजार भाव कमी होऊन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. अशा वेळी स्थानिक पातळीवर शेतमाल साठवणुकीच्या पुरेशा सुविधा उपलब्ध नसतात. शेतकऱ्यांना त्यादिवशी जो भाव आहे त्याच किंमतीमध्ये



शेतमाल विक्री करावा लागतो. बाजारसमित्यांमध्ये शेतमाल नेण्यासाठी वाहतूक खर्च मोठ्या प्रमाणत येतो. परिणामी शेतकऱ्यांना नुकसान सोसावे लागते. त्या पार्श्वभूमीवर शेतमाल तारण योजनेच्या माध्यमातून शेतमालाची साठवणूक करून काही कालावधीनंतर बाजारपेठेत विक्रीसाठी आणल्यास शेतकऱ्याला चांगले उत्पन्न मिळू शकते. ही बाब लक्षात घेऊन शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकारने शेतमाल तारण योजना सुरू केली.

या योजनेमध्ये तूर, मूग, उडीद, सोयाबीन, सूर्यफूल, चना, भात (धान), करडई, ज्वारी, बाजरी, मका, गहू, काजू बी, बेदाणा व हळद या शेतमालाचा समावेश करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना बाजार समितीच्या गोदामात तारण ठेवलेल्या शेतमालावर एकूण किंमतीच्या ७५ टक्केपर्यंत रक्कम मिळते. ही रक्कम ६ महिन्यांसाठी ६ टक्के व्याज दराने देण्यात येते. ही योजना पणन मंडळाच्या स्वनिधीतून बाजार समित्यांमार्फत राबवली जाते. सहा महिन्यांच्या आत तारण कर्जाची परतफेड करणाऱ्या बाजार समित्यांना ३ टक्के व्याज सवलत मिळते.

## तारण कर्जासाठी तरतूद

२०१५-१६ या हंगामात या योजनेंतर्गत ६३ बाजार समित्यांचे १०४ कोटी ८५ लाख रुपयांच्या तारणकर्ज मंजुरीसाठी प्रस्ताव सरकारकडे आले आहेत. यापैकी ६० बाजार समित्यांना ३३ कोटी ५५ लाख रुपयांची तारण कर्ज मर्यादा मंजूर करण्यात आली. तसेच ३२ बाजार समित्यांमध्ये १,६७४ शेतकऱ्यांचा एकूण २० कोटी २२ लाखांचा

६१,४५५ क्विंटल शेतमाल तारण म्हणून स्वीकारला आहे. त्यापोटी १४ कोटी ३१ लाख रुपये तारण कर्जाचे वाटप करण्यात आले. २०१६-१७ मध्ये शेतमाल तारण कर्ज योजना राबवण्यासाठी पणन मंडळाने ५० कोटींची तरतूद केली. त्यानुसार या हंगामात तारण कर्ज योजना राबवण्यासाठी १२४ बाजार समित्यांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यांना ४० कोटी ८४ लाख इतकी तारण कर्ज मर्यादा मंजूर करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत राज्यातील ९५ बाजार समित्यांनी १२ मे २०१७ पर्यंत ४५९२ शेतकऱ्यांचा २ लाख १५ हजार ३५१ क्विंटल शेतमाल तारणात स्वीकारला. त्यांना ४२ कोटी १० लाख इतक्या रक्कमेचे तारणकर्ज वितरित केले.

## शेतमालानुसार तारण कर्जाची सुविधा

सोयाबीन, तूर, मूग, उडीद, चना, भात (धान) करडई, सूर्यफूल, हळद, ज्वारी, बाजरी, मका व गहू यासाठी एकूण किंमतीच्या ७५ टक्के रक्कम. प्रचलित बाजारभाव किंवा किमान आधारभूत किंमत यापैकी कमी असेल ती रक्कम दिली जाते. काजू बी एकूण किंमतीच्या ७५ टक्के रक्कम. ५० रुपये प्रतिकिलो अथवा प्रत्यक्ष बाजार भावाची किंमत यापैकी कमी असेल ती रक्कम. बेदाणा एकूण किंमतीच्या कमाल ५० टक्के किंवा जास्तीत जास्त ५०,००० रुपये प्रतिमेट्रिक टन यातील कमी असणारी रक्कम.

### प्रमुख वैशिष्ट्ये

- **शेतमाल तारण कर्ज योजनेंतर्गत फक्त उत्पादक शेतकऱ्यांचाच शेतमाल स्वीकारला जातो. व्यापाऱ्यांचा शेतमाल स्वीकारला जात नाही.**
- **प्रत्यक्षात तारण ठेवलेल्या शेतमालाची किंमत ही त्या दिवसाचे बाजारभाव किंवा शासनाने जाहीर केलेली खरेदी किंमत यापैकी जी कमी असेल ती ठरवण्यात येते.**
- **तारण कर्जाची मुदत ६ महिने असून या कर्जाचा व्याजाचा दर ६ टक्के असा आहे.**
- **बाजार समितीकडून कृषी पणन मंडळास ३% प्रमाणे कर्ज व्याजाची परतफेड केली जाते. उर्वरित ३ टक्के बाजार समितीस प्रोत्साहनपर अनुदान मिळते. मुदतीत कर्ज परतफेड न केल्यास व्याजात सवलत मिळत नाही.**
- **६ महिने मुदतीनंतर सहा महिन्यांपर्यत ८ टक्के व्याज दर व त्याच्या पुढील सहा महिन्यांसाठी १२ टक्के व्याजदर आकारणी केली जाते. तारण ठेवलेल्या शेतमालाची साठवणूक, देखरेख व सुरक्षा बाजार समिती विनामूल्य करते.**
- **तारणातील शेतमालाचा विमा उतरवण्याची जबाबदारी संबंधित बाजार समितीची असते.**

## राज्य वखार महामंडळाची तारण कर्ज सुविधा

राज्य वखार महामंडळाची राज्यात १७८ वखार केंद्रे असून एक हजार गोदामामध्ये १५ लाख ४० हजार मेट्रिक टन साठवण क्षमता आहे.



केंद्र सरकारने ३१ डिसेंबर २०१२ च्या धोरणानुसार सवलतीच्या व्याजदराची तारणकर्ज योजना लागू केली आहे. 'शेतमाल काढणी पश्चात' व्यवस्थापनांतर्गत महामंडळाने गोदामातील शेतमालास 'ई- वखार पावतीद्वारे' तारणकर्ज योजना सुरू केली आहे. या योजनेनुसार वखार पावतीवर ठेवलेल्या शेतमालाच्या मूल्याच्या ७० टक्क्यांपर्यंत तारणकर्ज बँकामार्फत दिले जाते. महामंडळाने देना बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, पंजाब नॅशनल बँक, युको बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, एच.डी.एफ.सी.बँक, आय.डी.बी.आय.बँक या राष्ट्रीयकृत बँकाशी द्विपक्षीय करारनामे केले आहेत. त्याद्वारे वखार पावतीवर शेतकऱ्यांना ऑनलाइन तत्काळ तारणकर्ज मिळण्याची सुविधा उपलब्ध केली आहे.

महामंडळाने २०१५-१६ मध्ये १४,७८४ शेतकरी आणि २१,८६३ व्यापाऱ्यांना ३०७ कोटी ५७ लाख रुपये तारणकर्ज रक्कम दिली. याशिवाय आयडीबीआय व सेंट्रल बँक ऑफ इंडिया या बँकासह एनसीडीईएक्स या स्टॉक एक्स्चेंजशी त्रिपक्षीय करारनामा केला आहे. लातूर शहर वखार केंद्रावरून सोयाबीन विक्रीचा व्यवहार एनसीडीईएक्समार्फत ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत आहे. ही योजना राज्यातील उर्वरित जिल्ह्यात महामंडळ राबवणार आहे. नाशवंत शेतमालाच्या निर्यात वृद्धीसह, नाशवंत शेतमालास तारणकर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महामंडळाने अपेडाच्या मदतीने पनवेल येथे ५ हजार मेट्रिक टनाचे शीतगृह उभे केले आहे.

**शब्दांकन : काशीबाई थोरात**
विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

**कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या कामकाजात सुसूत्रता, पारदर्शकता यावी, शेतकऱ्याची फसवणूक होऊ नये आणि आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यापर्यंत पोहोचावे यासाठी 'ऑनलाइन' प्लॅटफार्म उपलब्ध करून देण्यात आला आहे. 'महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पांतर्गत' राहता, चिखली, अकोट, धामणगाव रेल्वे, हिंगणघाट या पाच बाजार समित्यांमध्ये संगणकीकृत पद्धतीने ऑनलाइन लिलाव सुरू झाला आहे. टप्प्याटप्प्याने राज्यातील अन्य बाजार समित्यांचे कामकाज ऑनलाइन करण्यात येत आहे.**



# बाजार समित्या ऑनलाइन

राज्यात ३०६ कृषी उत्पन्न बाजार समित्या आहेत. त्याद्वारे धान्य, फळे यांची मोठ्या प्रमाणात खरेदी विक्री होत असते. सन २०१५-१६ या वर्षात जवळपास ६५ हजार कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल झाली. या बाजारसमित्यांमध्ये इन गेट एन्ट्री(प्रवेश), वजन, लिलाव, देयक व ऑउट गेट एन्ट्री संगणकीकृत लिलाव पद्धतीने करण्यात येत आहे. याव्यतिरिक्त इतर निवडक २० बाजार समित्यांमध्ये संगणकीकृत पद्धतीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. यात संगमनेर, जामखेड, बारामती, इंदापूर, अकलूज, सांगोला, दुधनी, पंढरपूर, सिंदी (सेलू), चांदूरबाजार, मेहकर, जिंतूर, चांदवड, दिंडोरी, लासलगाव, फलटण, तासगाव, धर्माबाद, जालना, नांदेड या बाजार समित्यांचा समावेश आहे.

या बाजार समित्यांमधील सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी, व्यापारी व अडते यांना लिलाव पद्धती प्रणालीचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. या बाजार समित्यांमध्ये सध्या संगणकीकृत पद्धतीने इन गेट एन्ट्री सुरू करण्यात आली आहे. यापैकी, बाजार समिती - संगमनेर येथे शेतमालाचा लिलाव संगणकीकृत लिलाव पद्धतीद्वारे करण्यात येत आहे. उर्वरित १९ बाजार समित्यांमध्ये लवकरच या प्रकारे व्यवहार सुरू होतील. सध्या, बाजार समितीमध्ये आवक झालेल्या गहू, मका, बाजरी, सोयाबीन, ज्वारी इ. शेतमालाचा या लिलाव प्रक्रियेत समावेश करण्यात आला आहे. या कार्यपद्धतीमुळे लिलाव प्रक्रियेमध्ये सुसूत्रता व पारदर्शकता आली असून शेतकऱ्यांच्या शेतमालाला रास्त भाव मिळण्यास मदत होत आहे.

### ऑनलाइनचे फायदे

- **पाच बाजार समित्यांचे कामकाज ऑनलाइन सुरू.**
- **शेतकऱ्यांना 'ऑनलाइन' प्लॅटफार्म उपलब्ध**
- **शेतमाल विक्रीसाठी अनेक पर्याय खुले.**
- **शेतकरी व व्यापारी यांच्या मध्यस्थी साखळीला आळा.**
- **बाजार समित्यांमध्ये ऑनलाइन पद्धतीने लिलाव सुरू.**
- **राष्ट्रीय कृषी बाजार योजना सुरू.**
- **शेतमालाला मिळणार रास्त भाव.**

## बाजार समित्या ई-ट्रेडिंगवर

केंद्र शासनाने सर्व बाजार समित्या ई-ट्रेडिंग व्यासपीठावर आणण्यासाठी राष्ट्रीय कृषी बाजार (एनजीएम) योजना सुरू केली आहे. या अंतर्गत पहिल्या टप्प्यात अहमदनगर, नेवासा, अकोला, अचलपूर, औरंगाबाद, गेवराई, तुमसर, मलकापूर, वरोरा, धुळे, अहेरी, अर्जुनी मोरगाव, वसमत, कोल्हापूर, लातूर, नागपूर, भोकर, नंदुरबार, मालेगाव, येवला, परभणी, सेलू, दौंड, शिरूर, आटपाडी, सांगली, लोणंद, बार्शी, वर्धा, वणी या ३१ बाजारसमित्यांची निवड करण्यात आली आहे. यापैकी १२ बाजार समित्यांमध्ये ई-इन गेट एन्ट्री ऑनलाइन सुरू झाली आहे. केंद्र शासनाने यासाठी ९ कोटींचा निधी मंजूर केला आहे. यामध्ये प्रत्येक बाजारसमितीला ३० लाख रूपये संगणकीकृत साहित्यासाठी देण्यात आले आहेत. दुसऱ्या टप्प्यात राहुरी, मंगरूळपीर, मूर्तिजापूर, अमरावती, दर्यापुर, सिल्लोड, वैजापूर, बीड, परळी वैजनाथ, देऊळगाव राजा, खामगाव, दोंडाईचा, गोंदिया, हिंगोली, चोपडा, भोकरदन, वडगाव पेठ, उदगीर, मुंबई, कटोल, शहादा, पिंपळगाव बसवंत, नाशिक, मानवत, जुन्नर, खेड, पुणे, पनवेल, कराड, सोलापूर या बाजार समित्यांचा समावेश आहे.

## स्पर्धात्मक बाजारपेठेचे पर्याय

शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी अनेक पर्याय उपलब्ध होणार आहेत. स्पर्धात्मक बाजारपेठेचे पर्याय खुले होऊन शेतमाल राज्याबाहेर सुद्धा विकण्याची परवानगी मिळणार आहे. शेतमालास रास्त दर, शेतकऱ्यांच्या बिलामध्ये होणारी अनधिकृत कपात, शेतकरी व व्यापारी यांच्यातील मध्यस्थ साखळीला आळा बसणार आहे.

# कृषी ॲप्स

**माहिती तंत्रज्ञानाचे जाळे खेडोपाडी जाऊन पोहोचले आहे. शेतकरीदेखील वीज बील ऑनलाइन पेमेंट करून भरत आहे. स्मार्ट फोनच्या माध्यमातून शेतकरी स्मार्ट झाले आहेत. शेतमालाचे ऑनलाइन भाव पाहणे, हवामानाचा अंदाज घेणे, कृषीविषयक सल्ला घेणे आदी कामे शेतकरी मोबाइलद्वारे करू लागले आहेत. कृषी क्षेत्राविषयी अत्यंत उपयुक्त माहिती देणारे अनेक ॲप्स गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहेत. शेतीसंदर्भातील माहिती देण्याऱ्या अशा मोबाइल ॲप्सचा अधिकाधिक शेतकऱ्यांनी वापर करावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. काही उपयुक्त ॲप्सची माहिती....**

| अ.क्र | मोबाइल ॲपचे नाव | ॲपद्वारे उपलब्ध होणारी माहिती | मोबाइल ॲप डाऊनलोड करण्याचे सुविधा स्थळ |
|---|---|---|---|
| १ | शेतकरी मासिक (Shetkari Masik) | शेतकरी मासिकातील लेख | गुगल प्ले स्टोअर, फार्मर पोर्टल, एम किसान पोर्टल |
| २ | महारेन (Maharain) | मंडळ, तालुका, जिल्हा, विभाग स्तरावरील आजपर्यंतचा व सर्वसाधारण पाऊस | महारेन |
| ३ | क्रॉप क्लिनिक (Crop clinic) | सोयाबीन, कापूस, भात, तूर व हरभरा या ५ पिकांच्या किडी व रोग व त्यांच्या उपाययोजना किडनाशके ट्रेड नेम व दुकानदाराची यादी | mahaagriiqc.gov.in |
| ४ | कृषी मित्र (Krishi mitra) | तालुक्यातील खते, बियाणे, औषधे विक्रेत्यांची माहिती | mahaagriiqc.gov.in |
| ५ | एम किसान भारत (mKisan India) | कृषी हवामानविषयक शेतीसाठी उपयुक्त सल्ले | फार्मर पोर्टल, एम किसान पोर्टल |
| ६ | किसान सुविधा (Kisan Suvidha) | हवामान, कृषी निविष्ठा व्यापारी, बाजारभाव पीक संरक्षण व तज्ज्ञ सल्ला याबाबत मागणी | गुगल प्ले स्टोअर, फार्मर पोर्टल, एम किसान पोर्टल |
| ७ | पुसा कृषी (Pusa Krishi) | पिकांच्या विविध जाती व अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती | गुगल प्ले स्टोअर, फार्मर पोर्टल, एम किसान पोर्टल |
| ८ | क्रॉप इनशुरन्स (Crop Insurance) | पीक विमा माहिती | गुगल प्ले स्टोअर, फार्मर पोर्टल, एम किसान पोर्टल |
| ९ | डिजिटल मंडी भारत (Digital Mandi India) | तालुका, जिल्हा, राज्यस्तरीय बाजारसमितीचे शेतमालाचे दर | गुगल प्ले स्टोअर, फार्मर पोर्टल, एम किसान पोर्टल |
| १० | ॲग्री मार्केट (AgriMarket) | ५० किमी परिसरातील शेती उत्पादनाचे बाजारभाव व जिल्हा/राज्य/देश पातळीवरील महत्तम दर | गुगल प्ले स्टोअर, फार्मर पोर्टल, एम किसान पोर्टल |
| ११ | पशू पोषण (Pashu Poshan) | जनावराचे आहारविषयक मार्गदर्शन | गुगल प्ले स्टोअर, फार्मर पोर्टल, एम किसान पोर्टल |
| १२ | Cotton (Kapus) | कापूस लागवड तंत्रज्ञानाची माहिती | गुगल प्ले स्टोअर |
| १३ | एकात्मिक कीड व्यवस्थापन (IPM) | मुख्य पिकावरील कीड व्यवस्थापनाची माहिती | गुगल प्ले स्टोअर |
| १४ | हळद लागवड (Halad Lagwad) | हळद लागवड, प्रक्रिया व तंत्रज्ञानाची माहिती | गुगल प्ले स्टोअर |
| १५ | पीक पोषण (Plant nutrition) | पिकांसाठी अन्नद्रव्याची गरज, आवश्यकता कमतरतेची लक्षणे, अन्नद्रव्ये संवेदनशील पिके, सुक्ष्म अन्नद्रव्ये इ.बाबत माहिती | गुगल प्ले स्टोअर |
| १६ | लिंबूवर्गीय फळझाडांची लागवड (Citrus Cultivaiton) | मोसंबी व लिंबूवर्गीय फळझाडांच्या लागवडीबाबत माहिती | गुगल प्ले स्टोअर |
| १७ | शेकरू (Shekaru) | कृषी योजना, प्रदर्शने, प्रशिक्षण याबाबतची माहिती | गुगल प्ले स्टोअर |
| १८ | इफ्को किसान (IFFCO Kisan) | हवामान, बाजारसमिती दर, तज्ज्ञ, ज्ञानभांडार, सल्ला, बातम्या, बाजार प्रोफाइल, जॉब्स, व्हिडीओ | गुगल प्ले स्टोअर |

कृषी विभाग संकेतस्थळ: http://www.krishi.maharashtra.gov.in

**संकलन : मंगेश कोळी**

# सर्व शाळा डिजिटल करणार

**'विद्यार्थ्यांसाठी शिक्षण क्षेत्रातील सुधारणा' या विषयाच्या अनुषंगाने शिक्षण, महाराष्ट्राची शिक्षण क्षेत्रातील आघाडी, शिक्षण क्षेत्रातील संशोधन आणि भविष्यातील आव्हाने यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यभरातून आलेल्या निवडक विद्यार्थ्यांशी 'मी मुख्यमंत्री बोलतोय...' या कार्यक्रमाच्या माध्यमातून संवाद साधला. सह्याद्री वाहिनी, झी २४ तास, झी मराठी, साम मराठी वाहिनीवरून प्रक्षेपित आणि आकाशवाणीवरून प्रसारित झालेल्या या कार्यक्रमाचा संपादित भाग...**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्यावतीने 'मी मुख्यमंत्री बोलतोय...' कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. 'विद्यार्थ्यांसाठी शिक्षण क्षेत्रातील सुधारणा' या विषयाच्या अनुषंगाने राज्यातील विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत संवाद साधला. मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची समर्पक उत्तरे देत महाराष्ट्राच्या प्रगत शैक्षणिक वाटचालीची माहिती दिली.

### उज्ज्वल भविष्याची हमी

अज्ञानातून ज्ञानाकडे, वाईटातून चांगल्याकडे नेण्याचे काम शिक्षण करते. शिक्षणामुळे बुद्धी प्रखर होतेच पण उज्ज्वल भविष्यही घडते. शिक्षणाच्या जोरावरच आपल्याला विकास आणि प्रगती करता येते. महाराष्ट्राला संपन्नतेचा वारसा असण्याबरोबरच शिक्षण क्षेत्रात केलेली प्रगती निश्चितच कौतुकास्पद आहे. आज काळाच्या ओघात आणि बदलत्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षण क्षेत्रासमोरही वेगवेगळी आव्हाने येत आहेत. अनेकदा समोर येणारे प्रश्न, समस्या आणि आव्हाने यांचा नीट अभ्यास केला तर अनेक उत्तरे मिळतात. यश आणि विकासासाठी शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे आहे. महाराष्ट्राने गेल्या दोन वर्षात शिक्षण क्षेत्रात १८ व्या क्रमांकावरून तिसऱ्या क्रमाकांवर आघाडी घेतली आहे. प्रगत शैक्षणिक अभियानांतर्गत शाळांनी समाधानकारक प्रगती केली आहे. येणाऱ्या काळात महाराष्ट्राचे शिक्षण क्षेत्राचे विस्तारीकरण होण्याबरोबरच सर्वसमावेशक शिक्षणात महाराष्ट्र उत्कृष्ट प्रगती करेल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना पुढीलप्रमाणे उत्तरे दिली.

**खासगी शाळांमधील फी वाढ आणि डोनेशन याबाबत पालक नेहमीच साशंक असतात. इंग्रजी आणि खासगी शाळांमधील डोनेशन यामुळे पालकवर्ग संभ्रमावस्थेत आहे. अशा परिस्थितीत इंग्रजी शाळा बंद करून जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेचा दर्जा उंचावणे गरजेचे आहे. या मृतप्राय होत असलेल्या प्राथमिक शाळांना पुन्हा जीवित करणार का? आणि कशाप्रकारे?**

प्रशांत मिरजकर (ईमेलद्वारे)

**महाराष्ट्राची सध्याची स्थिती पाहता फक्त श्रीमंतांसाठीच शिक्षण असे एका प्रकारचे अघोषित आरक्षण सुरू आहे. शिक्षणाचे बाजारीकरण थांबवण्याची जबाबदारी शासनाने घ्यावी असे आपल्याला वाटते का ?**

मीनाक्षी पाटील (ईमेलद्वारे)




**मुख्यमंत्री –** पहिल्यांदा तर मला हे मान्यच नाही की, जिल्हा परिषदेच्या शाळा या मृतप्राय होत आहेत, कारण मागच्या वर्षी खासगी शाळातून १५,००० विद्यार्थी हे जिल्हा परिषदेच्या शाळेत आले आहेत. मी धुळ्याच्या काही पालकांशी बोललो, तिथे मोठ्या प्रमाणात स्थलांतर झाले आहे. ते पालक मला म्हणाले की, आम्हाला खासगी शाळांपेक्षा जिल्हा परिषदेच्या शाळा चांगल्या वाटल्या. म्हणून आम्ही आमच्या मुलांना खासगी शाळांमधून काढून जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये घातले. या शाळेमध्ये उपलब्ध असलेल्या भौतिक सुविधा, चांगले शिक्षण यामुळे आम्ही आमच्या मुलांना जिल्हा परिषदेच्या शाळेत घातले आहे. या शाळेतील मुलांचे ज्ञान बघितले तर ते वाढत आहे. काही गावांमध्ये तर पालक शाळेच्या पहिल्या दिवशी प्रभातफेरी काढून मुलांना शाळेत आणतात. खासगी शाळांनी नफेखोरी करू नये याकरिता आपण एक 'फी रेग्युलेटरी ॲथॉरिटी'(शुल्क नियामक प्राधिकरण) ही मागच्या काळात तयार केली होती. पण त्याच्यामध्ये ज्या प्रकारे काम होणे अपेक्षित होते ते झाले नाही. आपण न्यायमूर्ती बी.पळशीकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती तयार केलेली आहे. या समितीच्या माध्यमातून फी संदर्भातील कायद्यातील त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

दरम्यानच्या काळात राज्य शासनाने समाजातील अनेक घटकांकरिता फी प्रतिपूर्तीची योजना आणली आहे. आपण 'राजर्षी

शाहू महाराज प्रतिपूर्ती योजना' तयार केली आहे, या योजनेमध्ये सर्व जातिधर्माच्या लोकांना शिष्यवृत्ती देत आहोत. मग ते अल्पसंख्याक असो, की बहुसंख्याक असो कुठल्याही जातीचे असो, धर्माचे असो, आपण त्या विद्यार्थ्यांना योजनेंतर्गत सामावून घेत आहोत.

**अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी काही विशेष सुविधा आहेत का?**
**रॉबिन जॉन, विद्यार्थी**

**मुख्यमंत्री –** अल्पसंख्याक विद्यार्थ्यांनी समाजाच्या मुख्य प्रवाहात यावे, यासाठी आपण विविध योजना राबवत आहोत. या विद्यार्थ्यांना महामंडळामार्फत शैक्षणिक कर्ज, शैक्षणिक योजनांचा लाभ मिळावा, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

**माझ्या गावाकडच्या छोट्या मित्र मैत्रिणींना इंग्रजी शाळेत शिकायचे आहे, यासाठी तुम्ही काय कराल?**
**बबिता मेढा, पालघर**

**मुख्यमंत्री –** आतापर्यंत आपण आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना आश्रम शाळेत शिकवायचो. या शाळांमध्ये शिकणारे विद्यार्थी दुर्गम भागामध्ये राहायचे. तिथल्या सुविधांच्या कमतरतेमुळे हे विद्यार्थी अनेक शैक्षणिक अडचणींना सामोरे जायचे. शासनामार्फत विद्यार्थ्यांचे हित केंद्रस्थानी ठेवून योजना करण्यात आल्या. आदिवासी विद्यार्थ्यांनी फक्त आश्रमशाळेत न शिकता त्या विद्यार्थ्यांनी इतरांबरोबर नामांकित शाळेत का शिकू नये असा विचार आम्ही केला. म्हणून आम्ही निर्णय घेतला की, दरवर्षी २५ हजार आदिवासी विद्यार्थ्यांना नामांकित शाळेमध्ये प्रवेश द्यायचा. या विद्यार्थ्यांचा संपूर्ण शैक्षणिक खर्च राज्य शासनाच्या वतीने करायचा. आदिवासी विकास विभागामार्फत प्रत्येक जिल्हानिहाय नामांकित शाळा शोधून काढण्यात आल्या आहेत. पहिल्या वर्षी २५ हजार, दुसऱ्या वर्षी २७ हजार आणि आता त्यापेक्षाही जास्त विद्यार्थ्यांना आपण नामांकित शाळेमध्ये प्रवेश देत आहोत.

काही ठिकाणी तर ५० हजार रुपयांपर्यंतची त्यांची फी, म्हणजे राहणे, खाणे सगळा खर्च राज्य शासनाच्या वतीने करण्यात येत आहे. यातून आदिवासी विद्यार्थी समाजाच्या इतर विद्यार्थ्यांसोबत शिकत असल्यामुळे या विद्यार्थ्यांमधील सामाजिक बुजरेपणा कमी होण्यास मदत होईल. वेगवेगळ्या शहरांमध्ये या विद्यार्थ्यांची सोय झाल्यामुळे नवीन वातावरणात, नवीन पद्धतीचे शिक्षण याचा त्यांना अनुभव घेता येईल.

नवनवीन विद्यार्थ्यांबरोबर त्यांची ओळख होईल आणि त्यातून एक आदर्श आदिवासी पिढी तयार होईल. या दृष्टीने योजना तयार करण्यात आली आहे. त्यामुळे जेवढी मुले या ठिकाणी प्रवेश मागतील त्या सर्वांना आम्ही प्रवेश देणार आहोत.

**प्रश्न – जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र योजना राबवत असताना आपण ग्रामीण महाराष्ट्रातील शाळा डिजिटल करणार का ? कशाप्रकारे? यात शिक्षकांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्याची योजना शासन राबवत आहे का?**
**प्रताप भोसले, करमाळा (ईमेलद्वारे)**

**मुख्यमंत्री –** आतापर्यंत आपण ४४ हजार शाळा डिजिटल केल्या आहेत. यापैकी बहुतांशी शाळा या ग्रामीण भागातील आहेत. अधिकाधिक शाळांमध्ये कनेक्टिव्हिटी देत राज्यातील सर्व शाळा डिजिटल करण्याचे लक्ष्य आहे. डिसेंबर २०१८ पर्यंत राज्यातील सर्व शाळा डिजिटल करण्यात येणार आहेत. आतापर्यंत नागपूर जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये १०० टक्के कनेक्टिव्हिटी देण्यात आली असून, येथील काही शाळा ऑनलाइन तर काही ऑफलाइन डिजिटल करण्यात आल्या आहेत. अनेक ठिकाणी फायबर ऑप्टिक पोहोचत

**प्रश्न – मौलाना आझाद अल्पसंख्याक विकास महामंडळामार्फत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज देण्यात येते याविषयी काय सांगाल ?**
**(अन्सारी सादिया, साबू सिद्दीकी इंजिनिअरींग कॉलेजची विद्यार्थिनी, भिवंडी)**



**'मी मुख्यमंत्री बोलतोय' या कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थिनींसोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.**

**मुख्यमंत्री –** अल्पसंख्याक समाजातील मुलांनी जास्तीत जास्त शिकले पाहिजे, समाजाच्या मुख्य प्रवाहात यायला पाहिजे याकरिता योजना आहेत. इंजिनिअरींग, मेडिकल, एमबीए आणि प्रोफेशनल कॉलेजेस, व्यावसायिक महाविद्यालयांमध्ये अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांने जर प्रवेश घेतला तर त्याची ५०% फी राज्य शासनाच्या वतीने भरली जाईल. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांला उरलेल्या ५०% फीसाठी शैक्षणिक कर्ज मिळू शकते. त्याचे व्याज राज्य शासन भरेल, अशी व्यवस्था करण्यात आली आहे. राज्य शासन जास्तीत जास्त अल्पसंख्याक वर्गापर्यंत योजना पोहोचवण्याचा प्रयत्न करेल. आपणही आपल्या स्तरावर आणि आपल्या मित्रपरिवारातर्फे योजना पोहोचवण्यासाठी प्रयत्न करावे.

असल्याने आम्ही कनेक्टिव्हिटी देऊ शकू. एकदा का प्रत्येक ठिकाणी कनेक्टिव्हिटी पोहोचली की, ऑनलाइन अभ्यासक्रमास चांगला प्रतिसाद मिळेल.

शिक्षकांना संगणक वापरता येतो, त्या शिक्षकांनी स्वत:ला 'टेकसॅव्ही' असे घोषित करावे असे सांगण्यात आले होते. त्यानुसार ५० हजार शिक्षकांनी स्वत:ला 'टेकसॅव्ही' घोषित केले आहे. ज्या शिक्षकांचा तंत्रज्ञानाशी संबंध आहे. ज्यांना मोबाइल वापरता येतो, त्यांना तंत्रज्ञान हाताळता येणे अशक्य नाही. टेक्नॉलॉजी, टेकसॅव्ही शिक्षक आणि आपले प्रगत शैक्षणिक अभियान या तिघांचा संगम करून शाळांमध्ये ज्ञान देण्याचा आपण प्रयत्न करत आहोत.

'टेकसॅव्ही' शिक्षकांना प्रोत्साहित करू. शिक्षकांनी विविध प्रकारचे ॲप्स तयार केले आहेत. खरे म्हणजे आपल्याकडे 'यू हॅव्ह टू इन्सपायर पिपल. इन्सप्रिरेशन इज समथिंग विच वी लॅक्स...' आपल्या शिक्षकांमध्ये प्रचंड क्षमता असून शिक्षक फक्त पगार घेतात अशी टीका केली जाते.

शिक्षकांनी आमूलाग्र बदल करून एकेका वर्षात शाळेचे चित्र बदलून टाकले, गुणवत्ता बदलून टाकली आहे. अशा प्रकारे अनेक शिक्षकांनी नवनवीन प्रयोग आम्हाला दिले आहेत. त्यातील जे चांगले प्रयोग आहेत, ते इतर शाळेत नेण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.



**बाहेरच्या देशात अनेक विद्यार्थी एक महत्त्वाचा आणि एक उपविषय घेऊन शिकतात. तर अशी योजना आपल्याकडे आहे काय ? माझा अजून एक प्रश्न आहे की, इंजिनिअरींग शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येक सत्राला प्रत्येक विषयासाठी २५० पाने लिहावे लागतात. याप्रमाणे संपूर्ण वर्ष लिहिण्यात जाते, त्यामुळे इतर कोणत्याच गोष्टीत सहभाग घेता येत नाही. इंजिनिअरींगमध्ये डिजिटलायझेशन करता येईल का?**

गगनदीपसिंग बेदी

**मुख्यमंत्री –** आपल्या केंद्र शासनाने म्हणजेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यापासून त्यांनी 'चॉईस बेस्ड क्रेडीट सिस्टिम' तयार केली आहे. ही एक अशी क्रेडीट सिस्टिम आहे की, यामध्ये तुम्ही एकाच वेळी दोन ते तीन गोष्टी करू शकता. आता तर तुम्ही फॉर्मल सिस्टीममधून बाहेर पडून इनफॉर्मल सिस्टीममध्ये जाऊ शकता. एकाच वेळी दोन कामे करू शकता. अशा प्रकारे एक मोठे फ्रेमवर्क चॉइस बेस्ड क्रेडिट सिस्टीममध्ये आणले आहे. सध्या तरी याचा फोकस मूळ रूपात कौशल्य निर्मितीवर आहे. ही पद्धत विद्यार्थी वापरू शकतील. तुम्ही याचा अभ्यास करा. या माध्यमातून जी पद्धत बाहेरच्या देशामध्ये आहे तशीच पद्धत इथे आहे. हे पहिल्यांदाच केंद्र शासनाने केले आहे.

आपण डिजिटल व्हायला पाहिजे पण लेखन बंद व्हायला नको. भारतीय आणि इतर यांच्यात हाच फरक जाणवतो. उदाहरणार्थ जर आपण बाहेर गेलो आणि एखाद्याला गणित सोडवायला दिले तर ते कॅल्क्युलेटर शिवाय सोडवत नाहीत पण भारतीय लगेच सोडवतील. येथील मुलांना कितीही मोठे गणित द्या ते कॅलक्युलेटरशिवाय गणित सोडवतात. त्यामुळे जी लिहिण्याची आवड आहे ती सोडू नका. आपण नवीन तंत्रज्ञानाला नक्कीच स्वीकारले पाहिजे, पण चांगल्या सवयी कायम ठेवल्या पाहिजेत. जसे की वाचन. आज काही शोधायचे असेल तर वाचण्याऐवजी आपण गुगलचा वापर मोठ्या प्रमाणावर करतो. संशोधन करताना आम्ही इतके वाचायचो की, यामुळे आमच्या ज्ञानात भर पडायची. त्यामुळे आता याचा एक सुवर्णमध्य आपल्याला शोधायला हवा. डिजिटलायझेशन नक्की करा, पण लिहिण्याची सवय मोडू नका..

**ज्याप्रमाणे दर १० वर्षांनी शहरांचा विकास आराखडा बदलतो, त्याप्रमाणेच गरजेनुसार शैक्षणिक आराखडा बदलावा असे आपल्याला वाटते का?**

संजिव चेटुले, नागपूर

**मुख्यमंत्री –** मी तर असे सांगीन की बदलती परिस्थिती पाहता, दर पाच वर्षांनी शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या आराखड्याचा आढावा घेता आला पाहिजे. आता नवीन विद्यापीठ कायद्यात ही लवचीकता दिली आहे. जग वेगाने पुढे जात आहे. तंत्रज्ञान दर दोन वर्षांनी विकसित होते आहे. अशा परिस्थितीत विद्यापीठांत लवचीकता असायला हवी. ती आपण दिलेली आहे. विद्यापीठांनी सातत्याने अभ्यासक्रम व विषयांची प्रासंगिकता तपासली पाहिजे. विद्यापीठांचे काम दोन प्रकारे आहे. एक नवीन संशोधन मार्केटमध्ये देणे, दुसरे मार्केटमध्ये जे आहे त्याला अनुरूप मानव संसाधन तयार करणे. या दोन्हीकरिता विद्यापीठांची व्यवसायाशी, मार्केटशी, रिसर्चशी कनेक्टिव्हिटी असली पाहिजे ती करण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत.

आपण रूसासारखा केंद्र सरकारचा उपक्रम हाती घेतला असून त्यात मोठी गुंतवणूक करीत आहोत. काही शैक्षणिक संस्था स्वायत्त असल्याने त्या ताकदीने विकास करू शकतात. कारण जगात जे चांगले आहे ते पटकन अंगीकरता येते. मात्र संलग्न संस्थांना जोपर्यंत विद्यापीठ बदल करीत नाही, तोपर्यंत त्यांना बदल करता येत नाही. दहा प्लस दोन प्लस तीन हे सूत्र बदलण्याचा सध्या तरी विचार नाही.

**कल चाचणीच्या नावाखाली मार्च २०१७ पासून शासनाने दहावी व**

**बारावीच्या परीक्षा शुल्कात केलेली वाढ किती समर्थनीय आहे.**

संजय बोरगावकर, नागपूर

**मुख्यमंत्री –** कल चाचणी शुल्कामध्ये जी वाढ केली आहे ती वेगवेगळ्या गोष्टींसाठी केली आहे. ती अतिशय कमी वाढ आहे. माझ्या मते शिक्षणात गुणवत्ता असली पाहिजे. काही व्यक्तींमध्ये उपजत गुण असतात ते त्यालाही कधी समजत नाहीत. कल चाचणीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व पालकांना आत्मविश्वास येणार आहे. भविष्यात ही चाचणी अधिक आधुनिक करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. व्यक्तीला परीक्षण करून त्याच्या भविष्याचा रस्ता त्याच दिवशी सांगता आला पाहिजे.

**मी 'स्वयंम' योजनेची लाभार्थी असल्याने मला सोयीसुविधा भेटल्या आहेत. त्यामुळे माझ्या शिक्षणाचा आणि इतर खर्च भागत आहे. याचप्रमाणे माझ्या इतर मित्रमैत्रिणींना या योजनेचा लाभ मिळेल का ?**

कांचन नाना झोपा, पालघर

**मुख्यमंत्री –** नक्की होईल, आपण 'स्वयंम' योजना सुरू केली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांकरिता हॉस्टेलची संख्या कमी होती आणि दरवर्षी आदिवासी विद्यार्थी आंदोलन करायचे. कारण या विद्यार्थ्यांना हॉस्टेलमध्ये जागा मिळत नव्हती. दुर्गम भागातून आलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण सोडून द्यावे लागते कारण या विद्यार्थ्यांचे मुंबईत कोणीच नातेवाईक नसतात. त्यामुळे त्यांची राहण्याची व्यवस्था होत नाही. या विद्यार्थ्यांकडे पैसेही नसतात. पण 'स्वयंम' योजनेंतर्गत या सर्व विद्यार्थ्यांना हॉस्टेल नसलेल्या शहरामध्ये खोली घेऊन राहण्याकरिता, जेवणाकरिता, पुस्तकाकरिता आणि शैक्षणिक भत्ता, त्याचे आपण अनुदान देत आहोत.

या योजनेंतर्गत आतापर्यंत २५ हजार विद्यार्थ्यांना लाभ झाला आहे त्यामुळे जेवढे तुमचे मित्रमैत्रिणी असतील त्यांना या योजनेबद्दल सांगा. 'स्वयंम' योजनेचा आपण सर्वांनी जरूर लाभ घ्यावा. या योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपले शिक्षण पूर्ण करावे. या योजनेमुळे कोणत्याही विद्यार्थ्यांला आपले शिक्षण अर्धवट सोडावे लागणार नाही.

**मी एमबीएची विद्यार्थिनी आहे, थिअॅरिटीकलपेक्षा प्रॅक्टिकल ज्ञानावर अधिक भर हवा असे मला वाटते. त्यानुसार अनुभवातून विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकल शिक्षण मिळेल अशा यंत्रणेचा शिक्षण व्यवस्थेत समावेश करता येईल का ?**

रिचेल मेन्डोंसा, मुंबई

**मुख्यमंत्री –** शिक्षण हे उपयोजित (अप्लाईड) हवे. शिक्षण हे केवळ सैद्धांतिक (थिअॅरीटीकल) असून चालणार नाही. प्रात्यक्षिक (प्रॅक्टिकल) शिक्षण आपण मोठ्या प्रमाणावर शिक्षण पद्धतीत आणत आहोत. आधी अॅप्रेंटिसच्या कायद्यात जाचक अटी असल्यामुळे कुणीही अॅप्रेंटिस ठेवायला तयार नव्हते मात्र या कायद्यातील त्रुटी आपण दूर केल्यानंतर ६९ हजार अॅप्रेंटिस तयार झाले. ते एक लाख होतील. हा आकडा वाढत जाणार आहे. अॅप्रेंटिसचा अर्थ म्हणजे हॅण्ड ऑन ट्रेनिंग होतो. ट्रेनिंगनंतर रोजगार उपलब्ध होतो.

**मराठवाडा जैसे इलाके में बेरोजगारी बहुत है! अगर यहाँ की युवा पिढी को कौशल्य प्रशिक्षण मिलेगा तो उसका इस्तमाल करते ये युवा रोजगार निर्माण कर सकते है! इस के लिए आप क्या करने वाले है!**

शेख जावेद, औरंगाबाद



**मुख्यमंत्री –** गेल्या काळात २४ उद्योगांशी सामंजस्य करार करून ८ लाख तरुणांना कौशल्य प्रशिक्षित करण्यासंदर्भात काम सुरू केले आहे. 'प्रमोद महाजन कौशल्य प्रशिक्षण योजना' चालवत आहोत. यातून विविध प्रकारचे कौशल्य प्रशिक्षण दिले जात आहे. मराठवाड्यात याद्वारे मोठी व्यवस्था उभी केली आहे. शिवाय आपण आता तीन लाख शेतकऱ्यांच्या मुलांना शेती, शेतीपूरक उद्योगातील कौशल्य देण्याचे कोर्स सुरू केले आहेत. मोठ्या प्रमाणावर हे प्रशिक्षण आपण देणार आहोत. बेरोजगारीच्या प्रश्नावरील खरे उत्तर म्हणजे कौशल्य विकास होय, असे मला वाटते.

**माझ्या मुलीला बारावीनंतर हॉटेल मॅनेजमेंट करायचे आहे. मात्र, एका संस्थेत एका वर्षाची फी ४ लाख रूपये आहे. माझे पती रिक्षा चालक आहे. आम्हाला मुलीला तिच्या आवडीनुसार शिक्षण देण्यासाठी काय करता येईल ?**

नवी मुंबईतील एक पालक

**मुख्यमंत्री –** आता आपण काही कोर्सेससाठी 'राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना' सुरू केली आहे. ज्यात ५० टक्के फी राज्य सरकार भरते. तसेच शैक्षणिक कर्जही आपण उपलब्ध करून देतो. शिवाय व्याजदरातील अर्थसाहाय्यामुळे व्याजदर दोन टक्के तर काही ठिकाणी शून्य टक्के असतो. शिवाय प्रवेश घेता ती संस्था किती गुणवत्तापूर्ण आहे, तो अभ्यासक्रम किती रोजगारक्षम आहे हे तपासून विविध योजनांचा अवलंब करून तुम्ही मुलीला शिकवू शकाल.

**औरंगाबादमधील राज्य शासन व मर्सीडिज बेन्ज यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या 'अॅडव्हान्स ऑटोमोटीव्ह रिपेअर अँड**

**शाळेत क्रीडाखेळांना जास्त प्राधान्य दिले जात नाही. यासाठी शासन काही उपाययोजना करणार आहे का आणि खेळातून रोजगार निर्मितीसाठी आपल्या काही योजना आहेत का ? विविध ४२ खेळांशिवाय इतर खेळांना अतिरिक्त गुण मिळत नाही. अशा काही खेळांचा यात समावेश होईल का ?**

अभिषेक जोंधळे



**मुख्यमंत्री –** खेळ अत्यंत महत्त्वाचे आहेत. सर्वांसाठी शिक्षण कायद्यानुसार सर्व शाळांना मैदान हे सक्तीचे करण्यात आले असून ते त्यांना ठेवावेच लागेल. काही मुले दहावी किंवा बारावीत खेळ सोडून देतात. मात्र त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी अतिरिक्त गुण देतो. बरीच मुले जिल्हा, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील खेळांमध्ये सहभागी होतात. त्यासाठी मोठी व्यवस्था उभी केली आहे.

गुण देताना कोणते खेळ राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळले जातात याचा विचार केला जातो. देशात दरवर्षी दोन नवीन खेळ तयार होतात. मात्र, ते राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील आहेत का, अशा खेळांसाठी गुण देऊनही प्रावीण्य आपण देऊ शकत नाही. त्यामुळे खेळांसाठी निकष ठेवावे लागतात. इतर खेळांच्या समावेशासाठी विचार केला जाईल.

**मेन्टेनन्स' या कोर्सचा मी विद्यार्थी आहे. या क्षेत्रात भविष्यात खूप संधी असतील. तर मग सीएसआर अंतर्गत अन्य काही कंपन्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागात असे कोर्सेस राबवू शकतो का ?**

कृणाल पाटील, औरंगाबाद

**मुख्यमंत्री –** निश्चित राबवू शकतो. शिवाय अनेक कंपन्या आता पुढे येत आहे. आम्ही कंपन्यांना सांगितले आहे की, तुम्हाला जे कौशल्य हवे ते तुम्ही स्वत: संस्थांमध्ये येऊन द्या. त्यामुळे कौशल्यपूर्ण मनुष्यबळ नसल्याची कमी पूर्ण होऊन उणीव जाणवणार नाही.

**एव्हिएशन क्षेत्रासाठी भविष्यात देशाचे, महाराष्ट्राचे काय धोरण आहे. तरूण एरोनॉटीकल इंजिनिअर्सना संधी उपलब्ध करून द्याल का ?**

शुभम चक्रे

**मुख्यमंत्री –** मार्केट मोठ्या प्रमाणावर विस्तारीत होत आहे. खूप संधी निर्माण होणार आहे. नागपूरमध्ये आपण एम.आर.ओ. हब मुंबईत उभारत आहे. जगभरातील कंपन्यांनी प्रॉडक्शनसाठी पुढील दहा वर्ष बुक केली आहे. आपल्या देशात आपण विमान तयार करू शकलो पाहिजे असे प्रयत्न आपण सुरू केले आहेत. ज्यातून किमान विभागीय विमानसेवा सुरू होतील. त्याला अनुसरून एअरक्राफ्ट तयार करता येतील असा प्रयत्न सुरू आहे. आपण परदेशातून संरक्षणासाठी विमाने आणायचो. आता आपण त्यांना सांगितले की, आमच्या येथे येऊन विमान बनवावे लागेल. किमान ३० ते ३५ पार्ट आमच्या येथे बनवावे लागतील. देशात या क्षेत्रात संधी तयार होणार आहेत.

**मी कथ्थक डान्सर असून परफॉर्मिंगमध्ये मला पीएचडी करायची आहे. मात्र, मास्टर अभ्यासक्रम वेगळीकडून व पीएचडी वेगळीकडून करावी लागते. सर्वत्र ते ॲप्लिकेबल होईल का?**

वैष्णवी पाठक, माटुंगा

**मुख्यमंत्री –** सर्वत्र ते लागू करण्यासाठी तेवढे प्राध्यापक, गाइड हवेत. परफॉर्मिंग आर्ट्सला आपल्याकडे तेवढा शैक्षणिक दर्जा नाही. तो मिळायला हवा, त्यासाठी प्रयत्न करू.

**संकलन : वर्षा फडके**
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

## मुख्यमंत्री म्हणतात

- शिक्षण क्षेत्रात महाराष्ट्र १८ वरून तिसऱ्या क्रमांकावर
- डिसेंबर २०१८ अखेर राज्यातील सर्व शाळा डिजिटल होणार.
- ग्रामीण भागातील ४४ हजार शाळा झाल्या डिजिटल
- ५० हजार शिक्षक झाले टेकसॅव्ही
- राजर्षी शाहू महाराज शैक्षणिक प्रतिपूर्ती योजनेचा विद्यार्थ्यांना लाभ
- नवीन विद्यापीठ कायद्यातील लवचीकतेमुळे आता विद्यापीठांना शैक्षणिक अभ्यासक्रमात बदल करणे सोपे



- आगामी काळात कलमापन चाचणी अधिक आधुनिक करण्यावर भर देणार, कलमापन चाचणीमुळे विद्यार्थ्यांना नेमके करिअर शोधण्यास मदत
- नवीन ॲप्रेंटिसशीप कायद्यामुळे महाराष्ट्रात ८ लाख तरुणांना कौशल्य प्रशिक्षित करण्याचे काम सुरू
- ॲप्रेंटिस कायद्यातील सुधारणामुळे आता विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकल ज्ञान मिळण्यास मदत होणार.

# घर घेणाऱ्या ग्राहकांच्या हितासाठी

**बांधकाम व्यावसायिकांच्या मनमानीला चाप लागावा व सर्वसामान्यांना रास्त दरात घरे मिळावी यासाठी राज्य सरकारने १ मे २०१७ पासून स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ अंतर्गत महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाची (महारेरा) स्थापना केली आहे. महारेरेरांतर्गत राज्यातील बांधकाम क्षेत्राचे नियमन होऊन ग्राहकांचे हित जोपासले जाईल.**


## 'महारेरा' अंतर्गत होणाऱ्या सुधारणा

- महाराष्ट्र दिनी १ मे २०१७ पासून स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ अंतर्गत महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाची (महारेरा) स्थापना करण्यात आली आहे.
- महारेरा हे महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्राचे नियमन करील. ग्राहकांचे हित व जलद विवाद निवारणासाठी स्वतंत्र यंत्रणा स्थापन केल्याने बांधकाम क्षेत्रात पारदर्शकता व कार्यक्षमता येईल.
- खुल्या बाजारात सदनिका विक्री करण्यापूर्वी प्रत्येक विकासकाला त्याचे प्रस्तावित आणि चालू असलेले दोन्ही प्रकल्प महारेरामध्ये नोंदणीकृत करणे आवश्यक राहील.
- नोंदणी करतेवेळी, विकासकाने बांधकाम प्रकल्पाबद्दल संपूर्ण माहिती जाहीर करणे आवश्यक आहे.
- बांधकाम प्रकल्पाबद्दलच्या जाहिरातींमध्ये महारेरा विशिष्ट नोंदणी क्रमांक नमूद असणे आवश्यक आहे. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या तपशिलांची पडताळणी https://maharera.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर केली जाऊ शकते.
- विकासकाकडून दिलेले सर्व तपशील महारेराच्या संकेतस्थळावर जनतेच्या माहितीकरिता उपलब्ध होतील.
- खरेदीदार विकासकाने दिलेल्या माहितीची सत्यता पडताळण्यासाठी महारेरा संकेतस्थळाला भेट देऊ शकतो. विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या सर्व सदनिकांची माहिती या संकेतस्थळावर असेल.
- इच्छुक खरेदीदार ठिकाण किंवा विकासकाचे नाव किंवा सदनिकांचा प्रकार इत्यादीनुसार महारेरा संकेतस्थळावर प्रकल्प शोधू शकतो.
- मंजूर प्रकल्प योजना, आराखडा, इमारत आराखडा, प्रारंभ प्रमाणपत्र, सदनिकेची वैशिष्ट्ये, सोयीसुविधा, विकासकार्याचा आराखडा, इत्यादी दस्तवेज आणि वाटपपत्राचे स्वरूप, विक्री करारपत्र आणि कन्व्हेयन्स डीड इत्यादी कागदपत्रे इच्छुक खरेदीदार तपासू शकतो.
- खरेदीदाराकडून वसूल केलेल्या रक्कमेपैकी ७० % रक्कम स्वतंत्र प्रकल्प खात्यात जमा करणे आवश्यक आहे. अभियंता, आर्किटेक्ट आणि लेखापाल यांनी प्रमाणित केल्यानंतरच ही रक्कम काढता येईल.
- बांधकाम विकासकाच्या स्वतंत्र प्रकल्प खात्याचे दरवर्षी लेखापरीक्षण (ऑडिट) केले जाईल. महारेरा संकेतस्थळावर त्याची प्रत प्रदर्शित करावी लागेल.
- न विकलेल्या सदनिकांची यादी आणि प्रलंबित मंजुरी यासारख्या तपशिलासह महारेरा संकेतस्थळ दर ३ महिन्यात अद्ययावत करणार.
- नमुना अर्जानुसार विक्री करारपत्र करावे लागेल. प्रकल्प वेळेवर पूर्ण ग्राहकाला सुपुर्द करण्यावर भर दिला जाईल.



- प्रस्तावित प्रकल्पाच्या आराखड्यात बदल झाल्यास विकासकाला खरेदीदारांची योग्य संमती घेणे आवश्यक असेल.
- विकासकाला गेल्या ५ वर्षातील प्रकल्पाची माहिती, सद्य:स्थिती आणि विलंबाची कारणे महारेरा संकेतस्थळावर द्यावी लागतील.
- विकासकाने चुकीची किंवा अयोग्य माहिती दिली असे जर खरेदीदाराला वाटले तर खरेदीदार त्वरेने निराकरण व नुकसान भरपाईसाठी महारेराशी संपर्क साधू शकतील.
- संरचनात्मक दोष, बांधकामातील दोष, गुणवत्ता, सेवा किंवा इतर जबाबदाऱ्या याकरिता विकासक पाच वर्षांकरिता उत्तरदायी राहील.
- प्रकल्पाच्या वितरणास विलंब झाल्यास या अधिनियमात खरेदीदाराला व्याज देण्याची तरतूद आहे.
- खरेदीदाराला कायदेशीर अस्तित्व मिळणे आणि ठरावीक वेळेत जमीन हस्तांतरण (कन्व्हेयन्स) करणे महारेरामुळे सोपे होईल.
- महारेराच्या तरतुदींचे पालन न केल्यास कठोर दंड आणि शिक्षेची तरतूद.

**संपर्क : महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण, तिसरा मजला, ए-विंग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१. दूरध्वनी क्र.: २६५९००२८/२६५९००२९/२६५९००३२/२६५९००३५/२६५९००३६**
**संकेतस्थळ :** https://maharera.mahaonline.gov.in



# एकच लक्ष्य, ४ कोटी वृक्ष

**१ जुलै २०१६...महाराष्ट्राच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटना. ज्याची नोंद लिम्का बूक ऑफ रेकॉर्डने घेतली. हा होता लोकसहभागातून साजरा झालेला महावृक्ष लागवडीचा लोकोत्सव. या एकाच दिवशी राज्यातील अबालवृद्धांनी सहभागी होऊन तब्बल २ कोटी ८२ लाख झाडे लावण्याचा विक्रम केला. यामुळे वन विभागाचे मनोधैर्य वाढले आहे. आता १ जुलै ते ७ जुलै २०१७ या वनमहोत्सवाच्या कालावधीत ४ कोटी झाडे लावण्याचा नवा विक्रम करायचा आहे. यामध्ये वन विभाग २.२५ कोटी, इतर शासकीय विभाग ७५ लाख आणि ग्रामपंचायती १ कोटी अशी ४ कोटी झाडे या सप्ताहात लावणार आहेत.**

गत वर्षीच्या वन विभागाच्या 'दोन कोटी वृक्षलागवड' या संकल्पाचे लोकचळवळीत रूपांतर झाले. शासकीय यंत्रणेला सामाजिक स्वयंसेवी संस्था, आध्यात्मिक संस्था, शेतकरी, शालेय- महाविद्यालयीन विद्यार्थी, सर्वसामान्य जनतेची साथ मिळाली आणि बघता बघता दोन कोटी ८२ लाख झाडे लावली गेली. राज्यातील वनाच्छादन वाढण्यासाठी सर्वांनी पुन्हा एकदा एकत्र येऊन झाडे लावणे आणि ती जगवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

आज राज्याचे वनक्षेत्र २० टक्क्यांच्या आसपास आहे. राज्याचे वनक्षेत्र ३३ टक्क्यांपर्यंत वाढवायचे असेल तर वृक्षलागवडीचा नियोजनबद्ध कार्यक्रम निश्चित करून काटेकोरपणे तो अमलात आणणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने वन विभागाने पुढील तीन वर्षाचा वृक्ष लागवडीचा कार्यक्रम पूर्णपणे नियोजित केला आहे. येत्या तीन वर्षात राज्यात ५० कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प आहे. २०१७ मध्ये ४ कोटी, २०१८ मध्ये १३ कोटी आणि २०१९ मध्ये ३३ कोटी झाडे लावायची आहेत. वनजमिनी, शेतीचे बांध, शाळा-महाविद्यालयाचा परिसर, रेल्वे, एस.टी महामंडळाच्या जागा, टेकड्या, संरक्षण मंत्रालयाच्या राज्यातील जागा अशा सर्व ठिकाणी मागच्या वर्षीप्रमाणे या वर्षीही झाडे लावायची आहेत.

## हरित सेना

राज्यातील रेल्वेच्या ताब्यात असलेल्या जमिनीवर वृक्षलागवड करण्यासाठी रेल्वे मंत्रालय आणि वन विभाग यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. मराठवाड्यात इको बटालियन नियुक्त करण्याच्या कार्यवाहीने गती घेतली आहे. http://www.greenarmy.mahaforest.gov.in या संकेतस्थळाच्या माध्यमातून हरित सेनेचे सदस्य होण्याची संधी सर्वांना उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## हेल्पलाइन

वन आणि वन्यजीवांसंबंधी कोणतीही गोष्ट विभागापर्यंत पोहोचवण्यासाठी, राज्यातील वनक्षेत्र, वन पर्यटनस्थळे यांची माहिती जाणून घेण्यासाठी, वणवा लागला, कुणी अवैध वृक्षतोड केली तर माहिती व तक्रारीसाठी १९२६ ही हेल्पलाइन वन विभागाने सुरू केली आहे. जागरूक नागरिक म्हणून या सर्व कामात आपले योगदान अपेक्षित आहे.

## वनयुक्त शिवार

मराठवाड्याचे वनक्षेत्र त्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या केवळ ४.५ टक्के आहे. लातूरसारख्या जिल्ह्याचे वनक्षेत्र केवळ ०.७६ टक्के आहे. बदलत्या जागतिक तापमानाने दुष्काळ, पूर, गारपीट यासारख्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. लातूरमध्ये गेल्या वर्षी जलराणीमार्फत (रेल्वे बोगी) पाणी पुरवठा करावा लागला. ही परिस्थिती बदलायची असेल तर राज्याचे वनक्षेत्र वाढवणे, जलयुक्त शिवारप्रमाणे वनयुक्त शिवाराची संकल्पना अधिक वेगवान करणे गरजेचे आहे.

वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी या कामी पुढाकार घेतला असून त्यांच्या नेतृत्वाखाली वन विभाग हरित महाराष्ट्राच्या दिशेने वाटचाल करत आहे.

जगण्यासाठी ऑक्सिजन कुणाला लागत नाही? सर्वांनाच लागतो मग ज्या झाडांच्या माध्यमातून आपल्याला जीवन मिळते, ती झाडे लावण्याचे काम एकट्या वन विभागाचे आहे का? याचं उत्तर नाही असेच आहे, याची सर्वांनाच जाणीव आहे म्हणूनच राज्यात शालेय विद्यार्थी ते ८० वर्षांच्या आजी वृक्ष लागवडीच्या कामात जोमाने सहभागी होत आहेत. गेल्या वर्षीच्या महावृक्ष लागवडीचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कौतुक केले. ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांनी वृक्ष लागवडीत सहभागी होण्याचे आवाहन केले.

## नियोजनबद्ध कार्यक्रम

कोणतही काम हे उत्तम आणि परिपूर्ण नियोजनातून यशस्वी होते. वन विभागाने या वर्षी लावायच्या ४ कोटी वृक्ष लागवडीचे उत्तम



नियोजन केले आहे. विभागाने यासाठी ३३ कलमी कार्यक्रम आखला आहे. याअंतर्गत रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावणे, टेकड्यांचे हरितीकरण, कालवे, शिवाराच्या बाजूने वृक्षलागवड, मनुष्यबळाची उपलब्धता, वृक्ष लागवडीच्या स्थळाची निश्चिती, खड्डे करणे, ऊंच वाढलेली दर्जेदार रोपे उपलब्ध करून देणे, या सगळ्याच कामांना आता वेग मिळाला आहे. गाव तिथे नर्सरी याप्रमाणे रोपवाटिका निर्मितीचा धडक कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

संगणकीय आज्ञावलीद्वारे रोपांना ठरावीक नंबर देऊन रोपांची प्रजाती, त्याची निर्मिती आणि विक्री याचा हिशेबदेखील ठेवला जात आहे. वृक्ष लागवडीसाठी राज्य, जिल्हा, तालुका आणि ग्रामस्तरीय समित्या स्थापन झाल्या आहेत. यातील स्वयंसेवकांची, समन्वय अधिकाऱ्यांची निश्चिती झाली आहे. प्रत्येक स्तरावरील निणर्यांची माहिती तत्काळ मिळण्यासाठी अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (माहिती तंत्रज्ञान) यांच्या नियंत्रणाखाली संगणकीय आज्ञावलीद्वारे रियल टाइम रिपोर्टिंगची प्रत्यक्ष कार्यान्वयनाची व्यवस्था करण्यात आली आहे. वृक्ष लागवडीचे प्रत्येक नियोजन आणि आतापर्यंत केलेले काम वन विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे.

कोणतेही काम हे मनापासून केले, समर्पित होऊन केले तर त्याला यश मिळतेच. गेल्या वर्षी 'एकच लक्ष्य दोन कोटी वृक्ष' ही संकल्पना घेऊन हे अभियान राबवले गेले. प्रचंड लोकसहभागातून ते यशस्वी झाले. या वर्षी 'एकच लक्ष्य चार कोटी वृक्ष', ही संकल्पना घेऊन वनविभाग काम करत आहे. पावसाळ्याच्या तोंडावर वृक्ष लागवडीच्या सर्व कामांनी गती घेतली आहे. आता गरज आहे १ ते ७ जुलै या सात दिवसांच्या कालावधीसाठी सज्ज होण्याची... कारण सर्वांनी मिळून ४ कोटी झाडे लावायची आणि जगवायची आहेत...

चला तर मग पुन्हा एकदा वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमात सहभागी होऊ, आपला महाराष्ट्र हिरवागार करू

**डॉ. सुरेखा म. मुळे**
विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

### वृक्ष लागवडीचा लोकजागर

**वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी वृक्ष लागवडीचा लोकजागर व्हावा, ही अपेक्षा व्यक्त केली आहे. अनेक सामाजिक, आध्यात्मिक आणि शासकीय व्यासपीठांवरून त्यांनी यासंबंधी संवाद साधण्यास सुरुवात केली आहे. सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, यांच्याशी त्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधून कामाचा आढावा घेतला आहे. यासाठी खास रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, भाईंदर येथे सर्व वनाधिकाऱ्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १ मे महाराष्ट्र दिनी सर्व**




**ग्रामपंचायतींनी वृक्ष लागवडीची विशेष ग्रामसभा घेऊन लोकांना प्रेरित केले आहे. राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीच्या सरपंचाना वनमंत्र्यांनी पत्र पाठवून, गावात होणाऱ्या वृक्ष लागवडीचे नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. तसेच या सर्व कामासाठी शुभेच्छाही दिल्या. सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी त्यांनी पत्राच्या माध्यमातून संवाद साधला. गावात, जिल्ह्यात होणाऱ्या वृक्ष लागवडीचा कार्यक्रम यशस्वी करावा, वृक्ष लागवड लोकचळवळ होताना, लावलेली रोपे जगण्याचे प्रमाण वाढावे यासाठी काळजी घ्यावी, असेदेखील त्यांनी पत्रात नमूद केले आहे.**



'ट्रान्सफॉर्म महाराष्ट्र' या कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध भागातून आलेल्या तरुणाईशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

# महाराष्ट्र बदलतोय...

**राज्यात ५८ वा महाराष्ट्र दिन १ मे रोजी उत्साहात साजरा झाला, यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याच दिवसाचे औचित्य साधून राज्याच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक विकासात योगदान देणाऱ्या युवा पिढीशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट संवाद साधला आणि राज्याच्या विकासाबाबतच्या युवकांच्या कल्पना त्यांनी जाणून घेतल्या. निमित्त होते 'ट्रान्सफॉर्म महाराष्ट्र' या कार्यक्रमाचे...**

राज्याच्या विकासात आणि विविध क्षेत्रांमध्ये नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यासाठी तरुणांच्या संकल्पनांचा निश्चितच उपयोग करून घेता येईल, या उद्देशाने गेल्या डिसेंबरमध्ये 'ट्रान्सफॉर्म महाराष्ट्र' नावाची राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून महाराष्ट्रातील सामाजिक-आर्थिक क्षेत्रातील बदल घडवण्यासाठी युवकांनी आपल्या संकल्पना/उपाय सादर कराव्यात असे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार राज्यभरातील जवळपास ६ लाख विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला. याच उपक्रमात युवकांनी सुचवलेल्या संकल्पनांच्या सादरीकरणाबरोबरच मुख्यमंत्र्यांना या युवकांशी थेट संवाद साधता यावा, यासाठी १ मे रोजी 'ट्रान्सफॉर्म महाराष्ट्र' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

वरळीच्या एनएससीआय आवारात 'ट्रान्सफॉर्म महाराष्ट्र'अंतर्गत 'ॲक्शन फॉर कलेक्टिव्ह ट्रान्फॉर्मेशन' या कार्यक्रमात सुमारे आठ हजारांहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी 'व्हिजन महाराष्ट्र २०२५' या विषयावर संवाद साधला. मुख्यमंत्र्यांसह मेजर जनरल अनूज माथूर, चित्रपट अभिनेता अक्षयकुमार, उद्योगपती रतन टाटा यांनीही युवकांशी संवाद साधून त्यांना प्रोत्साहित केले.

## युवायुवतींच्या संकल्पनांच्या पंखांना बळ

महाराष्ट्र हे देशाचे ग्रोथ इंजिन असून राज्याने नेहमीच तरुणांना मार्ग दाखवण्याचे काम केले आहे. युवकांमधील शौर्य, ज्ञान, भक्ती व शक्तीच्या जोरावर नवमहाराष्ट्र घडवताना महाराष्ट्रातील युवा-युवतींच्या संकल्पनांच्या पंखांना बळ देऊन, त्या विकासात परावर्तित करण्याचे काम राज्य शासन करेल; अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कार्यक्रमादरम्यान दिली. 'ट्रान्सफॉर्म महाराष्ट्र' कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र टीम तयार करण्यात येणार असून, हा कार्यक्रम जोपर्यंत महाराष्ट्राचा संपूर्णपणे विकास होत नाही तोपर्यंत सुरूच राहील, असेही मुख्यमंत्र्यांनी या वेळी स्पष्ट केले.

## ११ उत्कृष्ट संकल्पनांचे सादरीकरण

या कार्यक्रमात राज्यातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एकूण अकरा विषयावर सादरीकरण केले. ट्रान्सफॉर्म महाराष्ट्रची सुरुवात करताना एक स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये विविध

महाविद्यालयांच्या अकरा संघांची अंतिम फेरीत निवड झाली होती. या अकरा संघांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व इतर मान्यवरांच्या समोर आपल्या उपाययोजनांचे सादरीकरण केले.

या स्पर्धेतील विजेत्यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या स्पर्धेच्या परीक्षकांमध्ये नॅस्कॉमचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत सिन्हा, इंडिया कॉन्टिनेंटलचे सहसंस्थापक आनंद लुनिया, प्रथमचे सहसंस्थापक फरिदा लांबे, स्वच्छच्या सहसंस्थापक मालती गाडगीळ आदींचा समावेश होता. या स्पर्धेसाठी राज्यातील सव्वा लाख विद्यार्थ्यांमधून २३०० प्रवेशिका प्राप्त झाल्या होत्या. यामध्ये 'दुष्काळमुक्त महाराष्ट्र', 'स्मार्ट व सुसज्ज शहरांचे निर्माण', 'ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा' आदी विषयांवर सर्वाधिक प्रवेशिका आल्या होत्या.

## अकरा विषयांचे सादरीकरण

■ नागरी गरिबी हटवणे ■ दुष्काळमुक्त महाराष्ट्र ■ डिजिटल जाळे निर्माण करणे ■ नवउद्योजकांसाठी पोषक महाराष्ट्र घडवणे ■ स्मार्ट आणि सुसज्ज शहरांचे निर्माण ■ लहान आणि मोठ्या शहरांची जोडणी ■ स्वच्छ महाराष्ट्र ■ भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र ■ लोकाभिमुख सरकार ■ तंत्रज्ञानाद्वारे सक्षम न्यायप्रक्रिया उभारणे ■ ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा

## इनोव्हेशन प्रदर्शनातील वैशिष्ट्ये

या प्रदर्शनातील सर्वात आकर्षक ठरले ते कॅप्टन अमोल यादव यांनी मेक इन इंडिया अंतर्गत बनवलेले विमान. भारतात निर्मिती केलेले हे मॉडेल सध्या प्राथमिक पातळीवर असून त्याच्या उत्पादनासाठी राज्य शासन मदत करणार आहे. लवकरच पालघर येथे या विमानाची निर्मिती होणार आहे. या विमानाच्या ठिकाणी उभे राहून सेल्फी काढण्याचा व या विमानाच्या निर्मितीची माहिती घेण्यात तरूणाईने गर्दी केल्याचे दिसून येत होते. अलामुरी रत्नमाला इन्स्टिट्यूट इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांनी हायड्रोजन सिस्टमचा उपयोग करून दुचाकी तयार केली होती. त्यात रिव्हर्स गेयर बॉक्स, सायलेन्सर हिट एनर्जी, सोलर पॅनल बसवण्यात आले होते.

प्रवीण पाटील कॉलेज, भायंदर यांनी इलेक्ट्रो मॅग्नेटिक पॉवर सिस्टिमचा उपयोग करून रस्त्यावर चालताना वाहन चार्ज होऊ शकेल, अशी यंत्रणा तयार केली होती. तर सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, खारघर यांनी कॉम्पक्ट रिसायकलिंग मशीन, टाकाऊ कागदापासून उपयोगी कागद तयार करण्याचा प्रकल्पाचे सादरीकरण केले होते.

विलेपार्ले येथील डी.जे. संघवी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या एरो डिझाईन टीमने एरो मॉडेल तयार केले असून याला जागतिक पातळीवर नावाजण्यात आले आहे. त्यांनी या वर्षी १० पाऊंड वजनाचे आणि ५० पाऊंड वजन क्षमतेचे विमान तयार करण्याचा मानस व्यक्त केला आहे.

रूरल डेव्हलपमेंट अंतर्गत १० गावे दत्तक घेऊन गोवर्धन इको व्हिलेज प्रकल्प साकारला आहे. या गावातील महिला व पुरुषांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी नावीन्यपूर्ण संकल्पना युवकांकडून जाणून घेऊन, 'नव महाराष्ट्र' घडवण्यासाठी 'ट्रान्सफॉर्म महाराष्ट्र' हे एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे.

**– वर्षा फडके**
विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

### युवकांशी संवाद

- **माणसाच्या मनात काहीतरी करण्याची इच्छाशक्ती असली की, त्या माणसाला त्याचा मार्ग सापडतोच. कॅप्टन अमोल यादव यांनी स्वदेशी बनावटीचे व्यावसायिक एअरक्राफ्ट बनवून ते दाखवून दिले आहे.**
- **कॅप्टन अमोल यादव यांना यासाठी व्यावसायिक परवानगी मिळावी अशी विनंती मी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना केली असून; ही परवानगी मिळाली तर भारतातले एअरक्राफ्ट आकाशात उडताना दिसेल आणि याचे श्रेय नक्कीच अमोल यादव यांना असेल.**
- **'ट्रान्सफॉर्म महाराष्ट्र' च्या निमित्ताने बदलाची आवश्यकता आणि बदलासाठी युवाशक्तीचे महत्त्व सांगण्याचा प्रयत्न.**
- **या कार्यक्रमाच्या माध्यमातून सुमारे सहा लाख युवकांचा सहभाग.**
- **२,३०० हून अधिक सादरीकरण प्राप्त. त्यातील गौरवण्यात आलेली निवडक ११ सादरीकरणे नवा महाराष्ट्र घडवण्यात योगदान देतील.**
- **प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पाहिलेल्या नव्या भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी महाराष्ट्राकडून मोठ्या अपेक्षा आहेत.**
- **आज भारताची युवा देश म्हणून ओळख. ही सगळी ताकद मानवसंसाधनात परावर्तित झाली, तर भारत विकसित देश म्हणून ओळखला जाईल, पर्यायाने भारताची अर्थव्यवस्थाही विकसित होईल.**
- **तरुणाईकडे असलेली इच्छाशक्ती आणि तंत्रज्ञान यामुळे देशाच्या विकासात योगदान मिळणार.**
- **जलयुक्त शिवार अभियानामुळे राज्यातील ११ हजार गावे दुष्काळमुक्त झाले.**
- **युवकांसाठी 'ट्रान्सफॉर्म महाराष्ट्र', हे महत्त्वाचे व्यासपीठ.**
- **युवाशक्तीच्या कल्पनाशक्तीला वाव देण्याचा प्रयत्न. हीच युवाशक्ती घडवणार परिवर्तन.**
- **सादरीकरणांचा अभ्यास करून या संकल्पनांच्या अंमलबजावणीसाठी आराखडा तयार करणार.**




# गोजिरे माळेगाव

**संत तुकडोजी महाराजांनी वर्णन केल्याप्रमाणे आपले गाव 'गोजिरे' करण्याचा चांगला प्रयत्न नाशिक जिल्ह्यातील माळेगावच्या ग्रामस्थांनी केला आहे. सिन्नर तालुक्यातील या गावात प्रवेश करताक्षणी प्रसन्नता आणि स्वच्छता जाणवते. गावातील प्रत्येक निर्मितीमागे विकासाचा एक विचार आणि नागरिकांचा एकोपा आहे. म्हणूनच या गावाला महाराष्ट्रदिनी पालकमंत्री गिरीष महाजन यांच्या हस्ते 'स्मार्ट ग्राम' योजनेंतर्गत दहा लाखाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.**

**'हात फिरे तेथे लक्ष्मी शिरे । हे सूत्र ध्यानी ठेवोनि खरे।**
**आपुले ग्रामचि करावे गोजिरे। शहराहूनि।।'**

औद्योगिक वसाहतीस लागून असलेल्या माळेगाव या गावाने गेल्या सात वर्षात केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. माजी सरपंच तुकाराम सांगळे आणि तत्कालीन ग्रामविकास अधिकारी संजय गिरी यांचे मार्गदर्शन तसेच गावात बदल करण्याबात ग्रामस्थांमध्ये असलेल्या एकवाक्यतेमुळे गावाचे रूप वेगाने पालटले आहे. सरपंच अनिल आव्हाड, त्यांचे सहकारी आणि ग्रामविकास अधिकारी कैलास वाघचौरे यांनी या प्रयत्नांना पुढे नेत गावाचा खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकास घडवून आणला आहे.

## हिरवळयुक्त गाव

गावात प्रवेश करताच सिमेंट काँक्रिटच्या रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या दाट झाडांनी आपले स्वागत होते. सात हजार लोकसंख्येच्या या गावात लोकसंख्येपेक्षा जास्त पंधरा हजारावर वृक्ष आहेत. लावलेले प्रत्येक झाड जगविण्यासाठी ठिबक सिंचनाद्वारे पाणी देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

## पराकोटीची स्वच्छता

गावात सर्वत्र स्वच्छता आढळते. काँक्रिटचे रस्ते, कडेला असलेली झाडे, बसण्यासाठी लावलेले बाक, गावाच्या सौंदर्यात भर घालतात. कचरा उचलण्यासाठी घंटागाडीची व्यवस्था करण्यात आली असून कचरा नियमितपणे कचराडेपोत टाकला जातो. गाव प्लास्टिकमुक्त करण्यासाठी दुकानदारांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले आहे. गावाची निवड या वर्षीच्या जिल्हास्तरावरील संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान पुरस्कारासाठी करण्यात आली आहे. संपूर्ण गावात भूमिगत गटारांचे काम करण्यात येत आहे.

## शैक्षणिक सुविधा

गावातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी ग्रामपंचायतीने जिल्हा परिषदेच्या शाळेची प्रशस्त इमारत स्वनिधीतून बांधून दिली आहे. शाळेत ई-लर्निंग सॉफ्टवेअरद्वारे शिक्षण दिले जाते. ग्रामपंचायतीने पाच अंगणवाड्यादेखील बांधल्या आहेत. विधवा, अपंग, परित्यक्तांच्या मुलींना उच्च शिक्षणासाठी लॅपटॉप वितरण करण्यात आले आहे. शाळा आणि अंगणवाड्यांच्या ठिकाणी किशोरवयीन मुली व महिलांसाठी सॅनिटरी नॅपकीन स्वयंचलित यंत्राद्वारे उपलब्ध करून देण्याची व्यवस्था आहे.

## पायाभूत सुविधांचे जाळे

दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत गावात घरकूल, पेव्हर ब्लॉक आणि रस्त्यांच्या व्यवस्थेबरोबरच सार्वजनिक विहीर आणि कपडे धुण्यासाठी पाण्याची टाकी बांधण्यात आली आहे. गाव हागणदारीमुक्त असून गावात वैयक्तिक शौचालयाबरोबरच १२८ सार्वजनिक शौचालयांची



**'माळेगावचे नाव राज्यस्तरावर नेण्यासाठी ग्रामस्थ एकत्रित प्रयत्न करतात. विकासाची कोणतीही नवी संकल्पना गावात राबवण्यात सगळ्यांची साथ मिळते. त्यामुळे चांगले निर्णय घेऊन गावाचा विकास वेगाने होत आहे. गावातील विकासकामांचा प्रत्येक नागरिकाला अभिमान आहे.'**

**– तुकाराम सांगळे, माजी सरपंच**




निर्मिती करण्यात आली आहे. ग्रामपंचायतीने खरेदी केलेल्या व्हॅक्युम क्लिनर सक्शन मशीनचा वापर सेफ्टी टँक उपसण्यासाठी केला जातो. जलसंधारणाची कामे हाती घेताना लोकसहभागातून गावातील तळ्यातून दहा हजार क्युबीक मीटर गाळ काढण्यात आला आहे. ग्रामपंचायतीच्या कामकाजाची माहिती देण्यासाठी स्वतंत्र संकेतस्थळ विकसित करण्यात आले आहे. माळेगावने अनेक वैशिष्ट्यपूर्ण कामांमुळे ग्रामविकासात चांगली प्रगती घडवून आणली आहे.

**‘सर्वांगीण असावी ग्रामरचना। मनोरंजनासहित पुरवाव्यात भावना।**
**जेणेकरून ग्रामवासियांना। आठवण ना ये शहराचा।।’**

हे गावाने सिद्ध करून दाखवले आहे. माळेगाव खऱ्या अर्थाने ‘स्मार्ट’ झाले आहे.



## गाव पिते मिनरल वॉटर

नागरिकांना शुद्ध पाणी मिळावे यासाठी ग्रामपंचायत इमारतीत मिनरल वॉटर प्रकल्प उभारला आहे. येथे डिजिटल कार्डद्वारे ५ रुपयात २० लीटर पाणी उपलब्ध करून दिले जाते. प्रकल्पातील अशुद्ध पाण्याचा उपयोग झाडांसाठी केला जातो. पाण्याची बचत होण्याच्या दृष्टीने नळ कनेक्शन देताना जलमापक यंत्र बसविण्यात आले असून त्याचे संगणकीकृत देयक देण्यात येते. त्यासाठी जीआयएस मॅपिंग वॉटर बिल सॉफ्टवेअर उपयोगात आणले आहे. गावातील प्रत्येक कुटुंबास पाण्यासाठी २० लीटरचे जार आणि कचरा एकत्रित करण्यासाठी कचराकुंडीचे वितरण करण्यात आले आहे.

**– डॉ. किरण मोघे**
जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक

आपले गाव

## कायापालट दृष्टिक्षेपात

- ग्रामपंचायतीची सुसज्ज आणि सुंदर इमारत
- इमारतीत संगणकीकृत यंत्रणा
- इमारतीवर ३६० अंशात फिरणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याद्वारे गावातील घटनांवर लक्ष
- प्रवेशद्वाराजवळ विविध योजनांची माहिती देणारी एलईडी स्क्रीन
- दररोजचा जमाखर्च स्क्रिनवर प्रदर्शित
- इमारतीवर २ किलोवॅट सोलर ग्रीड टाय सिस्टीम. इमारतीसाठी याच यंत्रणेद्वारे वीजपुरवठा. वीज बिलात बचत.
- यंत्राद्वारे नागरिकांना कराची माहिती देण्याची सुविधा
- इमारतीवर वायफाय यंत्रणा, बायोमेट्रिक हजेरी
- गावाला पर्यावरण संतुलित समृद्ध ग्रामसह विविध पारितोषिके
- आयएसओ प्रमाणपत्राचे २०१८ पर्यंत नूतनीकरण
- दहा नागरिकांना बायोगॅस सयंत्राचे वाटप, ४६ ठिकाणी सौरदीप
- ग्रामपंचायत हद्दीत स्थानिकांच्या घरात जन्माला येणाऱ्या दुसऱ्या मुलीच्या नावे ग्रामपंचायत निधीतून १० हजार रुपये मुदतठेव ठेवण्याची योजना, आठ मुलींच्या मातांच्या नावाने मुदतठेव.
- शेतकऱ्यांसाठी हवामान केंद्र. मोबाइलद्वारे हवामानाची माहिती
- घरपट्टी आणि पाणीपट्टी वेळेवर भरणाऱ्यांसाठी मोफत पीठ गिरणीची व्यवस्था
- ग्रामपंचायतीमार्फत गावातील स्थानिक महिलांचा, ‘पंतप्रधान सुरक्षा विमा योजना’ व ‘पंतप्रधान जीवन ज्योती विमा’ योजनेंतर्गत मोफत विमा
- अभ्यासिकेची नुकतीच उभारणी
- अपंगांना व्यवसायासाठी गाळे आणि वयोवृद्धांना काठीचे वाटप



कर्मचाऱ्यांची वसाहत आणि ग्रीन जिमची उभारणी



शासकीय रुग्णालयात ताप, थंडी, कर्करोग, क्षयरोग, एड्स इ. आजारांनी त्रस्त रुग्ण उपचारासाठी जातात. योग्य व जलद उपचाराच्या दृष्टीने रुग्णालयात जाताना केसपेपर काढण्यापासून ते डॉक्टरांना स्वत:च्या आजाराविषयी सर्व माहिती नि:संकोचपणे सांगण्याची काळजी घ्यायला हवी.

# शासकीय रुग्णालय आणि आपण

शासकीय रुग्णालयात ज्या रुग्णांचे वार्षिक उत्पन्न रु.२०,०००/- पेक्षा कमी आहे अशा रुग्णांसाठी मोफत उपचाराची सुविधा असते. याकरिता रुग्णांनी रुग्णालयात जाताना उत्पन्न दर्शवणारे पिवळे रेशनकार्ड अथवा कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. २०,०००/- पेक्षा कमी असल्याचा तहसिलदारांकडून अथवा जिल्हाधिकारी कार्यालयातून प्राप्त झालेला उत्पन्नाचा दाखला घेऊन जावा लागतो. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची यादी क्रमांक दर्शवणारा सक्षम अधिकाऱ्याकडून प्राप्त झालेला दाखलाही; रुग्णाच्या शुल्कमाफी व सवलत मिळण्यास उपयुक्त ठरतो. या सुविधेचा लाभ कुटुंबातील पती, पत्नी, दोन मुले, आईवडील व अवलंबून असलेली विधवा बहीण यांना घेता येतो.

ज्येष्ठ नागरिक वय ६० वर्षे व त्यापुढील वय असलेल्या व्यक्ती यांनी त्यांच्यासाठी असलेल्या सुविधांचा लाभ घेण्यासाठी सेतूमधून प्राप्त झालेले अथवा जिल्हाधिकारी कार्यालयातून प्राप्त झालेले ज्येष्ठ नागरिक असल्याचे ओळखपत्र दाखवणे आवश्यक असते. काही जण बनावट ओळपत्र दाखवून सुविधांचा लाभ घेण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्याकडे पाहिल्यास ते ज्येष्ठ नागरिक नसल्याचे लक्षात येते. त्याचबरोबर अनेकजण अपंगत्वाचा बनावट दाखला दाखवून सुविधा मिळवण्याचा प्रत्यत्न करत असतात. अशा वेळी रुग्णांना या ओळखपत्राव्यतिरिक्त आणखी काही पुरावा सादर करण्यास सांगितले जाते. अशा वेळी रुग्णाने अथवा त्याच्या नातेवाईकांनी डॉक्टरांशी हुज्जत घालू नये. कार्ड असेल तर शुल्कमाफी करून अथवा शुल्क भरून शासनाच्या सर्वच रुग्णालयात आरोग्य सेवा मिळते. खासगी रुग्णालयात अधिक पैसे मोजून मिळणारी सेवा, शासकीय रुग्णालयात अत्यल्प दरात मिळते. खोटी ओळखपत्रे न दाखवता शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार रुग्णांनी शुल्क भरून सेवा घ्यायला हवी.

### हे लक्षात ठेवा

- यापूर्वी झालेला आजार व त्याच्या रक्त/लघवी/ क्ष-किरण इ. तपासण्या, उपचार याची माहिती सोबत आणणे आवश्यक आहे. या माहितीचा उपयोग डॉक्टरांना सद्य:स्थितीच्या उपचारासाठी होऊ शकतो.
- जर काही असाध्य आजार झाला असेल तर रुग्णाने तो लपवू नये. डॉक्टरांना त्याची माहिती द्यावी, त्यानुसार डॉक्टर रुग्णाची काळजी घेऊ शकतात.
- रोज घ्याव्या लागणाऱ्या गोळ्या, इंजेक्शन्स वा स्प्रे यांचीही माहिती डॉक्टरांना देणे आवश्यक आहे.
- पूर्वी घेतलेल्या एखाद्या औषधाची ॲलर्जी असेल तर तेही स्वत: सांगावे. मला डॉक्टरांनी विचारले नाही म्हणून मी सांगितले नाही असे होऊ नये.
- रुग्णांनी स्नान करून व स्वच्छ धुतलेले कपडे घालून रुग्णालयात जावे.
- विशेषत: दातासंबंधी उपचारासाठी जाताना महिला रुग्णांनी लिप्स्टिक लावू नये.
- दातांची तपासणी उपचार करण्यासाठी जाताना तोंडात पान/तंबाखू/ सुपारी/गुटखा खाऊन वा धूम्रपान करून जाऊ नये. दारू पिऊन वा इतर नशेचे ड्रग्ज घेतलेल्यांनी रुग्णालयाच्या जवळपासही जाऊ नये.

आरोग्य

## संयम पाळा

शासकीय रुग्णालयात गर्दी असते. आत काम करणारा डॉक्टर व कर्मचारीवर्गही अपुरा असतो. अनेकदा रुग्ण वा त्याचे नातेवाईक काम लवकर करून घेण्यासाठी डॉक्टर व कर्मचाऱ्यांसोबत उद्धटपणे बोलतात. धमकावणे वा मारहाण केल्याच्या घटना काही रुग्णालयात घडतात. एखाद्या वरिष्ठ व्यक्तींचे नांव सांगून आपले काम सत्वर करण्यासाठी दबाव आणतात. मात्र यामुळे रुग्णसेवेवर परिणाम होतो. शासकीय रुग्णालयात उपचार घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांनी संयम पाळणे आवश्यक आहे. त्यांचे काम निश्चित होणार असते. शासकीय अधिकारी/डॉक्टर वर्ग व कर्मचारी यांनाही समजून घेणे व त्यांच्याशी सौजन्याने वागणे आवश्यक आहे.



## पुनर्तपासणी

एखाद्या शस्त्रक्रियेनंतर रुग्णांनी काही कालावधीनंतर पुनर्तपासणीसाठी यावे असे सांगितले जाते. पुनर्तपासणी म्हणजे पुन्हा एकदा करावे लागणारे ऑपरेशन नव्हे. तर फक्त तपासण्या व काही चाचण्या असतात. झालेले ऑपरेशन योग्य रीतीने झाले आहे की नाही याची खात्री करून घेण्यासाठी रुग्णाला पुनर्तपासणीसाठी बोलावले जाते. मात्र अनेकजण बरे वाटले की, डॉक्टरांनी दिलेल्या सूचनांचे पालन करत नाही. पुनर्तपासणीसाठी रुग्णालयात फिरकत नाहीत. मात्र शस्त्रक्रियेनंतर आपण पूर्ण बरे झालो आहोत, याची खात्री करून घेण्यासाठी तरी डॉक्टरांकडे एकदा जायलाच हवे.

## यांनाही मिळतो विनाशुल्क उपचार

■ शासकीय कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबून असणारे कुटुंबीय. ■ मानसेवी वैद्यकीय अधिकारी व शासकीय रुग्णालयातील परिचर्या कर्मचारी वर्ग. ■ वैद्यकीय निमवैद्यकीय अधिकारी व शासकीय रुग्णालयातील परिचर्या कर्मचारी वर्ग. ■ न्यायाधीशांच्या आदेशान्वये स्थानबद्ध व्यक्ती. ■ स्वातंत्र्यसंग्राम सैनिक व त्यांचे कुटूंब. ■ न्यायवैद्यक प्रकरणातील औषधोपचारासाठी पाठवलेल्या व्यक्ती व न्याय चौकशी अधीन कैदी. ■ पोलिसांतर्फे येणाऱ्या मेडिकोलीगल केसेस. ■ सुधारगृहातील रुग्ण. ■ महिला सुधारगृहातर्फे येणारे रुग्ण. ■ कुष्ठरोग मंडळांकडून येणारे रुग्ण. ■ नागरी विभागातील बेवारशी मुले. ■ आश्रमशाळेतील रुग्ण. ■ आमदार व खासदार, मंत्री, सभापती व माजी आमदार. ■ न्यायाधीश.

राज्य शासकीय कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय (यांचा/ची पती व पत्नी, मुले, आईवडील तसेच विधवा बहीण) यांचा समावेश होतो. तर शासकीय कर्मचाऱ्याचा मुलगा अथवा मुलगी यांचे लग्न झाल्यानंतर त्यांचे कुटुंब वेगळे होत असल्याने ते नि:शुल्क शासकीय उपचारासाठी पात्र ठरत नाहीत. केंद्र शासनाच्या कर्मचाऱ्यांना, सेंट्रल गव्हर्नमेंट हेल्थ स्कीम अंतर्गत मोफत उपचार उपलब्ध असलेल्या रुग्णालयात नि:शुल्क उपचार घेता येतात.

**– डॉ. सोनाली कदम**
सहयोगी प्राध्यापक, शासकीय दंतमहाविद्यालय व रुग्णालय, मुंबई

## शासकीय रुग्णालयांमध्ये मिळणार लॅबोरेटरी सेवा

**राज्यातील विविध शासकीय रुग्णालयांत रक्त, लघवी आणि तत्सम वैद्यकीय नमुन्यांच्या चाचण्या करून घेण्यासाठी सहजसुलभपणे वैद्यकीय प्रयोगशाळा (लॅबोरेटरी) सेवा उपलब्ध होणार आहे. यासाठी केंद्र सरकारचा उपक्रम असलेल्या मेसर्स एचएलएल लाइफकेअर लिमिटेड या कंपनीसमवेत महाराष्ट्र राज्य आरोग्य संस्थेने करार केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाने हा उपक्रम कार्यान्वित करण्यात आला आहे.**

**या करारानुसार मेसर्स एचएलएल लाईफ केअर ही कंपनी राज्यात विविध ठिकाणी प्रयोगशाळा स्थापन करणार आहे. या प्रयोगशाळेत संलग्न शासकीय रुग्णालये व संस्थांमधून नमुने संकलन करून या प्रयोगशाळेत आवश्यक वैद्यकीय चाचण्या करण्यात येतील. या चाचण्यांसाठी आकारले जाणारे शुल्क शासनाकडून दिले जाईल. त्यामुळे रुग्णांना ही सेवा विनामूल्य मिळणार आहे.**

**संकलित केलेल्या नमुन्यांचे अहवाल संबंधित आरोग्य संस्थाच्या ई–मेलवर तसेच डॅश बोर्डवर विहित कालावधीत उपलब्ध करून देण्यात येतील. आतापर्यंत पुणे, ठाणे, नंदुरबार, जालना, बीड, रायगड, नागपूर, औरंगाबाद, वर्धा, रत्नागिरी, धुळे, गोंदिया, जळगाव, नाशिक, पालघर, सिंधुदुर्ग या १६ जिल्ह्यांमधील काही आरोग्य संस्थांमध्ये काही प्रमाणात ही सेवा उपलब्ध झाली आहे. टप्प्याटप्प्याने राज्यातील इतर आरोग्य संस्थांमध्ये त्याचा विस्तार होणार आहे.**

# तयारी स्पर्धा परीक्षेची

**विविध अभ्यासक्रमांचे प्रवेश आणि वेगवेगळ्या शासकीय सेवांच्या निवडीसाठी चाळणी परीक्षा घेतली जाते. या परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे या परीक्षांची काठिण्य पातळी अधिक वाढवण्यात आली आहे. या स्पर्धा परीक्षांची तयारी दहावी, बारावीपासून केली तर लवकर यश मिळवणे शक्य होते.**



स्पर्धा परीक्षेत यश मिळवण्यासाठी अनेकांना चार ते पाच वेळा प्रयत्न करावे लागतात. पहिल्या किंवा दुसऱ्या प्रयत्नात यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या नगण्य आहे.

बरेच विद्यार्थी बारावीनंतर चार-पाच वर्षांचे अभ्यासक्रम पूर्ण करून स्पर्धा परीक्षांकडे वळतात. त्यामुळे त्यांची तयारी उशिरा सुरू होते व पुढे परत चार-पाच वर्षे अभ्यासात गेल्याने ते लवकर यश संपादन करू शकत नाहीत. बी.ए.बी.कॉम, बी.एस्सी. यांसारख्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी समजा दहावी, बारावीपासून स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासक्रमास सुरुवात केली तर पदवी होईपर्यंत विद्यार्थ्यांचा जवळपास ५० टक्के स्पर्धा परीक्षेचा अभ्यास पूर्ण झालेला असेल व असे विद्यार्थी पहिल्या किंवा दुसऱ्या प्रयत्नात उत्तीर्ण होतात. जे विद्यार्थी कमी वयात अधिकारी होतील ते सहजपणे सर्वोच्च पदापर्यंत पोहोचू शकतात.



स्पर्धा परीक्षा

### मनात किंतू नको

अनेक विद्यार्थ्यांना असा प्रश्न पडतो की, आपले पदवीचे शिक्षण पूर्ण झाल्यावर आपण स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू ठेवली आणि त्यात जर अपयश आले तर आपल्या भविष्याचे काय? आपणास पुढे नोकरी मिळेल का? आपण पदवी अभ्यासक्रमापासून बरेच दिवस दूर असल्याने आपल्या शिक्षणाचा नोकरीमध्ये कितपत फायदा होऊ शकेल. असे अनेक प्रश्न त्यांना सतावत असतात. पण जो विद्यार्थी सातत्याने कष्ट घेतो तो निश्चित कोणत्या तरी परीक्षेत यश मिळवतो. अनेक जण पदवी शिक्षणानंतर खासगी नोकरी पत्करतात. त्यानंतर दोन-तीन वर्षांनंतर स्पर्धा परीक्षेकडे वळतात. त्यामुळे त्यांची द्विधा मन:स्थिती होते परिणामी त्यांना मनाजोगते यश मिळत नाही. काही विद्यार्थ्यांना खासगी नोकरी केल्यानंतर आपल्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वात बदल होतो असे वाटते. ते अगदी खरे आहे. नोकरीच्या अनुभवातून आपले आचारविचार समृद्ध होतात. वाचन, लेखन, बैठका, नियोजन यामुळे आपल्या ज्ञानामध्ये भर पडते. याचा मुलाखतीसाठी उपयोग होऊ शकतो. परंतु नोकरीमध्ये गेलेला वेळ भरून निघत नाही. परिणामी आपली उशिराने निवड होऊ शकते.

### १० वी-१२ वीनंतर शाखा निवडताना...

बऱ्याचदा आपल्या पाल्यांना पुढे स्पर्धा परीक्षेसाठी पाठवायचे असल्याने दहावीनंतर कलाशाखा की विज्ञान शाखा निवडावे असा प्रश्न पडतो. खरे तर विद्यार्थ्यांनी दहावीनंतर विज्ञान शाखेकडे वळावे. यामुळे इंग्रजी सुधारते, त्याचप्रमाणे अधिक अभ्यास करण्याची सवय लागते. बारावीनंतर मात्र ज्यांना भविष्यात स्पर्धा परीक्षा देऊनच करिअर करायचे आहे त्यांनी वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी शाखेत शक्यतो वेळ खर्ची घालवू नये. त्यांनी बी.ए., बी.कॉम किंवा बी.एस्सीला प्रवेश घ्यावा. जर आपण दहावी, बारावीपासून स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली तर निश्चितपणे कोणती ना कोणती वर्ग-१ अथवा वर्ग-२ पदाची नोकरी हमखास मिळू शकते.

### नेमकी तयारी कशी करावी

दहावी, बारावीपासून स्पर्धा परीक्षेची नेमकी तयारी कशी करावी असा प्रश्न विद्यार्थी व त्यांच्या पालकांना नेहमीच पडतो. जे विद्यार्थी दहावी, बारावीला आहेत. त्यांनी उन्हाळ्याच्या सुटीत जर एम.पी.एस.सी. किंवा यू.पी.एस.सी.साठी घेण्यात येणाऱ्या फाऊंडेशन कोर्सला प्रवेश घेतला तर त्यांना योग्य दिशा मिळू शकेल. यानंतर विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेत जे उमेदवार यशस्वी झाले आहेत. त्यांच्याशी संपर्क करून त्यांच्याकडून मार्गदर्शन घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर यशस्वी उमेदवारांची मार्गदर्शनपर व्याख्याने ऐकावीत. त्यांची विविध मासिके,

वर्तमानपत्रे, अनियतकालिके यामधून प्रकाशित झालेल्या मुलाखती वाचाव्यात. यू.पी.एस.सी. परीक्षेसाठी ही परीक्षा नेमकी काय असते, यावर 'आयएएस प्लॅनर' व एमपीएससीसाठी 'एमपीएससी प्लॅनर' ही दोन पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत. ती वाचून काढावी. यामुळे या परीक्षासंदर्भातील आपल्या सर्व शंका दूर होतील.

स्पर्धा परीक्षेमध्ये सामान्य अध्ययन (जनरल नॉलेज) या विषयावर अधिकाधिक प्रश्न पूर्वपरीक्षेपासून मुख्य परीक्षा व मुलाखतीपर्यंत विचारले जातात. त्यामुळे सामान्य अध्ययन या घटकासाठी पाचवी ते बारावीपर्यंतची सर्व पुस्तके काळजीपूर्वक वाचली पाहिजेत. विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्रांचे बारकाईने वाचन केले पाहिजे. विशेषत: इंग्रजी वर्तमानपत्रे वाचण्याचा सराव केला पाहिजे. वर्तमानपत्रातील क्रीडा घडामोडींशी संबंधित पान वाचून त्याच्या नोंदी कराव्यात. लोकराज्य, योजना, यशदा-यशमंथन, कुरुक्षेत्र ही मासिके नित्यनियमाने वाचायला हवीत. वर्तमानपत्रे ही सामान्य अध्ययनासाठी त्याचबरोबर निबंधासाठी व मुख्य परीक्षेच्या वैकल्पिक विषयांसाठी फार महत्त्वाची भूमिका बजावतात. साधारणत: वर्तमानपत्राचा या परीक्षांसाठी २० ते २५ टक्के वाटा आहे म्हणून लहानपणापासून मुलांना वर्तमानपत्रे वाचण्याबाबत प्रवृत्त केले पाहिजे. दूरचित्रवाहिन्या व आकाशवाणीवरील मराठी व इंग्रजी बातम्याही दररोज ऐकायला हव्यात.

### कौशल्य विकसित करावे

इंटरनेटच्या माध्यमातून आपणास हवी ती माहिती व मार्गदर्शन उपलब्ध होऊ शकते. स्पर्धा परिक्षेच्या संदर्भात अनेक संकेतस्थळे व यू ट्यूबद्वारे खूप माहिती उपलब्ध आहे. वक्तृत्व व लेखन शैली सुधारावी. कुठल्याही परीक्षेसाठी लेखनशैली उत्तम असायला हवी. स्पर्धा परीक्षेसाठी काही पेपर्स हे वर्णनात्मक असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुंदर असायला हवे. ते विकसित करता येऊ शकते. लेखन, मनन, वाचन, चिंतन आणि मेहनत या पंचसूत्रीतून प्रभावी लेखन कौशल्य सुधारता येते. विद्यार्थ्यांनी दहावी, बारावीपासून मुलाखतीच्या अनुषंगाने तयारी करायला हवी. त्यासाठी त्यांनी आपले संवाद कौशल्य सुधारले पाहिजे.

लिखाणाची चांगली शैली विकसित करायला हवी. लेखनाचा उपयोग निबंध या विषयाच्या पेपरसाठी प्रामुख्याने होतो. कारण निबंध लेखन हे आपल्याला अधिक गुण मिळवून देण्यास मदत करते. लेखनाची तयारी करताना अनेक पुस्तकांचे, साहित्यांचे वाचन आवश्यक आहे. सरावाने आपले लेखन कौशल्य बालपणापासून विकसित करता येऊ शकते.

**- डॉ. बबन जोगदंड**
संशोधन अधिकारी (प्रकाशन), 'यशदा' संस्था

## पीकविमा योजनेमध्ये जालना देशात प्रथम



**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना जालना जिल्ह्याचे जिल्हाधिकारी शिवाजी जोंधळे.**

व्यापारीदृष्ट्या जालना शहराचे महत्त्व पूर्वीपासून आहे. मोसंबी उत्पादन, बियाणे आणि लोखंडाच्या सळ्यांचे उत्पादन करणारा जिल्हा म्हणून जालन्याची ओळख आहे. परंतु गेल्या काही वर्षात निसर्गाच्या लहरीपणामुळे तसेच अल्प पावसाच्या प्रमाणामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्याला अस्मानी संकटाचा सामना करावा लागत होता. मात्र प्रधानमंत्री पीक विमा योजनेने कृषिक्षेत्राला संजीवनी दिली. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री बबनराव लोणीकर, राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर, जिल्हाधिकारी शिवाजी जोंधळे यांनी केलेल्या परिश्रमामुळे जालना जिल्ह्याने प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये देशात अव्वल क्रमांक पटकावला आहे.

जिल्ह्यात २०१५-१६ या वर्षी खरिपात एकूण रु. २५ कोटी विमा हप्ता भरून पीक विमा घेतलेल्या जिल्ह्यातील जवळपास ९५ टक्के शेतकऱ्यांना रु. ४३१ कोटी ६४ लाख रुपये आणि रब्बी हंगामात एकूण २ कोटी विमा हप्ता भरून पीक विमा घेतलेल्या शेतकऱ्यांना ४४ कोटी २९ लाख कोटी रुपये इतकी नुकसानभरपाई प्रशासनाने मिळवून दिली. २०१६-१७ मध्ये जिल्हा प्रशासनाच्या प्रयत्नातून खरिपात ४ लाख ६९ हजार आणि रब्बीमध्ये १ लाख २७ हजार शेतकऱ्यांनी ३९ कोटी रुपयांचा विमा हप्ता भरून पीक विमा योजनेत भाग घेतला होता.

### उत्तम नागरी सेवा

भारत सरकारमार्फत केंद्र पुरस्कृत काही महत्त्वपूर्ण योजनांमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्ह्यांना प्रधानमंत्री उत्कृष्ट नागरी सेवा पुरस्कार दिला जातो. त्यात प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा समावेश आहे. या योजनेतून पुरस्कार मिळण्यासाठी देशातील सर्व जिल्ह्यांनी अर्ज केले होते. नागरी सेवा दिनानिमित्त नवी दिल्ली येथील विज्ञान भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात; प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या हस्ते जिल्हाधिकारी शिवाजी जोंधळे यांचा प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

**- एस.के. बावस्कर**
जिल्हा माहिती अधिकारी, जालना







औरंगाबाद येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील पक्षांसाठीचे जलतरण व पाणपोई.

# पक्ष्यांचे नंदनवन

**इच्छाशक्ती असेल तर आपल्या घरासोबतच कार्यालय परिसरात नंदनवन कसे फुलू शकते हे औरंगाबाद येथील शासकीय तंत्रनिकेतनमधील कर्मचारी रमेश राऊत यांनी दाखवून दिले आहे. स्वत:च्या जबाबदाऱ्या पार पाडत कार्यालयीन वेळेआधी सकाळी ६ ते ८ व सुट्टीचा पूर्ण दिवस पक्षी अन्नछत्रासाठी देऊन, त्यांनी शासकीय तंत्रनिकेतनमध्ये पक्षिविहार साकारले आहे. शहरात चुकूनही न दिसणाऱ्या पक्षांची येथे मांदियाळी असते.**

दुष्काळ आणि उन्हाच्या काहिलीत सर्वात जास्त आबाळ होते ती पक्षी आणि जनावरे यांची. ग्रामीण भागासोबतच शहरातही ही स्थिती काहीशी वेगळी नसते. त्यामुळे पक्ष्यांसाठी भांड्यात पाणी ठेवण्याचे आवाहन विविध संस्था व पक्षिमित्रांकडून केले जाते. औरंगाबाद येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये मात्र केवळ पाण्याची भांडी ठेवली गेली नाहीत तर त्यांच्यासाठी नंदनवन तयार केले गेले.

### पक्ष्यांसाठी पाणपोई

औरंगाबाद शासकीय तंत्रनिकेतनचा परिसर खूप मोठा आहे. वेगवेगळ्या प्रकारची झाडे आहेत. त्यामुळे पक्ष्यांचा वावर बऱ्यापैकी असतो. २०१० मध्ये उन्हाळ्यात पाण्याच्या अभावामुळे पक्षी झाडाखाली बेशुद्धावस्थेत पडलेले आढळल्यानंतर कर्मचारी रमेश राऊत यांनी त्यांना कर्मशाळेत नेऊन पाणी पाजले. दोन तासांनी त्या पक्ष्यांनी उडाण भरली. पाण्याच्या अभावामुळे अनेक पक्ष्यांचा मृत्यू ओढवत असल्याने अस्वस्थ झालेल्या श्री. राऊत यांनी त्यावर काहीतरी उपाय काढण्यासाठी पक्ष्यांसाठी पाणपोई सुरू केली. संस्थेत रिकाम्या पडलेल्या छोट्या प्लास्टिकच्या कॅन गोळा केल्या. त्यास मधोमध कापून पाणी भरले व दोरीने झाडाला लटकवले. काही झाडांना मातीचे छोटे चाळीस माठ बांधले. यामुळे परिसरातील पक्षांच्या मृत्यूचे प्रमाण कमी झाले.

### पक्ष्यांचा चिवचिवाट

परिसरात पक्ष्यांचा वावर वाढला. त्यांच्या विष्टेतून पडणाऱ्या बियांचे बीजारोपण होऊन वृक्षवल्ली फुलण्यास मदत झाली. संस्थेकडून काही औषधी गुण असलेली झाडे लावली गेली. ज्यामुळे मुलांना वेगवेगळ्या झाडांची ओळख होऊ लागली. पक्ष्यांच्या चिवचिवाटामुळे अभ्यासाचा ताण कमी झाल्यासारखा वाटत असल्याचे येथील विद्यार्थी सांगतात.

## पक्षी अन्नछत्रांची मालिका

संस्थेच्या परिसरात जागोजागी प्रत्येक झाडावर पक्ष्यांसाठी केलेल्या पाण्याच्या व्यवस्थेमुळे पक्ष्यांची संख्या वाढली. विद्यार्थी रिकाम्या वेळेत किंवा घरी जाताना माठात पाणी टाकून काळजी घेऊ लागले. लहान पिलाना व वृद्ध पक्ष्यांना खाद्यासाठी दूरवर उडून जाता येत नाही. त्यामुळे पक्ष्यांसाठी खानावळ उघडण्याची कल्पना श्री. राऊत यांच्या डोक्यात आली. त्यासाठी कर्मशाळेतील सहकारी व अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळाले.

संस्थेतील टाकाऊ वस्तूंपासून सुंदर पक्षी अन्नस्टॅण्ड बनवले गेले व त्यावर धान्य टाकण्यात आले. पक्ष्यांचा वावर वाढू लागला. प्राचार्यांना हा उपक्रम खूप आवडला. सहकारी व संस्था आपल्या पाठीशी असल्याने श्री. राऊत यांनी मग मागे फिरून पाहिलेच नाही. पक्ष्यांसाठी जे काही शक्य होईल ते त्यांनी करण्याचा प्रयत्न केला.

पहिल्या पक्षी अन्नछत्रावर पक्षांची गर्दी वाढायला लागली. दाण्यांसाठी पक्षी एकमेकांना मारू लागले. त्यामुळे या परिसरात दुसरे पक्षी अन्नछत्र उभे केले गेले. दरम्यान श्री. राऊत यांची शासकीय तंत्रनिकेतन येथून मे २०१६ रोजी, शासकीय तंत्रनिकेतन जिंतूर येथे बदली झाली. वडलांची प्रकृती ठीक नसल्याने विनंतीवरून तीन महिन्यांसाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद येथे प्रतिनियुक्ती मिळाली. याच काळात मध्यवर्ती कर्मचारी संघटनेच्या सहकार्याने दिवाळीत निराधारांना फराळ व ब्लँकेट वाटण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. या उपक्रमातील उरलेल्या पैशांतून त्यांनी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात तिसरा पक्षीविहार तयार केला.

शासकीय तंत्रनिकेतन औरंगाबाद येथून जिंतूर येथे बदली झाल्यानंतर डोंगराच्या पायथ्याशी असलेला संस्थेच्या परिसरातही प्राचार्य डॉ. हेमंत तासकर व कर्मशाळा सहकाऱ्यांच्या मदतीने पक्षी अन्नछत्र तयार केले. त्यानंतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या मदतीने वेगवेगळ्या ठिकाणी आणखी सात अन्नछत्रे बनवून पक्ष्यांसाठी धान्य व पाण्याची सोय केली.





## दिनक्रम

कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त सकाळी या अन्नछत्रावर पक्ष्यांसाठी धान्य टाकणे, माठात पाणी ठेवणे. परिसरात एखादा इजा झालेला पक्षी दिसल्यास त्याच्यावर औषधोपचार व देखाभाल करण्याचे काम श्री. राऊत करतात. सकाळी ६ ते ७.३०, सायंकाळी ६ ते ७ व सुटीचा पूर्ण दिवस खंड न पडू देता पक्षी अन्नछत्रासाठी मेहनत घेतात. सहकारी सुभाष काकडेही त्यांच्या सोबतीला असतात. परिसरात टाकाऊ वस्तूंपासून त्यांनी जाळीचे कुंपण केले, पाण्यासाठी हौद केला, हौदातील पाण्यावर मोटारीच्या साह्याने धबधबा तयार केला. तेच पाणी रिसायकल केले. पक्ष्यांना येथे डुबकी मारण्याची सोय उपलब्ध झाली. परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी पाणवठे तयार करण्यात आले. या कामी पत्नी संगीता, मुलगा व मुलीनेही त्यांना सुटीत खूप मदत केली. पक्षी अन्नछत्रासाठी श्री. राऊत वेळोवेळी आपल्या मानधनातून पदरमोड करतात.



**पक्षिसंवर्धनाचे काम करताना जगात कुठेही विकत न मिळणारा आनंद मिळतो. आपण पुढाकार घेतला तर एकमेकांबद्दल विश्वासाचे वातावरण तयार होते. परिसर फुलून दिसतो. आपणही समाजाचे काही देणे लागतो याची जाणीव ठेवली तर आपोआप आपल्या हातून विधायक कार्ये घडतात.**

**– रमेश राऊत**

## सहकार्याची वेल

श्री. राऊत यांच्या या स्तुत्य उपक्रमाला कार्यालयातील वरिष्ठांपासून कनिष्ठांपर्यंत सर्वांचीच साथ मिळाली आहे. शासकीय तंत्रनिकेतन व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील सर्व सहकाऱ्यांच्या सहकार्यामुळेच येथे नंदनवन फुलवता आल्याचे श्री. राऊत आवर्जून सांगतात.

**– संतोष देशमुख**















# पुस्तकांचं अनुपमेय गाव

**सह्याद्रीच्या डोंगररांगेत वसलेलं भिलार गाव. गेल्या अनेक दिवसांपासून स्ट्रॉबेरीचे गाव म्हणून याची ओळख आहे. येथे पिकणारी स्ट्रॉबेरी आणि स्ट्रॉबेरी महोत्सव पर्यटकांना खुणावतो. स्ट्रॉबेरीच्या उत्पादनामुळे या परिसरात लक्ष्मी नांदते. मात्र आता या गावात लक्ष्मीबरोबर सरस्वतीचा वास असणार आहे. देशातील पहिले 'पुस्तकांचं गाव' होण्याचा मान या गावाला मिळाला आहे.**

देशात थंड हवेसाठी प्रसिद्ध असणाऱ्या महाबळेश्वर-पाचगणी या हिलस्टेशनच्या जवळच सुमारे तीन हजार लोकवस्तीचे भिलार गाव वसले आहे. येथे पिकणाऱ्या स्ट्रॉबेरीच्या गोडीने इवल्याशा भिलारचं नाव जगाच्या नकाशावर उमटले आहे. त्यामुळे पाचगणी-महाबळेश्वरला येणाऱ्यांना भिलार हे गाव चांगलेच परिचयाचे झाले आहे. प्रत्येक वर्षी जानेवारी महिन्यात येथे भरणाऱ्या स्ट्रॉबेरी महोत्सवाने अनेकांना भुरळ घातली आहे.

स्ट्रॉबेरीच्या उत्पादनामुळे डोंगराळ भागातील हे गाव आर्थिकदृष्ट्या संपन्न झाले आहे. आर्थिक सुबत्तेच्या खुणाही गावात गेल्यानंतर सहज लक्ष वेधतात. या गावाला पर्यटनाची आणखी जोड देण्यासाठी पुस्तकांच्या गावाची संकल्पना पुढे आली. पुस्तकांचे गाव ही कल्पनाच भन्नाट आहे. ही कल्पनाही तितक्याच कल्पकतेने भिलारमध्ये साकारण्यात आली आहे. गावात प्रवेश करताच तेथील घरांच्या भिंतीवर चितारण्यात आलेली चित्रे येणाऱ्यांशी संवाद साधतात.

## लोकसहभाग

पुस्तकांचं गाव साकारण्यासाठी केवळ मोठी ग्रंथालये काढून चालणार नाही, तर त्यासाठी स्थानिक लोकांनाही या उपक्रमात जोडले पाहिजे. या संकल्पनेतूनच गावातील २५ घरांची निवड या

प्रासंगिक

उपक्रमासाठी करण्यात आली आहे. या २५ घरात विविध विषयांवरील जवळपास १५ हजार पुस्तकांचा खजिना ठेवण्यात आला आहे, यामध्ये कथा, कादंबरी, कविता, बालसाहित्य, स्त्री साहित्य, संतसाहित्य, चरित्र आदी विविध साहित्य प्रकारांचा समावेश आहे.

### चित्रांच्या संगतीनुसार साहित्य

परदेशी पर्यटनाच्या धर्तीवर ही संकल्पना तयार करण्यात आली आहे. या संकल्पनेनुसार या ठिकाणी भेट देण्यासाठी आलेले पर्यटक किंवा रसिक-वाचक निवडलेल्या घरांमध्ये जाऊन निवांत वाचन करू शकणार आहेत. या निवडलेल्या २५ घरांवर विविध प्रकारची चित्रे रेखाटण्यात आली आहेत. ही चित्रेही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. या चित्रांच्याही संगती लावण्यात आल्या आहेत, हे विशेष होय. चित्रांच्या संगतीनुसार त्या घरात साहित्य वाचकाला उपलब्ध होणार आहे. ज्या घरांच्या भिंतीवर निसर्गचित्रे काढण्यात आली आहेत, त्या घरात निसर्गचित्रण अथवा प्रवास वर्णनपर साहित्य ठेवण्यात आले आहे. ऐतिहासिक चित्रे रेखाटलेल्या घरात ऐतिहासिक साहित्य वाचनासाठी ठेवण्यात आले आहे. संतांची चित्रे काढलेल्या घरामध्ये संतवाङ्मय व आध्यात्मिक पुस्तकांची भेट वाचकांना होणार आहे. अशा प्रकारे केवळ चित्रांवरून पर्यटकाला त्या घरात कोणते साहित्य वाचनासाठी उपलब्ध आहे, याची माहिती होणार आहे.

### पर्यटनातून रोजगार निर्मिती

या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना निवास व भोजनाची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे या घरातील लोकांना पर्यटनाचा नवा रोजगार उपलब्ध होणार आहे. तर पर्यटकांना स्थानिक पद्धतीचे, घरगुती जेवण उपलब्ध होणार आहे. त्यामुळे एकाच वेळी पर्यटकांची नेत्र, जिव्हा आणि बौद्धिक भूक भागणार आहे.

**काय आहे पुस्तकांच्या गावात...**

- २५ घरात १५ हजार पुस्तकांचा खजिना.
- पर्यटकांच्या आवडीनुसार वाचनासाठी साहित्य उपलब्ध.
- चित्रांच्या संगतीनुसार पुस्तकांची मांडणी.
- गावात कथाकथन अन् कविता वाचनाचे आयोजन.
- पर्यटकांच्या भेटीला नामवंत लेखक-प्रकाशक.
- वाचन-संपादन-मुद्रितशोधनाची होणार कार्यशाळा.
- अंधांसाठी ब्रेल लिपीसह ई-बुकची उपलब्धता.
- पर्यटकांच्या साक्षीने नव्या कादंबऱ्यांचे प्रकाशन सोहळे.

**कसे आहे पुस्तकांचे गाव...**

- महाबळेश्वर-पाचगणीच्या जवळ सह्याद्रीच्या कुशीत.
- सुमारे २८०० लोकवस्तीचे गाव.
- स्ट्रॉबेरी आणि स्ट्रॉबेरी महोत्सवासाठी देशात प्रसिद्ध.
- पुण्यापासून ११० तर साताऱ्यापासून केवळ ५५ किलोमीटरवर.
- निसर्गाच्या सान्निध्यात साहित्याचा सहवास.

### बालसाहित्य महोत्सव

दिवाळी, नाताळ आणि मे महिन्याच्या उन्हाळी सुट्या लक्षात घेऊन येथे बालसाहित्य महोत्सवाचेही आयोजन केले जाणार आहे. याचबरोबर वाचन, लेखन, प्रकाशन आणि प्रशिक्षण कार्यशाळा,




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भिलार गावच्या सरपंच वंदना भिलारे यांना सन्मानपत्र देऊन, ग्रामपंचायतीचा गौरव केला. यावेळी मराठी भाषा विभाग मंत्री विनोद तावडे, ठाणे जिल्हा पालकमंत्री एकनाथ शिंदे, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री महादेव जानकर आणि जलसंपदा राज्यमंत्री विजय शिवतारे उपस्थित होते.

पुस्तक प्रकाशने, काव्यवाचन, अभिवाचन आणि साहित्यिक गप्पा असे विविध कार्यक्रमांचे आयोजन या गावात करण्यात येणार आहे.

### ई-पुस्तकांची सोय

केवळ एक सरकारी वाचनालय उभारण्यापेक्षा या प्रकल्पात स्थानिकांना जास्तीत जास्त सहभागी करण्यात आले आहे. पंचवीस घरात वेगवेगळ्या प्रकारची पुस्तके ठेवण्यात आली असून येणाऱ्या प्रत्येक पर्यटकाला त्याच्या आवडीप्रमाणं वाचन करता येणार आहे. जवळपास शंभर प्रकाशकांची पंधरा हजार मराठी पुस्तकं या गावात ठेवण्यात आली आहेत. तसेच वाचनाचा कंटाळा येणाऱ्या पर्यटकांसाठीही येथे ई-पुस्तकांची सोय करण्यात आली आहे. या ठिकाणी शंभर बोलकी पुस्तकं या ई-बुकच्या माध्यमातून पर्यटकांशी संवाद साधणार आहेत. पुस्तकांच्या गावात वर्षभर विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. अशा प्रकारे भिलार खऱ्या अर्थानं पर्यटकांना समृद्ध करणारे पुस्तकांचं गाव झाले आहे.

**- संग्राम इंगळे**
विभागीय माहिती कार्यालय, पुणे



**आर्थिक नुकसान करणारा आणि गरीब भोळ्याभाबड्या जनतेने मेहनतीने कमावलेले पैसे नकळत गायब करणारा सायबर गुन्ह्यांचा प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. यामुळे आर्थिक नुकसानीसोबतच मानसिक ताणतणावालाही सामोरे जावे लागते. त्यामुळे उपचारापेक्षा खबरदारी घेतलेलीच बरी...**

# सायबर गुन्ह्यांपासून बचाव

आर्थिक सायबर गुन्हा जेव्हा एखाद्या व्यक्तीबरोबर घडतो तेव्हा त्याची मानसिक आणि आर्थिक स्थितीवर त्याचा परिणाम होतो. सायबर गुन्ह्यांमुळे कुटुंब, नवदांम्पत्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होताना मी पाहिले आहे. अनेक तरुणांचे करिअरही उद्ध्वस्त झाले आहे. याचा परिणाम थेट मानसिकतेवर होत असल्यामुळे मानसिक आजार होण्याचे प्रकारही वाढल्याचे दिसून येते.

## सायबर गुन्ह्याला आमंत्रण

माझ्या असे लक्षात आले आहे की, कुठेतरी तुमच्या हलगर्जीपणामुळे किंवा ठरवून केलेल्या दुर्लक्षितपणामुळे सायबर गुन्हा आपल्यावर ओढवून घेतलेला असतो. उदा. पासवर्ड न बदलणे, पासवर्ड इतरांबरोबर शेअर करणे, तोच तोच पासवर्ड वापरणे, तो कुठेतरी लिहून ठेवणे अशा गोष्टींमुळे एकार्थी सायबर गुन्हे आपल्यासोबत घडण्यासाठी आपण स्वतःच गुन्हेगाराला आमंत्रण देत असतो. कार्यालयातही आपण आपल्या सेक्रेटरीकडे आपला सोशल मीडियाचा पासवर्ड, युजरनेम एकूण आपल्या व्हर्चुअल अस्तिवाच्या किल्ल्याच हाताळायला देतो. त्यासोबतच ऑनलाइन बँकिंग करत असाल तर भलत्या सलत्या इमेलमधील लिंकवर क्लिक करून आपल्या बँक खात्याची माहिती अनाहूतपणे सायबर गुन्हेगारांना पुरवणे ही आपलीच चूक असते. सायबर गुन्ह्यांपासून आपल्याला वाचवायचे असेल तर त्याबाबत तशी काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे.

## सोशल मीडिया वापरताना...

नेहमीच सायबर गुन्हा हा एका व्यक्तीच्या चुकीमुळे होतो असे नाही. बऱ्याचदा तो सिस्टमच्या चुकीमुळेही होतो. सायबर गुन्हे आपल्या बरोबर होण्यापासून टाळण्यासाठी लेखात पुढे दिलेल्या बाबींचा अवलंब करायला हवा. सगळीच मंडळी हल्ली फेसबूकवर दिसतात. फेसबूकवर आपण आपले संपूर्ण जीवन मांडलेले असते. परिवारात होणारे समारंभ, त्याची माहिती, फोटो, आपला प्रवास त्याच्या लोकेशनबद्दल माहिती टाकत असतो. तसेच आपण कुठली गाणी ऐकतो, कुठला चित्रपट पाहायला जातो त्याची माहिती, अगदी काही लोक तर आपले वजन, उंची आवड-निवड अशा प्रत्येक गोष्टी त्यावर नमूद करतात. सोशल मीडियावरील सायबर गुन्हे रोखण्यासाठी पुढील बाबींची काळजी घेणे गरजेचे ठरते...

- आपले, आपल्या कुटुंबातील व्यक्तींचे खासगी फोटो तसेच लहान मुलांचे फोटो शेअर करणे टाळावे.
- आपण जात असलेल्या अथवा भेट दिलेल्या जागांची तंतोतंत माहिती, फोटो पब्लिश करू नये. समजा एखादे वेळी तुम्ही तुमच्या प्रवासाची माहिती सोशल मीडियावर शेअर केली आणि तुमच्या एखाद्या मित्राच्या फ्रेंड लिस्टमध्ये असलेल्या एका व्यक्तीने त्या माहितीचा दुरुपयोग करून तुमच्या घरात चोरी अथवा घरातील महिला व्यक्तींशी अतिप्रसंग करायचा प्रयत्न केला तर? आणि ही केवळ शक्यता नाही तर अशा अनेक घटना घडल्या आहेत.
- फेसबुकवर आपण कुणाबरोबर मैत्री करावी, कोणाची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारावी. याचा एक स्वत:चा नियम करून घ्यावा. जर तुम्हाला एखाद्या परदेशातील व्यक्तीने फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली तर त्या व्यक्तीच्या प्रोफाईलमध्ये जाऊन त्यांची फ्रेंड लिस्ट तपासून त्यात इतर किती व कसे लोक आहेत हे पाहावे. जर फक्त तुम्हीच एक असाल तर समजून जावे की हा एक सापळा आहे. कधी असेही होते की परदेशी व्यक्तीच्या फ्रेंड लिस्टमध्ये सर्व भारतीय असतात, तेव्हा धोक्याचा इशारा समजून अशा बोगस परदेशी व्यक्तींच्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नये. कारण अशा व्यक्ती तुमच्यामार्फत दुसऱ्या लोकांनाही लुबाडू शकतात.
- फेसबूकवरून वर-वधू संशोधन करण्याचा प्रयत्न करू नका. माझ्याकडे अशी अनेक प्रकरणे आली आहेत. ज्यात फक्त त्यांचे

सायबर महागुरू

## ऑनलाइन बँकिंग व्यवहार करताना

सर्वात जास्त आर्थिक व्यवहार आणि गुन्हे ऑनलाइन बँकिंग क्षेत्रात होत असतात. या क्षेत्रातील गुन्हे टाळण्यासाठी पुढील काही गोष्टी लक्षात ठेवा.

- फिशिंग (phishing) हे सर्वज्ञात झाले आहे. कारण हल्ली सर्वचजण ऑनलाईन बँकिंग वापरतात. फिशिंग म्हणजे तुमच्या बँकेच्या संकेतस्थळासारखी दिसणारी दुसरी बँक अथवा तुमचीच बँक आहे अशी भासवणारी संकेतस्थळाची लिंक इमेलच्या माध्यमातून पाठवली जाते. त्या लिंकवर क्लिक केल्यावर तुमच्या बँक खात्याची माहिती मागितली जाते आणि पुढे आपल्या खात्यातील रक्कम लंपास केली जाते.
फिशिंगपासून बचाव करण्यासाठी तुमचा इंटरनेट ब्राउजर (गुगल क्रोम, सफारी, इंटरनेट एक्सप्लोरर इत्यादी) हा नेहमी 'इन कॉग्निटो' मोडमध्ये उघडा.




- तुमच्या ब्राउजरमध्ये जो बुकमार्क असतो त्यात तुमच्या बँकेचे संकेतस्थळ सेव्ह करून ठेवा. प्रत्येक वेळा हे संकेतस्थळ ओपन केल्यावर त्यावर https आणि त्याच्या डावीकडे कुलुपाचे हिरवे चिन्ह दिसत आहे का ते पाहावे. बँक कधीही तुमची वैयक्तिक माहिती मागत नाही आणि जर कधी मागितली तर ती देताना शंभर वेळा विचार करा. संशय आल्यास आपल्या बँकच्या शाखेत जाऊन चौकशी करा.
- मोबाइलद्वारा फोन बँकिंग करताना जोपर्यंत तुम्ही तंत्रज्ञानाबरोबर सुसंगत होत नाही, तुम्हाला आत्मविश्वास येत नाही, तोपर्यंत फोन बँकिंग टाळावे. तंत्रज्ञानाशी संबंधित विविध प्रकारच्या गुन्ह्यांची माहिती होत नाही, तोपर्यंत मोबाइलवर येणारे बँकांचे सर्व कॉल्स टाळावे. जो मोबाइल तुम्ही वापरता तो जर घरातील इतरही व्यक्ती वापरत असतील तर मोबाइल बँकिंगचे ॲप डाऊनलोड करू नका. एकूणच आपण टेक्नोसेव्ही नसाल तर मोबाइल बँकिंग पूर्णपणे टाळा.

रिलेशनशिप स्टेटस पाहून त्यांना टार्गेट केले गेलेले होते. तुमची मन:स्थिती काय आहे किंवा काय असू शकते याची कल्पना फक्त व्यक्तीच्या रिलेशनशीप स्टेटसवरून कळू शकते. फेसबुकवरून जे सायबर गुन्हे घडतात. त्यामध्ये समोरच्या व्यक्तीच्या कमकुवतपणाचा फायदा उठवून गुन्हा करणे हे त्यांचे तंत्र असते.

## मॅट्रिमोनी साइटसंबंधी घ्यावयाची खबरदारी

- तुम्ही कुठल्या मॅट्रिमोनीमध्ये नाव रजिस्टर केले असेल आणि तुमचा मोबाइल नंबर तुमच्या प्रोफाइलमध्ये असल्यास वधू किंवा वराची फ्रेंड रिक्वेस्ट तुमच्या व्हॉट्सॲपवर आली तर प्रत्यक्षात भेटल्या शिवाय त्यांची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नका.
- वधुवर सूचक संकेतस्थळावरून जर तुम्हाला कोणी भेटण्यासाठी बोलवत असेल तर कृपया एकटे जाऊ नका. तुमच्या सोबत मित्र-मैत्रीण किंवा आई वडील यांना बरोबर घेऊन जाणे हिताचे ठरेल. कारण कदाचित तुमच्या प्रोफाइलमधील माहिती वाचून सायबर गुन्हेगार तुम्हाला भेटायला बोलावू शकतात. तसेच शक्यतो पहिल्याच भेटीत आपले जीवन समोरच्या व्यक्तीसमोर उघडून ठेऊ नका.
- वधूवर सूचक संकेतस्थळावरून जर तुम्हाला एखादा वर किंवा वधू परदेशातून गिफ्ट पाठवत असेल तर त्या गिफ्टच्या मोहात पडू नका. माझ्याकडे कित्येक स्त्रियांची अशी प्रकरणे आहेत, ज्यात केवळ गिफ्टच्या मोहापायी त्यांनी लाखो रुपये गमावले. एका प्रकरणात तर त्या व्यक्तीने स्वत:चा फ्लॅट विकून गिफ्ट स्वीकारण्यासाठी कस्टम ड्युटी आणि बेकायदेशीर भानगडी करून ६० लाख रुपये देऊन फसला.
- वधुवर सूचक संकेतस्थळावर कुठलाही व्यवहार करायच्या आधी संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या लुबाडणुकीच्या केसेस वाचा आणि त्यातून बोध घेऊन, कुठलाही आर्थिक व्यवहार अनोळखी व्यक्तीबरोबर करू नका.

समाज जागृत नसल्यामुळे सायबर गुन्हे होत असतात. एकदा का समाजामध्ये सायबर गुन्ह्यांबाबत जागरूकता आली, तर सायबर सुरक्षित समाजाची रचना होऊ शकते. प्रत्येक घरात, कुटुंबात सायबर सुरक्षिततेबाबत माहिती जाणून घेण्याची इच्छा निर्माण झाली तर सायबर गुन्ह्यांपासून आपल्याला दूर राहता येईल. सायबर गुन्हे आपल्याबरोबर घडण्यापासून आपण संपूर्णपणे टाळू शकतो. आज तुम्हांला जे या लेखात वाचून कळले ते तुम्ही पाच जणांना तरी सांगा, हे केल्याने सायबर सुरक्षित माणसांची साखळी निर्माण होईल. ही साखळीच समाजाला सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी मदत करेल. घाबरू नका, परंतु सुरक्षित राहा.

– ॲड. प्रशांत माळी
सायबर सुरक्षा व सायबर कायदा तज्ज्ञ

# सातत्यपूर्ण अभ्यास

मानसिक आणि शारीरिक कणखरता, सातत्यपूर्ण अभ्यास या गुणवैशिष्ट्यांवर त्याने राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. त्याच्या या कामगिरीबद्दल अभिनंदन करण्यासाठी त्याची नुकतीच भेट घेतली. त्यावेळी त्याची अभ्यासाची पद्धत, छंद-आवडनिवड, मार्गदर्शक, आई-वडील यांच्याबद्दल जाणून घेता आले. तसेच त्याने त्याच्या यशाचे गमक अगदी नेमकेपणाने सांगितले.

## यशाचा पाठलाग

स्पर्धा परीक्षेत अनेकांना एकदोन गुणांनी यश हुलकावणी देऊन जाते. भूषणचेही तेच झाले. मात्र हुकलेल्या संधीमुळे नाउमेद न होता त्याने पुन्हा अभ्यासाकडे लक्ष दिले. २०१४ मध्ये पोलीस उपअधीक्षक पदासाठी पुन्हा एका गुणाने यशाने हुलकावणी दिली. अपयश स्वीकारून पुन्हा तो अभ्यासाला लागला. अखंड परिश्रम आणि अभ्यासातील सातत्याने २०१६ मध्ये झालेल्या परीक्षेत त्याने हे अपयश पुसून टाकले. २०१७ मध्ये आलेल्या निकालात त्याने यशाला गवसणी घातली. एमपीएससी परीक्षेत अव्वल येण्याचा मान पटकावला.

## आईवडिलांचे 'भूषण'

भूषणचे आईवडील दोघेही शिक्षक. त्याचे पहिली ते दहावीपर्यंतचे संपूर्ण शिक्षण मराठी माध्यमातून झालेय. ११ वी व १२ वी विज्ञान शाखेतून त्याने केटीएचएम महाविद्यालयातून पूर्ण केले. त्यानंतर अभियांत्रिकी शाखेत एमईटी महाविद्यालयातून माहिती तंत्रज्ञान विषयासह पदवी प्राप्त केली. मूळचा नाशिक जिल्ह्यातील सटाणा तालुक्यातील गोराणे येथील हे अहिरे कुटुंब. आईवडलांच्या नोकरीनिमित्ताने ते नाशिक येथे आले. वडील अशोक अहिरे हे भगूर येथील नूतन विद्यामंदिर येथे तर आई सुनीता



**भूषण अहिरे**
(एमपीएससी २०१६ प्रथम क्रमांक)

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत यश मिळवणे हे स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या प्रत्येक तरुणाचे स्वप्न! असेच स्वप्न नाशिकच्या भूषण अहिरे या तरुणाने पाहिले. तो केवळ स्वप्न पाहून थांबला नाही. त्यासाठी आवश्यक सातत्यपूर्ण मेहनत त्याने घेतली. त्याचे फळ त्याला मिळाले. भूषणने राज्य सेवा परीक्षेत सर्वप्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केला.**

जिल्हा परिषदेच्या शेवगे दारणा येथील शाळेवर शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. भूषण हा एकुलता एक मुलगा. मात्र, आपल्या नोकरीमुळे त्याच्या शैक्षणिक विकासावर परिणाम होणार नाही, याची संपूर्ण काळजी आईवडिलांनी घेतली. भूषणच्या यशानंतर त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाची भावना स्पष्टपणे जाणवते. खऱ्या अर्थाने 'भूषण' हे नाव सार्थ केल्याची भावना ते व्यक्त करतात.

आठवीत असताना भूषण नेहमी सोसायटीच्या बाजूला राहणाऱ्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याची दिव्याची कार पाहत बसायचा. ती येताना-जाताना दिसली की, हा बाहेर येऊन पाहायचा. तेव्हापासून त्याला आपणही असेच मोठे अधिकारी व्हावेसे वाटू लागले. भूषण लहानपणापासून एकपाठी आहे. जास्त अभ्यास करीत नाही. पण जे काही करतो, ते मनापासून. त्यामुळेच तो जे काही करतोय, त्याच्यावर आमचा पूर्ण विश्वास आई सुनिता अहिरे व्यक्त करतात. तर त्याचे विचार आणि भूमिका ठाम असल्याने त्याला यश मिळवता आल्याचे वडील अशोक अहिरे सांगतात. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना आम्हाला वाटायचे की, त्याने मिळेल ते पद स्वीकारावे. मात्र, त्याला स्वत:ला अशा यशाबद्दल आत्मविश्वास होता. आज त्याने ते सिद्ध करून दाखवल्याचे समाधानही ते व्यक्त करतात.

## मोठे ध्येय

भूषणच्या विचारांतील ठामपणा त्याच्याशी बोलाताना उमजून येतो. तो सांगतो, 'मी २०१२ पासून स्पर्धा परीक्षांचा अभ्यास सुरू केला. माझा हा ४ था प्रयत्न होता. यापूर्वी २०१४ ला पोलीस उप अधीक्षक पदासाठी केवळ एका गुणाने मागे पडलो. कक्ष अधिकारी हे पद मिळाले. मात्र, मनाला समाधान वाटत नव्हते. मग, या पदावर रुजू होण्यासाठी मुदत मागून घेतली. या वेळी घरच्यांचा पाठिंबा, मित्र-मैत्रिणींचा पाठिंबा आणि मनोहर भोळे सरांचे मार्गदर्शन खूप मोलाचे ठरले.'

सातत्यपूर्ण प्रयत्न करूनही हाती येणाऱ्या अपयशानेच खरंतर भूषणला पुन्हा नव्याने प्रयत्न करण्याचा हुरूप दिला. तो म्हणतो, 'खरेतर मला खूप नर्व्हस वाटत होते. अगदी व्यवस्थित अभ्यास

करूनही अपयश वाट्याला का येतेय हे कळत नव्हते. मात्र, तेव्हा भोळे सरांनी खूप समजावले, धीर दिला, स्वप्नपूर्तीसाठी प्रोत्साहन दिले. त्याचेच फळ आता मिळाले.'

**मुलाखतीसाठी 'लोकराज्य' उपयुक्त**



**माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या लोकराज्य आणि महाराष्ट्र अहेड या मासिकांचा मला लेखी परीक्षेबरोबरच मुलाखतीसाठीही फायदा झाला. मुलाखतीच्यावेळी मला शासकीय योजनेसंदर्भातील काही प्रश्न विचारण्यात आले होते. त्या वेळी लोकराज्य मासिकातील माहिती उपयुक्त ठरली. शासकीय कामकाजाशी संबंधित माहिती त्यांच्याच शब्दांत मी सांगू शकलो. मुलाखत घेणाऱ्या पॅनलमधील सदस्यांनाही ते आवडल्याचं मला जाणवले.**

## अभ्यासाची तयारी

अभ्यासाच्या तयारीविषयी बोलताना भूषणने सांगितले, मी सात दिवसांपैकी सहा दिवस पूर्णपणे अभ्यासाला दिले. सहा दिवस १० ते ११ तास मी अभ्यास करायचो.

मुख्य भर विषय समजावून घेण्यावर असायचा. विषय समजून घेतल्यानंतर अभ्यासाला सुरुवात केली. प्रत्येक विषयासाठी बाजारात खूप पुस्तकं असतात. मात्र, सरसकट काहीही वाचण्यापेक्षा नेमकं वाचन महत्त्वाचे ठरते. त्यादृष्टीने मी पुस्तकांची निवड केली.

'आठवड्यातील एक दिवस मात्र फक्त स्वत:साठी दिला. माझी आवड ट्रेकिंग, स्विमिंग आणि ड्रायव्हिंग आहे. त्यासाठी वेळ दिला. त्यामुळे पुन्हा अभ्यास करताना मन कायम ताजंतवानं राहायचं. सुरुवातीला अपयश आलं तरी डगमगलो नाही, कारण मी नेहमीच मानसिक आणि शारीरिक कणखरतेवर भर दिला. त्यासाठी प्रयत्न केले'.

## स्वयंअध्ययन

स्वयंअध्ययन हा स्पर्धा परीक्षेच्या यशातील खूप महत्त्वाचा घटक आहे. त्यानंतर विविध पातळ्यांवर तुम्ही घेत असलेले मार्गदर्शन अतिशय महत्त्वाचे आहे. त्यानुसार पुढे जात राहिलात की यश तुमचेच आहे. त्यासोबतच थोरांचा आदर्श डोळ्यासमोर अवश्य ठेवावा. मात्र आपले स्वत:चं मत असावे. अगदी एका व्यक्तीला आदर्श मानले आणि नंतर त्याने भूमिका बदलली तर आपली पंचाईत होते. त्यापेक्षा आपण आपली मते बनवावीत आणि त्यावर ठाम राहावे, असे भूषण म्हणतो.



## यूपीएससीचे ध्येय

आपल्या राज्यात खूप चांगल्या योजना सर्वसामान्यांसाठी आहेत. नवीन काही करण्यापेक्षा त्याची अंमलबजावणी चांगल्याप्रकारे करणं महत्वाचं आहे. योजनांची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे करण्यावर भर देणार आहे. शासकीय सेवेत रुजू झालो तरी केंद्रीय लोकसेवा आयोगाची (युपीएससी) परीक्षा उत्तीर्ण होण्याचे ध्येय समोर ठेवले आहे. त्यासाठी अभ्यास सुरू असल्याचे भूषण सांगतो.

भूषणने मिळवलेल्या यशामुळे स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली आहे. अपयशाला न घाबरता फक्त यशासाठीच प्रयत्न करायचे. यश तुमच्या प्रयत्नांना साद देते, हेच भूषण अहिरेच्या यशाने दाखवून दिले आहे. सातत्यपूर्ण अभ्यास, मानसिक व शारीरिक कणखरता, स्वयंअध्ययनावर भर आणि प्रत्येक विषयांचा सखोल अभ्यास ही भूषणच्या यशाची चतु:सूत्री प्रत्येकाने आत्मसात करावी.

– दीपक चव्हाण


**वार्षिक वर्गणी**

वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. आपला संपूर्ण निवासी पत्ता सुवाच्य अक्षरात पीनकोडसह असावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)

**प्रतिक्रियांचे स्वागत**

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत.

पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२

लोकराज्यची वर्गणी ऑनलाइन भरण्यासाठी
http://dgipr.maharashtra.gov.in


* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.




# करप्रणाली सुलभ, ग्राहकांना लाभ

**जगात १६० देशात वस्तू आणि सेवा करप्रणालीची अंमलबजावणी होत आहे. या करप्रणालीला लोकसभेत आणि राज्यसभेत एकमताने मंजुरी मिळाली आहे. वस्तू व सेवाकर कायद्यामुळे देशात एकसमान करप्रणालीची अंमलबजावणी करता येणार आहे. राज्यातही महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर विधेयक २०१७ ला एकमताने मान्यता देण्यात आली आहे.**

संविधान (एकशे एक) सुधारणा कायदा, २०१६ अन्वये जीएसटीच्या अंमलबजावणीनंतर राज्यास आर्थिक नुकसान झाल्यास केंद्र शासन ५ वर्षे त्याची नुकसानभरपाई देईल, अशी तरतूद करण्यात आली आहे. तसा कायदा संसदेने पारित केला आहे. वस्तू आणि सेवा करामुळे जकात व स्थानिक संस्था कर नाहीसे होतील. आतापर्यंत १७ राज्यांनी या करप्रणालीला त्यांच्या विधिमंडळात मंजुरी दिली आहे.



**प्रगत कायदा**

**महाराष्ट्रातील विधानसभेत महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर विधेयक २०१७ ला एकमताने मान्यता मिळाली. हा ऐतिहासिक क्षण आहे. देश मूल्यवर्धित करप्रणालीतून वस्तू आणि सेवा करप्रणालीकडे वाटचाल करत आहे. या करप्रणालीस देशातील सर्व राजकीय पक्षांनी एकमताने मंजुरी दिली आहे. महानगरपालिकांना नुकसानभरपाई देणारा प्रगत कायदा केल्याने महानगरपालिकांची स्वायत्तता कायम राहील. या सर्व प्रक्रियेत सर्वांनी खूप मोलाचे योगदान दिले.**

**– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

## महापालिकांची स्वायत्तता कायम

विधिमंडळाची मान्यता मिळालेल्या महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देण्याबाबत) विधेयक, २०१७ मुळे महानगरपालिकांची स्वायत्तता कायम राहणार आहे. वस्तू आणि सेवा करामुळे जकात व स्थानिक संस्था कर नाहीसे होणार असल्याने स्थानिक प्राधिकरणांना शाश्वत आणि निरंतरपणे नुकसानभरपाई देण्याचे राज्य शासनाने महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देण्याबाबत) विधेयक, २०१७ अन्वये निश्चित केले आहे.

राज्यातील ४८ टक्के लोकसंख्या ही नागरी भागात राहते. त्यांना महापालिकांमार्फत विविध नागरी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. ही बाब लक्षात घेऊन सर्व महापालिकांना त्यांचा भरपाई निधी देताना राज्य सरकारने स्वत:ला कायद्याच्या चौकटीत बांधले आहे. त्यामुळे सर्व महापालिकांना त्यांचा हक्काचा निधी कायद्याच्या संरक्षणात मिळेल. त्यात कोणताही भेदभाव होणार नाही. कोणत्याही महानगरपालिका आयुक्तांना किंवा महापौरांना हा निधी मिळविण्यासाठी मंत्रालयात यावे लागणार नाही. स्थानिक संस्थांना त्यांचा निधी शाश्वत स्वरूपात देण्याचे बंधन या अधिनियमान्वये राज्य सरकारने स्वत:वर लावून घेतले असल्याचे विधेयकाची माहिती देताना वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

मुंबई महापालिकेचा १० वर्षांचा वृद्धिदर सरासरी चार टक्के आहे. स्थानिक प्राधिकरणांना नुकसानभरपाईची रक्कम देताना त्याच्या दुप्पट म्हणजे आठ टक्क्यांचा वृद्धिदर गृहीत धरण्यात आला आहे. त्यामुळे वस्तू आणि सेवा कर प्रणाली लागू झाल्यानंतर महापालिका आर्थिक अडचणीत येणार नाहीत. वस्तू आणि सेवा कर प्रणालीमुळे कोणत्याही महापालिकेची स्वायत्तता धोक्यात येणार नाही.

हा कायदा उत्तम व्हावा, देशात या संदर्भात महाराष्ट्राचे योगदान लक्षवेधी ठरावे यादृष्टीने सर्व उपाय आणि पर्यायांचा विचार करण्यात आला आहे. जीएसटी आल्यानंतर राज्याचा विकास दर दीड ते दोन टक्क्यांनी वाढेल, असा विश्वास श्री. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. पाच वर्षानंतर पुन्हा महानगरपालिकांचे उत्पन्न लक्षात घेऊन नागरी सुविधांसाठी त्यांना जास्त निधी देण्याचा विचार होऊ शकतो. महापालिकांना राज्यसरकारकडून भरपूर निधी देताना परफॉर्मन्स इंडिकेटर्स निश्चित करून देण्याची सूचना चांगली असून केवळ महापालिकांनाच नाही तर शासनाच्या विविध विभागांसाठीही याचा विचार करता येऊ शकेल, असे वित्तमंत्री म्हणाले.

## विधेयकाची ठळक वैशिष्ट्ये

- महानगरपालिकांना वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणीनंतर

म्हणजेच पर्यायाने जकात, स्थानिक संस्था कर, सेस रद्द झाल्याच्या दिनांकानंतर नुकसानभरपाई देण्यात येईल. ■ महानगरपालिकांना द्यावयाच्या नुकसानभरपाईच्या परिगणनेकरिता २०१६-१७ हे वर्ष आधारभूत ठरविण्यात येईल. ■ २०१६-१७ मध्ये प्राप्त झालेला महसूल आधारभूत वर्षाचा महसूल गृहीत धरला जाईल. ■ आधारभूत महसूलामध्ये महानगरपालिकेने जकात, स्थानिक संस्था कर वा सेस यामुळे जमा केलेला महसूल परिगणीत होईल. ■ राज्य शासनाने १ ऑगस्ट २०१५ रोजी काही अंशी रद्द केलेल्या स्थानिक संस्था करापोटी महानगरपालिकेस अनुदान दिलेल्या रकमेचा समावेश असेल. ■ २०१६-१७ च्या आधारभूत जमा महसूलामध्ये नुकसानभरपाई देताना पुढील वर्षाकरिता चक्रवाढ पद्धतीने ८ टक्के वाढ गृहीत धरण्यात येईल. ■ महानगरपालिकेस द्यावयाच्या नुकसानभरपाईची रक्कम प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत देण्यात येणार आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या बँक खात्यामध्ये प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत रक्कम जमा न झाल्यास ही बँक राज्य शासनाच्या बँक हमीनुसार महानगरपालिकेच्या खात्यास ही रक्कम वर्ग करील. राज्य शासनाकडून काही कर महानगरपालिकेस अभिहस्तांकित करण्याचा विचार करण्यात येणार आहे.

## महाराष्ट्र वस्तू व सेवा करविषयक कायदा

राज्याच्या कर अधिनियमात तसेच स्थानिक संस्थांसंबंधातील अधिनियमात करावयाच्या बदलाबाबतचे महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विषयक (सुधारणा, विधीग्राहीकरण व व्यावृत्ती) विधेयक, २०१७ चर्चेअंती विधानसभेत मंजूर झाले. संविधानाच्या एकशे एक दुरुस्तीमुळे राज्य शासनाच्या अप्रत्यक्ष कर आकारण्याच्या अधिकारात मोठ्याप्रमाणात बदल झाला. त्याअनुषंगाने राज्याच्या कर कायद्यात बदल करण्याबाबतचे विधेयक अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत मांडले. त्यासही सभागृहाने मंजुरी दिली. यामध्ये करमणूक कर गोळा करण्याचा अधिकार स्थानिक संस्थांना देणे, वस्तू व सेवा कराची अंमलबजावणी झाल्यानंतर जकात व स्थानिक संस्था कराची आकारणी निरसित करणे, विक्रीकराची आकारणी पेट्रोलियम पदार्थ व मद्यावर सीमित करणे, वाहनांच्या किंमतीच्या व्याख्येसाठी मोटार वाहन कायद्यात बदल करणे यासारखे प्रावधान मुख्यत: या विधेयकात करण्यात आले आहे.

## वस्तू आणि सेवा करप्रणाली एक दृष्टिक्षेप व वैशिष्ट्ये

- या करप्रणालीमुळे वस्तू स्वस्त होतील.
- केंद्र आणि राज्य शासनाचे बहुतांश अप्रत्यक्ष कर या करप्रणालीत विलीन झाल्याने कर प्रणाली सोपी आणि सुटसुटीत होईल.
- व्यापारी व उद्योगधंद्यास हिशेब ठेवणे सोपे जाईल.
- संपूर्ण देशात एकच करप्रणाली अमलात आल्याने संपूर्ण देश एकसंध बाजारपेठ होईल.
- कररचना पारदर्शक असेल. संगणकीय सुविधांमुळे व्यापाऱ्यांना सुविधा होईल.
- वस्तू आणि सेवा करप्रणालीत केंद्र आणि राज्याचे एकूण १७ कर विलीन होतील. त्यात केंद्रीय उत्पादन शुल्क, अतिरिक्त उत्पादनशुल्क, उत्पादनशुल्क (औषधी आणि प्रसाधन सामग्री), अतिरिक्त उत्पादन शुल्क (कापड व उत्पादने), अतिरिक्त सीमा शुल्क, विशेष अतिरिक्त सीमा शुल्क, सेवाकर, वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्याशी संबंधित असलेला केंद्रीय अधिभार आणि उपकर हे केंद्रीय कर तर राज्याचा मूल्यवर्धित कर, केंद्रीय विक्रीकर, ऐषआराम कर, प्रवेश कर (ऑक्ट्रॉय, एलबीटी, वाहनांवरील प्रवेशकर, वस्तूंवरील प्रवेश कर), करमणूक आणि मनोरंजन कर, जाहिरातीवरील कर, खरेदीकर, वन विकास कर (वनउपजाच्या विक्रीवरील कर) लॉटरी, बेटींग, जुगारावरील कर, वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्याशी संबंधित असलेला कर आणि उपकर यांचा समावेश आहे.

प्रासंगिक



### राज्याच्या उत्पन्नात वाढ

**या करप्रणालीमुळे राज्यात प्रामाणिक व्यापाराला चालना मिळेल, करचुकवेगिरीला आळा बसेल. जीएसटी करप्रणाली अंतर्गत २० लाखापर्यंतची उलाढाल करमुक्त ठेवण्यात आली आहे.**

**सीपीआय बास्केटमधील जवळपास ६३% वस्तूंना जीएसटीमध्ये करमाफी देण्यात आली आहे, तर ३२% वस्तूंवर निम्नदर म्हणजेच ५% कर दर आहे. या कर प्रणालीत जुन्या थकबाकीदारांचे करदायित्व संपुष्टात येणार नाही. जीएसटी लागू केल्यानंतर राज्याची महसूल हानी केंद्र शासन पाच वर्षात नुकसानभरपाई स्वरूपात भरून देणार आहे. मात्र या करप्रणालीमुळे राज्याच्या उत्पन्नात नक्कीच वाढ होईल. जीएसटीमुळे फार तर एक-दोन वर्षे नुकसानभरपाई द्यावी लागेल. त्यानंतर या करप्रणालीतून वाढलेल्या उत्पन्नामुळे राज्याला नुकसानभरपाईची गरज पडणार नाही.**

**- सुधीर मुनगंटीवार, वित्तमंत्री**


- जीएसटीमध्ये केंद्रीय वस्तू आणि सेवा कर (सीजीएसटी), राज्य वस्तू आणि सेवा कर (एसजीएसटी), आंतरराज्य वस्तू आणि सेवा कर (आयजीएसटी) आणि संघराज्य वस्तू आणि सेवा कर (यूटीजीएसटी) असे चार वर्गीकरण करण्यात आले आहे.
- २१ प्रकरणे, १७४ कलमे आणि ३ परिशिष्ट असलेला महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर कायदा सर्वंकष चर्चेतून तयार झाला आहे.

स्मरण

# येथे कर माझे जुळती...

**जून महिन्यात शासकीय व निमशासकीय स्तरावर राजश्री शाहू महाराज यांची जयंती साजरी केली जाते. त्यानिमित्त त्यांचे पुण्यस्मरण...**

राजर्षी शाहू महाराज (२६ जून १८७४- ६ मे १९२२). महाराष्ट्रातील करवीर तथा कोल्हापूर संस्थानचे प्रागतिक अधिपती आणि थोर समाजसुधारक. प्राथमिक शिक्षण, जातिभेद-निवारण, अस्पृश्यता-निवारण इ. सुधारणांचे पुरस्कर्ते. त्यांचा जन्म कागलच्या जहागीरदार घाटगे घराण्यात जयसिंगराव आणि राधाबाई ह्या दांपत्याच्या पोटी झाला. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव यशवंतराव. चौथ्या शिवाजीच्या अकाली निधनानंतर ते कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेले (१७ मार्च १८८४). राजकोट व धारवाड येथे त्यांचे शिक्षण झाले. सर फ्रेझर व रघुनाथराव सबनीस यासारखे गुरू त्यांना मिळाले. विद्यार्थिदशेत त्यांनी इंग्रजी, संस्कृत, इतिहास, राज्यशास्त्र इ. विषयांचा अभ्यास केला. त्यांना राज्याधिकार (२ एप्रिल १८९४) प्राप्त झाला. तत्पूर्वी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या कन्येबरोबर त्यांचा विवाह झाला. त्यांना राजाराम व शिवाजी हे दोन मुलगे आणि राधाबाई (आक्कासाहेब) व आऊबाई या दोन कन्या झाल्या. त्यांनी प्रशासन-यंत्रणेची पुनर्रचना करून बहुजन समाजातील कर्तबगार व गुणी व्यक्तींना अधिकारावर नेमण्यास सुरुवात केली.



कोल्हापुरात त्यांनी ब्राह्मणेतर पुरोहितांची निर्मिती करण्यासाठी 'श्री शिवाजी वैदिक स्कूल' ची स्थापना केली. मराठ्यांसाठी स्वतंत्र 'क्षात्रजगद्‌गुरू' पद निर्माण करून त्यावर सदाशिवराव पाटील या उच्चविद्याविभूषित तरुणास नेमले (१९२०). शाहू महाराजांनी आर्यसमाज व थिऑसॉफिकल सोसायटी या संस्थांनाही आश्रय दिला. वेदांवरील श्रद्धा व जातिभेदाला विरोध, या आर्यसमाजाच्या तत्त्वांमुळे त्यांनी स्वत:ला 'आर्यसमाजी' म्हणून घोषित केले.

## शिक्षणावर भर

बहुजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दारिद्र्य, अज्ञान व अंधश्रद्धा नष्ट होणार नाहीत म्हणून त्यांनी आपल्या संस्थानात सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा करून अमलात आणला (१९१७). प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरू केली. खेड्यापाड्यांतील मुलांना उच्चशिक्षणाची सुविधा मिळावी, म्हणून त्यांनी कोल्हापुरात मागास जातिजमातींसाठी वसतिगृहे स्थापन केली.

## मागास मुख्य प्रवाहात आले

शाहू महाराजांनी २६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानातील ५०% शासकीय नोकऱ्या मागासवर्गासाठी राखीव ठेवल्याचा जाहीरनामा काढला. राखीव जागांचे धोरण अमलात आणणारे शाहू हे हिंदुस्थानातील पहिले राज्यकर्ते ठरले. संस्थानातील शाळा, पाणवठे, विहिरी, दवाखाने, कचेऱ्या इ. सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळण्यास त्यांनी कायद्याने प्रतिबंध केला. अनेकांना माहूत, हूलस्वार, पोलीस, स्वत:चे मोटारचालक म्हणून नेमले. महार-वतन खालसा करून महारांची वेठबिगारीतून आणि गुन्हेगार मानल्या गेलेल्या जातींची 'हजेरी' पद्धतीतून मुक्तता केली. फासेपारधी, कोरवी, माकडवाले यांसारख्या भटक्या व विमुक्त जातींना जवळ करून त्यांचे जीवन स्थिर केले. त्यांना आपले रक्षक म्हणून नेमले. खेड्यापाड्यांतील बलुतेदारांनाही सर्व उद्योगधंदे खुले केले (१९१८). जोगिणी व देवदासी प्रथेस प्रतिबंध करणार कायदा केला (१९२०).

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मूकनायक या वृत्तपत्रास व पुढे त्यांच्या इंग्लंडमधील उच्चशिक्षणास त्यांनी अर्थसाहाय्य केले. अस्पृश्यतेबरोबरच जातिभेदाशी त्यांनी अखेरपर्यंत संघर्ष केला. आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली (१९१८). तसेच बालविवाहास प्रतिबंध करून नोंदणी विवाहाचा कायदा जारी केला. घटस्फोटास व विधवापुनर्विवाहास कायदेशीर मान्यता दिली. कुटुंबात होणाऱ्या शारीरिक व मानसिक छळांपासून स्त्रीला संरक्षण देणारा कायदाही त्यांनी मंजूर केला (१९१९).

## सर्वसमावेशक उपक्रम

सामाजिक सुधारणांबरोबरच शाहू महाराजांनी शेतीस व उद्योगधंद्यांस प्रोत्साहन दिले. अनेक कृषी व औद्योगिक प्रदर्शने भरवली. पन्हाळ्यावर चहा, कॉफी, रबर यांच्या लागवडींचे प्रयोग केले. कृषी उत्पादनासाठी शाहूपुरी, जयसिंगपूर यांसारख्या बाजारपेठा वसविल्या. 'शाहू मिल' ची स्थापना करून आधुनिक वस्त्रोद्योगास त्यांनी चालना दिली. शाहूंनी बांधलेले राधानगरीचे धरण, कृषी क्षेत्रात संस्थानचा कायापालट करणारा उपक्रम ठरला. शाहूंनी 'सहकारी संस्थांचा कायदा' करून सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ रोवली (१९१३). शाहूंनी संगीत, नाट्य, चित्रकला, मल्लविद्या आदी कलांना राजाश्रय देऊन महाराष्ट्रात कलेच्या क्षेत्रात स्पृहणीय कामगिरी केली. मल्लविद्येच्या प्रांतात शाहूंनी संस्थानासह सर्व देशांतील मल्लांना आश्रय दिला.

शाहूंच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून कानपूर येथे कुर्मी क्षत्रिय सभेने त्यांना 'राजर्षी' पदवी बहाल केली (१९१९). अखेरच्या दिवसांत द्वितीय चिरंजीव शिवाजी यांच्या अपघाती निधनाने (१९१८) ते खचून गेले, त्याचवेळी ते मधुमेहाने ग्रासले होते. अखेर मुंबई येथे त्यांचे वयाच्या अवघ्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यानंतर त्यांचे पुत्र राजाराम महाराज कोल्हापूरच्या गादीवर आले.

**(संदर्भ - मराठी विश्वकोश)**

**संकलन: गजानन पाटील**

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

# महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ



**श्री. देवेंद्रजी फडणवीस**

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**श्री. सुभाष देशमुख**

मा. मंत्री, सहकार, पणन व वस्त्रोद्योग,
महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष

**"शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी शेतमालाच्या मूल्यवर्धनासाठी"**



**श्री. सदाभाऊ खोत**

मा. राज्यमंत्री, कृषि व फलोत्पादन, पणन,
पाणी पुरवठा व स्वच्छता, महाराष्ट्र राज्य
तथा उपाध्यक्ष

महाराष्ट्र राज्य देशामध्ये कृषि पणन क्षेत्रात अग्रेसर असावे या करिता, राज्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचा योग्य मोबदला मिळावा म्हणून शासनातर्फे आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. यात पणन कायद्यात बदल, विविध प्रकल्प आणि योजनांच्या अंमलबजावणीचा समावेश आहे. ई-नाम योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्याची निवड झालेली आहे. यातूनच राज्यात कृषि पणन क्रांती होईल.


**योजना**

- संत शिरोमणी श्री सावता माळी शेतकरी आठवडे बाजार अभियान
- शेतमाल तारण योजना
- फळ महोत्सव अनुदान योजना
- 'कृषि पणन मित्र' मासिक
- मार्कनेट प्रकल्प
- निर्यात सुविधा केंद्रे
- टर्मिनल मार्केट

## महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे

प्लॉट नं. आर. ७, छत्रपती शिवाजी मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११ ०३७.
दूरध्वनी- (०२०) २४५२८१००/२४५२८२००. टोल फ्री क्र.- १८०० २३३ ०२४४.
E-mail : prp@msamb.com, Website : www.msamb.com

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th June 2017
Date of Publication : 10th of every Month




प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा.लि. प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई - ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह